इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक -१३० ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

बुधवार,ता.९ सप्टेंबर २०२६ | श्रावण कृ.१३ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

## गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी टोलमाफी

मुंबई,ता.८-

गणेशोत्सवानिमित्त कोकणात आपल्या गावी जाणाऱ्या गणेशभक्तांना यंदा शासनाकडून मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सवाच्या कालावधीत कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरातून (टोल) सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. ११ सप्टेंबर २०२६ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मुंबईबंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८, मुंबईगोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील कोकणाकडे जाणाऱ्या संबंधित मार्गावरील टोल नाक्यांवर ही टोलमाफी लागू राहणार आहे. याशिवाय नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील अटल बिहारी वाजपेयी शिवडीन्हावा शेवा अटल सेतूमार्गे कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांनाही टोलमाफीचा लाभ मिळणार आहे.

# कर्ज,विमा,बचत,पेन्शन सर्वांसाठी सुलभ करा

## पंतप्रधान मोदी; मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टचे दिमाखात उद्घाटन

■ मुंबई,ता.८-



**भारताच्या फिनटेक क्षेत्राने डिजिटल पेमेंटच्या पलीकडे झेप घेत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत कर्ज, विमा, बचत, गुंतवणूक आणि पेन्शन यांसारख्या वित्तीय सेवा पोहोचवाव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट (जीएफएफ) २०२६ चे उद्घाटन करताना त्यांनी फिनटेकच्या पुढील पर्वाची दिशा स्पष्ट केली.**

भारताच्या फिनटेक क्षेत्राने आतापर्यंत उल्लेखनीय प्रगती केली असून, पारंपरिक वित्तीय व्यवस्थेच्या कक्षेबाहेर असलेल्या कोट्यवधी नागरिकांना औपचारिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याची क्षमता या क्षेत्रात आहे, असे मोदी यांनी सांगितले. भारताच्या फिनटेक प्रवासाचे वर्णन त्यांनी 'अद्भुत' असे करत यूपीआयला या यशाचा प्रमुख आधारस्तंभ म्हटले.


यूपीआयने २५ ऑगस्ट रोजी दशकपूर्ती केली. एक दशकापूर्वी बँकिंग सेवा सामान्य नागरिकांच्या बोटांवर आणण्याची कल्पना अनेकांना अशक्य वाटत होती; मात्र आज पिढ्यान् पिढ्या बँकिंग व्यवस्थेपासून दूर राहिलेले कोट्यवधी भारतीय फिनटेक विकासाचे प्रमुख चालक बनले आहेत, असे मोदी म्हणाले. केवळ ऑगस्टमध्ये यूपीआयच्या माध्यमातून २४०० कोटींहून अधिक व्यवहार झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

यूपीआय आता ११ देशांमध्ये कार्यरत असून, विविध देशांमध्ये त्याची उपलब्धता हा केवळ पहिला टप्पा आहे. पुढील टप्प्यात या देशांच्या स्थानिक पेमेंट प्रणाली यूपीआयशी जोडण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे, असे मोदी यांनी सांगितले. भारताशी मोठ्या प्रमाणावर व्यापार करणारे देश, मोठ्या संख्येने भारतीय नागरिक वास्तव्यास असलेले देश तसेच भारतासोबत विकासाच्या दिशेने वाटचाल करू इच्छिणारे देश यांच्या पेमेंट प्रणाली परस्पर जोडण्यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. भारतात परदेशातून पाठविल्या जाणाऱ्या पैशांवरील व्यवहार शुल्क कमी करून, यूपीआयच्या माध्यमातून हा पैसा अधिक वेगाने भारतीय कुटुंबांपर्यंत पोहोचविता येऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारताची कार्ड पेमेंट व्यवस्था दीर्घकाळ इतर देशांनी विकसित केलेल्या मानके आणि नियमांवर आधारित होती. आता परिस्थिती बदलली असून भारतीय फिनटेक क्षेत्राने स्वतःची नियमावली आणि मानके विकसित करून (पान २ वर)

### सायबर सुरक्षा,ग्राहक संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य !

**फिनटेक क्षेत्रासमोर चार प्रमुख प्राधान्यक्रम ठेवताना मोदी यांनी सायबर सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. उद्योग क्षेत्राने स्वतःची नैतिक डेटा संरक्षण मानके विकसित करावीत, असे त्यांनी सांगितले.त्याचबरोबर मजबूत फिनटेक नियामक व्यवस्था आणि उद्योगाच्या नेतृत्वाखालील नवोन्मेष परिसंस्था विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. फिनटेक ग्राहक संरक्षण निर्देशांक तयार करून त्याच्या आधारे कंपन्यांचे पारदर्शक मूल्यांकन करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला.**



## पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेत चूक

■ मुंबई,ता.८

वांद्रे-कुर्ला संकुल येथील 'नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर' परिसरात पंतप्रधान मोदी यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्याच कार्यक्रमाच्या आवारातून मुंबई पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

यातील एका संशयिताकडे बंदूक मिळून (पान २ वर)

### ब्रिक्स परिषदेमुळे

## दिल्लीतील न्यायालयांना सुट्टी

■ नवी दिल्ली,ता.८-



राजधानी दिल्लीत आयोजित करण्यात येणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेमुळे ११ सप्टेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयासह राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील सर्व जिल्हा न्यायालये बंद राहणार आहेत.

तसेच ट्रायल कोर्ट्सना ११,१२ आणि १३ सप्टेंबर अशी सलग (पान २ वर)

## पुतिन भारत दौऱ्यावर येणार

■ नवी दिल्ली,ता.८-



दिल्ली येथे होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात ११ सप्टेंबर रोजी द्विपक्षीय बैठक होणार आहे.

क्रेमलिनने (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | १०३.०३ |
| राधानगरी | ८.३६ | ०८.३३ |
| तुळशी | ३.४७ | ०३.४७ |
| वारणा | ३४.४० | ३४.४० |
| काळम्मावाडी | २५.३९ | २५.३९ |
| कासारी | २.७७ | २.७६ |
| कडवी | २.५२ | २.५२ |
| कुंभी | २.७२ | २.७१ |
| पाटगाव | ३.७२ | ३.७२ |
| चिकोत्रा | १.५२ | १.३९ |
| चित्री | १.८९ | १.८९ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.५२ |
| जांबरे | ०.८२ | ०.८० |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२४ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४७८०० रु. | २३८००० रु. |

अंडी ५९० रुपये शेकडा

### हास्यतुषार -सुरेश राम




### एमआयडीसी रद्द करण्याच्या मागणीसाठी

# टाकळी ग्रामस्थांचा शिरोळ तहसीलवर मोर्चा

■ शिरोळ,ता.८-

**सैनिक टाकळी येथील प्रस्तावित एमआयडीसी रद्द करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ, माजी सैनिक आणि महिलांनी मंगळवारी शिरोळ तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजी भिडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला वेगळे वळण मिळाले.**

संतप्त आंदोलकांनी तहसील कार्यालयाचे लोखंडी गेट तोडत इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या काचा फोडल्या. या प्रकारामुळे कार्यालय परिसरात तणाव निर्माण झाला. यावेळी सैनिक टाकळी गावच्या हद्दीतील रिकाम्या जागेत एमआयडीसी उभारण्याचा घाट घडावकर यांनीच घातल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला.

सैनिक टाकळी येथे प्रस्तावित असलेल्या एमआयडीसीला ग्रामस्थांचा सुरुवातीपासून विरोध आहे.सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा देण्याऐवजी गावात एमआयडीसी उभारून काय साध्य होणार, असा सवाल आंदोलकांनी केला. प्रस्तावित एमआयडीसीमुळे गावातील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांच्या हिताला बाधा पोहोचणार असल्याचा दावाही त्यांनी केला.एमआयडीसी रद्द करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ, माजी सैनिक आणि महिला शिरोळ तहसील कार्यालयावर धडकले. आंदोलकांनी तहसील कार्यालयाच्या आवारात प्रवेश करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये वादावादी झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता आंदोलक अधिक आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलकांनी तहसील (पान २ वर)

### कार्यालयाचे गेट तोडले; इमारतीच्या काचा फोडल्या

**मोर्चा तहसील कार्यालयात पोहोचल्यानंतर आंदोलकांनी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरील लोखंडी गेट तोडले. यावेळी पोलिस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. गेट अंगावर पडल्याने एक पोलिस कर्मचारी किरकोळ जखमी झाला. त्यानंतर काही आंदोलकांनी प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या काचाही फोडल्या.**

# आरोप-प्रत्यारोपामुळे तेढ

## विखे-पाटील यांनी समाजाचे नुकसान केले-जरांगे

■ मुंबई,ता.८-





**मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मनोज जरांगे आणि मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यातील आरोप-प्रत्यारोप पुन्हा तीव्र झाले आहेत. जरांगे पाटील यांनी विखे-पाटील यांच्यावर थेट टीका करत मराठा समाजाच्या प्रश्नावर त्यांनी सरकारला जाब विचारावा आणि समाजासाठी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. त्यावर विखे-पाटील यांनी सरकारने आवश्यक निर्णय घेतले असून त्यांची अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगत, जरांगे यांच्या मागण्यांवर सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट केले.**

जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांच्यावर टीका करताना त्यांना 'पळपुटे' संबोधले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ऐकून विखे-पाटील यांनी मराठा समाजाचे नुकसान केल्याचा आरोप त्यांनी केला. सुरुवातीला विखे पाटील समाजाच्या प्रश्नावर काम करतील, अशी अपेक्षा होती; मात्र त्यांनी समितीच्या माध्यमातून समाजाचे नुकसान केले, असा दावा जरांगे यांनी केला. (पान २ वर)

### सरकार सकारात्मक, जरांगेंनीही प्रतिसाद द्यावा : विखे-पाटील

# पंढरपूर कॉरिडॉरचा मार्ग मोकळा

## ३,९९३ कोटींच्या आराखड्यानंतर भूसंपादन सुरू

■ पंढरपूर,ता.८-

**काशी आणि उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास कॉरिडॉर राबविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने हालचाली वेगवान केल्या आहेत. या प्रकल्पासाठी ३,९९३ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला असून, प्रत्यक्ष भूसंपादन प्रक्रियेला येत्या १५ दिवसांत सुरुवात होणार असल्याची माहिती भूसंपादन उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.**



देशमुख यांनी पत्रकार परिषदेत पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास कॉरिडॉरबाबत सविस्तर व सचित्र माहिती दिली. राज्य शासनाने जून महिन्यात कॉरिडॉरसाठी ३,९९३ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे सुमारे ४५० निवासी आणि ४०० व्यावसायिक मालमत्ता बाधित होणार आहेत.याशिवाय अंदाजे २०७ ते २२५ भाडेकरू देखील प्रकल्पामुळे बाधित होण्याची शक्यता आहे.

बाधित व्यावसायिक मालमत्तांना प्रति चौरस फूट ४० हजार रुपये मोबदला देण्यात येणार असल्याचे देशमुख यांनी स्पष्ट केले. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेत (पान २ वर)

# गोकुळ निवडणूक अधिकाऱ्यांना अवमान कारवाईची नोटीस

■ कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)-

**गोकुळ दूध संघाच्या अंतिम मतदार यादीत अवसायनातील ४८ दूध संस्थांचा समावेश न केल्याच्या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने गंभीर दखल घेतली. संबंधित संस्थांना अंतिम मतदार यादीतून वगळल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. तसेच जिल्हा सहकार निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक देविदास मिसाळ आणि नारायण परजने यांच्याविरुद्ध 'सु-मोटो' अवमान कारवाई का करू नये, अशी नोटीस बजावली आहे.या दोन्ही अधिकाऱ्यांना ९ ऑक्टोबर रोजी न्यायालयासमोर**

### ४८ संस्थांचा मतदार यादीत समावेश करण्याचे आदेश

हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. संबंधित संस्थांच्यावतीने ॲड. चेतन पाटील आणि ॲड. धैर्यशील पोवार यांनी बाजू मांडली, तर शासनाच्यावतीने ॲड. दिलीप बोडके यांनी युक्तिवाद केला.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीसाठी सुरुवातीला ५ हजार ४७० सभासदांची यादी सादर करण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनाने ४ ऑगस्ट रोजी ५ हजार ३३२ सभासदांची अंतिम मतदार यादी जाहीर केली. या प्रक्रियेत १३८ संस्था वगळण्यात आल्या. त्यामध्ये अवसायनातील ४८ संस्थांचा समावेश होता.

या संस्था पूर्वीच्या याचिकेत पक्षकार नसल्याचे कारण देत त्यांना अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे संबंधित संस्थांच्या वतीने न्यायालयात (पान २ वर)

# राहुल गांधी विरोधातील समन्स रद्द करण्यास न्यायालयाचा नकार

■ मुंबई,ता.८-



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात २०१८ मध्ये केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याशी संबंधित मानहानीच्या प्रकरणात काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून धक्का बसला आहे. उच्च न्यायालयाने २०१९ मध्ये दंडाधिकारी न्यायालयाने राहुल गांधी यांच्याविरोधात जारी केलेले समन्स रद्द करण्यास नकार दिला आहे.**


न्यायमूर्ती एन. आर. बोरकर यांच्या एकलपीठाने राहुल गांधी यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. या याचिकेत त्यांनी गिरगाव दंडाधिकाऱ्यांनी २८ ऑगस्ट २०१९ रोजी दिलेल्या आदेशाला आव्हान दिले होते. या आदेशाद्वारे राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या मानहानीच्या तक्रारीवर कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने म्हटले की, दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याचे कारण ठरेल अशी कोणतीही 'कायदेशीर चूक किंवा विकृती' न्यायालयाला आढळलेली नाही. न्यायमूर्ती बोरकर यांनी (पान २ वर)

# खंडणी प्रकरण; महिलेस अटक

## व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

■ कराड, ता.८ (प्रतिनिधी)-


**येथील एका प्राध्यापकाला खोट्या विनयभंगाच्या गुन्ह्यात अडकवण्याची, तसेच त्यांचा व्हिडिओ व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी देत तीन लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी शहर पोलिसांनी एका महिलेला अटक केली.**



अश्विनी वेताळ असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून, न्यायालयाने तिला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील दुसऱ्या संशयित महिलेचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

याबाबत माहिती अशी की, अश्विनी वेताळ व शबाना मुल्ला या दोघी मुलींच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या कामासाठी एका महाविद्यालयात गेल्या होत्या. त्यावेळी त्यांचा प्रा. भिंगारे यांच्याशी शाब्दिक वाद झाला होता. या घटनेनंतर शनिवार, दि. ५ रोजी शहर पोलिसांनी तक्रार प्राप्त झाल्याचे सांगून प्रा. भिंगारे यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले.

प्रा. भिंगारे पोलीस ठाण्यात पोहोचल्यानंतर महाविद्यालयात त्यांच्याशी वाद घालणाऱ्या दोन्ही महिला तेथे उपस्थित असल्याचे समोर आले. (पान २ वर)



(पान १ वरून)

## मोदींच्या सुरक्षेत चूक

आल्याने आणि तो स्वतःला थेट पंतप्रधान कार्यालयाचा वरिष्ठ अधिकारी सांगत असल्याने सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत. मुंबई पोलिसांनी एनएमएससी सेंटरमधून रोहन पारेख नावाच्या २४ वर्षीय युवकाला ताब्यात घेतले आहे.रोहन पारेख हा एनएमएससी परिसरात अत्यंत रुबाबात वावरत होता आणि स्वतःला पीएमओ कार्यालयाचा अधिकारी असल्याचे सांगत होता.

मात्र, कार्यक्रमाच्या सुरक्षेवर तैनात असलेल्या विशेष सुरक्षा रक्षकांनी आणि पोलिसांनी जेव्हा त्याच्या संशयास्पद हालचाली पाहून तपासणी केली, तेव्हा त्याने दाखवलेले पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र पूर्णपणे बनावट असल्याचे उघडकीस आले.

सुरक्षा यंत्रणांना सर्वात मोठा धक्का तेव्हा बसला जेव्हा त्यांना समजले की, २४ वर्षांचा रोहन पारेख हा एकटा नाही तर स्वतःसोबत एका खाजगी बॉडीगार्डला घेऊन फिरत होता. त्याच्यासोबत असलेल्या या बॉडीगार्डकडे एक बंदूक देखील मिळून आली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या व्हीव्हीआयपी सुरक्षा आणि एसपीजी प्रोटोकॉलच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे बंदुकधारी व्यक्ती आणि बनावट अधिकारी थेट कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचल्याने सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पंतप्रधानांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी घडलेल्या या सुरक्षेच्या मोठ्या चुकीनंतर मुंबई पोलीस आणि केंद्रीय गुप्तचर यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. पोलिसांनी रोहन पारेख आणि त्याच्या बंदुकधारी बॉडीगार्डला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

ही घटना अत्यंत संवेदनशील असल्याने या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास आता मुंबई पोलीस क्राईम ब्रँचकडे सोपवण्यात आला आहे. हा युवक व्हीआयपी परिसरात कशासाठी शिरला होता, त्याचा मूळ हेतू काय होता आणि त्याने बनावट आयडी कार्ड कुठे बनवले, याचा शोध आता क्राईम ब्रँच घेत आहे.

## दिल्लीत न्यायालयांना सुट्टी

३ दिवस सुट्टी राहणार आहे. ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या कार्यालयांना सुट्टी जाहीर केल्यानंतर आता दिल्लीतील उच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयांबाबतही प्रशासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे. उच्च न्यायालय प्रशासनाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, ११ सप्टेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालय तसेच राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्लीच्या अखत्यारीतील सर्व जिल्हा न्यायालये (ट्रायल कोर्टस) बंद राहतील. याशिवाय, ब्रिक्स परिषदेमुळे १२ सप्टेंबर रोजीही ट्रायल कोर्टसना सुट्टी देण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीतील सर्व कनिष्ठ न्यायालये ११,१२ आणि १३ सप्टेंबर अशी सलग ३ दिवस बंद राहणार आहेत.ब्रिक्स शिखर परिषदेसाठी विविध देशांतील उच्चपदस्थ जागतिक नेत्यांचे दिल्लीत आगमन होणार आहे.त्यांच्या सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणावर सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार असून, शहरातील वाहतुकीवरही विविध निर्बंध लागू होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक तसेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित व्यक्तींना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयासाठी केवळ ११ सप्टेंबर रोजीच सुट्टी लागू राहणार आहे, तर ट्रायल कोर्टसाठी ११ ते १३ सप्टेंबरपर्यंत तीन दिवसांचा अवकाश असेल.

## कॉरिडॉरचा मार्ग मोकळा

बाधित होणाऱ्या मालमत्ताधारक आणि भाडेकरूंच्या पुनर्वसन व मोबदल्याचा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे.काशी व उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूरचा तीर्थक्षेत्र विकास करण्याच्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत कॉरिडॉर हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## समन्स रद्द करण्यास नकार

सांगितले की, या आदेशात कोणतीही त्रुटी नसल्याने राहुल गांधी यांची याचिका फेटाळण्यात येत आहे.मात्र, उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२१ मध्ये दिलेला आपला आदेश कायम ठेवला आहे. या आदेशानुसार, दंडाधिकारी न्यायालयाला मानहानीच्या तक्रारीवरील सुनावणी सहा आठवड्यांसाठी पुढे ढकलण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे राहुल गांधी यांना या प्रकरणात दिलासा मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा मार्ग खुला राहणार आहे.हे मानहानीचे प्रकरण २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात राहुल गांधी यांनी केलेल्या एका वक्तव्याशी संबंधित आहे. राफेल लढाऊ विमान करारावरून राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधताना त्यांना 'कमांडर-इन-थीफ' अर्थात 'चोरांचा सरदार' असे संबोधले होते. तक्रारदार एम. एच. श्रीश्रीमल यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती.

# भुदरगड तालुक्यातील पाटगाव धरण भरले

■ गारगोटी,ता.८ (वार्ताहर)–

**उशिरा सुरु झालेला पाऊस आणि पावसाचे कमी प्रमाण यामुळे तब्बल दिड महिना उशिराने का होईना भुदरगड तालुक्यातील पाटगाव धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.गत वर्षी हे धरण २६ जुलै २०२५ रोजी पूर्ण क्षमतेने भरले होते.**



पाटगाव धरण भरल्यानंतर सांडव्यावरून वेदगंगा नदीत पडणारे पाणी. (फोटो–आनंद चव्हाण)

मंगळवारी दुपारी ३ वाजता हे धरण भरले. धरण पूर्ण भरल्याने धरणातील पाण्याचा वेदगंगा नदी पात्रात थोड्या प्रमाणात विसर्ग होत आहे. धरण भरल्याने वेदगंगा नदीच्या काठावरील शेकडो गावांचा पाण्याचा व १२ हजार हेक्टर शेतजमिनीचा उन्हाळ्यातील पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

भुदरगड तालुक्यातील पाटगाव येथे वेदगंगा नदीवर पाटगाव धरण ३.७१६ टीएमसी क्षमतेचे धरण आहे.सन १९९७–९८ साली या धरणाचे काम पूर्ण झाले.यंदा पाऊस उशिरा सुरु झाला, जून महिना कोरडा गेला तर जुलै महिन्याच्या पंधरवड्यानंतर पावसाने सुरुवात केली.शिवाय यंदा धरण क्षेत्रात व पूर्ण भुदरगड तालुक्यातच पर्जन्य मान कमी झाले आहे.या पाटगाव धरणामुळे वेदगंगा नदीवरील भुदरगड तालुक्यातील पाटगाव ते गारगोटी, तसेच पुढे वाघापूर पर्यंत कागल तालुक्यातील निढोरीपासून चिखलीपर्यंत आणि पुढे निपाणीच्या पुढील गावापर्यंत ही नदी वाहते. त्यामुळे नदी काठावरील शेकडो गावातील लोकांचे लक्ष हे पाटगाव धरण कधी भरते? याकडे लक्ष असते. या धरणामुळे भुदरगड, कागल तालुक्यातील व पुढे कर्नाटक राज्यातील निपाणी भागातील १२ हजार हेक्टर शेतजमिनीला बारमाही पाणी मिळते.

## अधिकाऱ्यांना अवमान कारवाईची नोटीस

(पान १ वरून)

सांगण्यात आले. या निर्णयाविरोधात संस्थांनी पुन्हा उच्च न्यायालयात दाद मागितली.

दरम्यान, ३१ ऑगस्ट रोजी नारायण परजने यांनी दिलेला आदेश यापूर्वीच रद्द करण्यात आला असल्याचा मुद्दा सुनावणीदरम्यान पुढे आला. पूर्वीच्या याचिकेत पक्षकार नसलेल्या संस्थांनाही न्यायालयाच्या आदेशाचा लाभ मिळणे आवश्यक असल्याचे संस्थांच्या वतीने मांडण्यात आले.

न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावून संबंधित ४८ संस्थांना अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. त्यानंतर देविदास मिसाळ आणि नारायण परजने यांच्याविरुद्ध 'सु-मोटो' अवमान कारवाईची नोटीस बजावण्यात आली.

न्यायालयाने वगळण्यात आलेल्या सर्व ४८ संस्थांचा पक्क्या मतदार यादीत तत्काळ समावेश करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे गोकुळ दूध संघाच्या अंतिम मतदार यादीतील संख्या ५ हजार ३३२ वरून ५ हजार ३८० इतकी होणार आहे. या निर्णयामुळे अवसायनातील ४८ संस्थांना गोकुळच्या आगामी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# विखे–पाटील यांनी समाजाचे नुकसान केले–जरांगे पाटील

(पान १ वरून)

'विखे–पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना जाब विचारला पाहिजे आणि जातीसाठी मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे,' अशी मागणीही जरांगे यांनी केली. फडणवीस मराठ्यांचे काम करू देत नाहीत, असे जाहीर करण्याची हिंमत विखे पाटील यांनी दाखवावी, असे आव्हानही त्यांनी दिले.

हैदराबाद आणि सातारा गॅझेट, तसेच ५८ लाख कुणबी नोंदींच्या प्रमाणपत्रांचा मुद्दा उपस्थित करत जरांगे यांनी सरकारवर टीका केली. या मागण्यांबाबत आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. ईसीबीसीचा मुद्दाही त्यांनी उपस्थित करत सरकारच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दरम्यान, जरांगे यांच्या आरोपांना उत्तर देताना राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारने मराठा समाजाच्या प्रश्नावर आवश्यक ते निर्णय घेतले असून त्यांची अंमलबजावणीही सुरू असल्याचे सांगितले. शासनाकडून जे-जे निर्णय करणे आवश्यक होते ते आपण केलेले आहेत. त्यात जर त्यांचे समाधान होत नसेल तर माझ्याकडे त्यांचे समाधान करण्यासाठी दुसरा पर्याय नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

तब्बल ५८ लाख कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. या नोंदी ग्रामपंचायती स्तरावर प्रसिद्ध करण्यात आल्याचे सांगत, १० ते १७ सप्टेंबरदरम्यान मंडलनिहाय शिबिरे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

पात्र व्यक्तींनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे आवश्यक असल्याचे सांगताना आतापर्यंत ५२२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २२४ अर्ज दाखल्यासंदर्भातील असल्याचे त्यांनी नमूद केले.मराठा आंदोलनाच्या माध्यमातून राजकारण केले जात आहे का, याबाबत विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या प्रश्नावर पुढाकार घेतल्याचा दावा केला. 'ज्या नेत्यांनी दिले नाही, ते या दोन नेत्यांनी दिले. जे काम करत आहेत त्यांना तुम्ही नाव ठेवणार का?' असा सवाल त्यांनी केला.

'सरकार एक पाऊल पुढे आले आहे, आता जरांगे यांनी दोन पावले पुढे यायला हवे,' असे आवाहन विखे–पाटील यांनी केले. सरकारकडून सकारात्मक पावले उचलली गेली असून आता तोडगा काढण्यासाठी जरांगे पाटील यांनीही सरकारला प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# कर्ज, विमा, बचत, पेन्शन सर्वांसाठी सुलभ करा

(पान १ वरून)

त्यांना जागतिक स्तरावर जोडण्याचे काम करावे, असे आवाहन मोदी यांनी केले.

फिनटेकच्या माध्यमातून आर्थिक समावेशन कसे साधता येते, याचे उदाहरण देताना मोदी यांनी पीएम स्वनिधी योजनेचा उल्लेख केला. देशातील लाखो फेरीवाले आणि छोट्या विक्रेत्यांना औपचारिक कर्जव्यवस्थेशी जोडण्यात फिनटेकची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली असून, लाभार्थ्यांना आता स्वनिधी क्रेडिट कार्डसारख्या औपचारिक कर्ज सुविधाही मिळत आहेत.

स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांच्या सरासरी वार्षिक उत्पन्नात २० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे सांगत मोदी यांनी या योजनेमुळे निवास, पोषण, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणाच्या स्थितीतही सुधारणा झाल्याचे नमूद केले.

जग संघर्ष, आर्थिक अनिश्चितता, ऊर्जा व वस्तूंच्या पुरवठा साखळीवरील दबाव आणि व्यापारविषयक तणावातून जात असताना भारताने एप्रिल–जून तिमाहीत ७.८ टक्के विकासदर नोंदवला आहे. हा विकासदर जगाला नवा विश्वास देणारा असल्याचे मोदी म्हणाले.

**'डिजिटल इंडिया'च्या नव्या अध्यायासाठी भारत सज्ज**

भारताच्या फिनटेक यशाची कहाणी व्यापकता, सुरक्षितता, लोकशाहीकरण, तंत्रज्ञान आणि जनतेचा विश्वास या पाच आधारस्तंभांवर उभी आहे. आता याच मूल्यांच्या आधारावर पुढील पिढीतील नवोन्मेषावर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे, असे मोदी यांनी स्पष्ट केले. भारताची 'फिफ्ॉर्म एक्सप्रेस' आणखी वेगाने पुढे जाईल आणि 'डिजिटल इंडिया'च्या यशोगाथेचा नवा अध्याय लिहिण्यासाठी देश सज्ज आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

## साधना साळुंखे यांचे निधन

■ इचलकरंजी,ता.८(प्रतिनिधी)–



**इचलकरंजी नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा श्रीमती साधना विलासराव साळुंखे यांचे निधन झाले. त्या ७४ वर्षांच्या होत्या.**

इचलकरंजीचे दिवंगत नगराध्यक्ष बापूसाहेब मोरे यांच्या राजकारणाचा वारसा चालवत त्यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम केले. नगरसेविका असताना प्रभागातील समस्या सोडविण्या बरोबरच त्यांच्यासमवेत असलेल्या नगरसेविकांच्या एका गटाच्या माध्यमातून महिलांचे कौटुंबिक प्रश्न सोडविण्यामध्ये त्या सक्रीय होत्या. त्यांचे पती विलासराव साळुंखे यांनी माध्यम क्षेत्रामध्ये दीर्घकाळ काम केले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, नातवंडे, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश मोरे यांच्यासह २ भाऊ, बहिणी असा परिवार आहे.

## ग्रामस्थांचा तहसीलवर मोर्चा

(पान १ वरून)

कार्यालयाचे लोखंडी गेट तोडले. यावेळी गेट अंगावर पडल्याने एक पोलिस कर्मचारी किरकोळ जखमी झाल्याचे सांगण्यात येते. गेट तोडल्यानंतर आंदोलकांनी प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराकडे मोर्चा वळवला. यावेळी प्रवेशद्वाराच्या काचा फोडण्यात आल्या. त्यामुळे कार्यालय परिसरात काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला.तहसील कार्यालयात प्रवेश केल्यानंतरही सक्षम अधिकाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांची थेट भेट घेतली नसल्याने आंदोलकांचा संताप आणखी वाढला. आंदोलकांनी कार्यालयातच ठिय्या मांडला.प्रस्तावित एमआयडीसीला विरोध करणाऱ्या माजी सैनिक आणि शेतकऱ्यांवर जयसिंगपूर येथे मागील महिन्यात आ. पाटील यड्रावकर यांच्या समर्थकांनी हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेनंतर सैनिक टाकळीतील ग्रामस्थ,माजी सैनिक आणि महिलांमध्ये संतापाचे वातावरण होते. याच पार्श्वभूमीवर हे आंदोलन झाले. शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांनी आंदोलनाचे नेतृत्व केल्याने मोठ्या संख्येने आंदोलक शिरोळमध्ये दाखल झाले. एमआयडीसीचा प्रस्ताव रद्द होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका आंदोलकांनी घेतली.

# रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर येणार

(पान १ वरून)

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यात शुक्रवारी होणाऱ्या या बैठकीला दुजोरा देत भारताला रशियाचा 'धोरणात्मक भागीदार' असे संबोधले आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी मंगळवारी या बैठकीच्या अजेंड्याबाबत माहिती देताना सांगितले की, भारतात नवीन अणुऊर्जा प्रकल्प उभारणे आणि एसयू–५७ लढाऊ विमानांबाबत चर्चा होणार आहे. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांच्या प्रवक्त्यांनी रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के शुल्क लावण्याच्या अमेरिकेच्या प्रस्तावित निर्णयावर म्हटले की, हे बेकायदेशीर आणि अस्वीकार्य आहे. त्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये या निर्बंधांबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे.युक्रेन संघर्षाचा शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी भारत करत असलेल्या प्रयत्नांचे आम्ही स्वागत करतो. दरम्यान, पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची नुकतीच एससीओ शिखर परिषदेदरम्यान भेट झाली होती. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी युध्द समाप्त करण्याचे आवाहन केले होते. दिमित्री पेस्कोव्ह यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यात चांगले संबंध आहेत आणि जगभरातील विविध मुद्द्यांवर दोन्ही नेते नियमितपणे एकमेकांशी चर्चा करत असतात. पेस्कोव्ह यांनी अधिकृत पत्रकार परिषदेदरम्यान सांगितले की, भारत हा आमचा धोरणात्मक भागीदार आहे. हे दोन्ही देशांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की, दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्यही सातत्याने वाढत आहे.याशिवाय, भारतीय नागरिकांना जबरदस्तीने रशियन सैन्यात भरती करण्याबाबत विचारण्यात आले असता त्यांनी सांगितले की, सध्या रशियातील युध्दभूमीवर किती भारतीय नागरिक आहेत, याची यादी तयार केली जात आहे.

## खंडणी प्रकरण;महिलेस अटक

(पान १ वरून)

प्रकरणावर समेटचाराने तोडगा काढण्यासाठी पोलीस ठाण्याबाहेर चर्चा सुरू असताना अश्विनी वेताळ व शबाना मुल्ला यांनी प्रा. भिंगारे यांच्याकडे तीन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. पैसे न दिल्यास त्यांना विनयभंगाच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची, तसेच संबंधित व्हिडिओ व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी देण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या प्रा. भिंगारे यांनी अखेर शहर पोलीस ठाण्यात दोन्ही महिलांविरुद्ध फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान वेताळ हिला मंगळवारी अटक करण्यात आली. तिला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणातील मुल्ला हिचा पोलीस शोध घेत आहेत.

✻ मुंबई,ता.८ –राज्यातील पोलीस भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ, सुव्यवस्थित आणि कालबद्ध करण्यासाठी वार्षिक भरती वेळापत्रक तयार करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्यमंत्री (गृह) योगेश कदम यांनी दिले.उमेदवारांना भरती प्रक्रियेची निश्चित माहिती मिळून पूर्वतयारीसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध व्हावा, यासाठी भरती प्रक्रियेचे नियोजन अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

### विखेंनी राजीनामा द्यावा
मराठा क्रांतीची मागणी

■ नाशिक,ता.८–

मराठा क्रांती मोर्चाची राज्यस्तरीय बैठक आज नाशिक येथे राज्यातील विविध जिल्ह्यातील समन्वयक व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली.या बैठकीत मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून राज्य सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

## पुण्यात ध्वनिप्रदूषण करणाऱ्या ११६ मंडळांवर कारवाई

■ पुणे,ता.८–

**डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला पुणेकरांचा वाढता विरोध आणि पोलिसांनी निश्चित केलेली 'चार बेस, चार टॉप'ची मर्यादा असतानाही ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांवर पुणे पोलिसांनी कारवाई केली आहे.**



निर्धारित ध्वनीपातळी ओलांडल्याप्रकरणी शहरातील ११६ मंडळांवर खटले दाखल करण्यात आले आहेत. दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरातील तब्बल १ हजार १०० मंडळांच्या ध्वनीपातळीचे रीडिंग घेतले होते. यामध्ये शहराचा मध्यवर्ती भाग असलेल्या परिमंडळ एकमध्ये सर्वाधिक ५५ मंडळांवर कारवाई करण्यात आली.

काही मंडळांनी डीजे न वापरण्याची भूमिका घेतली असतानाही शहरातील मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात ध्वनिप्रदूषण झाल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले.

ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याने आगामी उत्सवांमध्ये ध्वनीमर्यादेचे पालन करण्याबाबत मंडळांवर दबाव वाढला आहे.

# गणेश ग्रामीण पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

■ तारदाळ,ता.८ (वार्ताहर)–

**तारदाळ येथील श्री गणेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था तारदाळ या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन संजय सांगावे होते**



वार्षिक सभेत बोलताना चेअरमन संजय सांगावे शेजारी प्रसाद खोबरे, व्हाईस चेअरमन अण्णासो हिंगमिरे व इतर मान्यवर.

सांगावे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. सेक्रेटरी बाळासो जाधव यांनी दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर–संस्थेचे चेअरमन सांगावे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले अहवाल सालात संस्थेकडे भाग भांडवल ३७ लाख २१ हजार,एकूण निधी ९१ लाख ७ हजार, कर्जे ४ कोटी १० लाख, एकूण ठेवी ५ कोटी २९ लाख इतक्या आहेत. चालू वर्षी संस्थेस नफा १० लाख ६२ हजार ४९५ रूपये इतका झाला आहे. सचिव जाधव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जि. प.सदस्य प्रसाद खोबरे, वसंतराव चौगुले, चंद्रकांत तांबवे, रमेश नमदे, गजानन खोत, दिलीप खोत, रमेश नमदे तसेच व्हा.चेअरमन आण्णासो हिंगमिरे, संचालक कुमार चौगुले, सुखनिवास डपाले, महांतेश पाटील, गौस मुजावर, बाबासाहेब कांबळे, संचालिका अर्चना नमदे, वैशाली सांगावे इत्यादी उपस्थित होते. आभार कुमार चौगुले यांनी मानले.



॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



मायेची गेली सावली,
करुणेचा हरवला सागर।
उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला।।

कै.सविताबेन नारायणभाई पटेल

हेमंत नारायणभाई पटेल ✻ सौ. ज्योती हेमंत पटेल
अशोककुमार ठाकुरभाई पटेल ✻ सौ. हिना अशोककुमार पटेल
आशिषकुमार ईश्वरभाई पटेल ✻ सौ. किनरी आशिषकुमार पटेल
पटेल परिवार, इचलकरंजी

॥ भावपूर्ण शोक-संदेश ॥



श्री प्रविण चंद्रकांत सारडा

हमारे परिवार के श्री प्रविण चंद्रकांत सारडा का दुःखद निधन मंगलवार, दि. ०८ सितंबर २०२६ को इचलकरंजी में हो गया। परमात्मा दिवंगत आत्मा को अपने श्रीचरणों में स्थान प्रदान करें।

-: शोकाकुल :-
समस्त सारडा परिवार
इचलकरंजी

अंतिम यात्रा : बुधवार, दि. ०९ सितंबर २०२६ प्रातः ९:३० बजे निवास स्थान से, वेद भवन के सामने, इचलकरंजी

॥ प्रथम स्मृतिदिन ॥



कै.हणमंत रामचंद्र वाळवेकर

मायेची गेली सावली,
करुणेचा हरवला सागर !
उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला !
प्रथम स्मृतिदिनास
विनम्र अभिवादन...!

श्रीमती वंदना हणमंत वाळवेकर
प्रसाद विश्वनाथ झाड
सौ. ऐश्वर्या प्रसाद झाड
वाळवेकर परिवार, इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



कै.श्रीमती साधना विलासराव साळुंखे

आमच्या पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष श्री. प्रकाशराव मोरे यांच्या भगिनी श्रीमती साधना विलासराव साळुंखे, माजी उपनगराध्यक्षा यांचे सोमवार, दिनांक ७/९/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वर चरणी प्रार्थना...! त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत

✻ चेअरमन, संचालक मंडळ, सभासद व ऑफिस स्टाफ ✻
यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था लि; इचलकरंजी

✻ रक्षाविसर्जन : बुधवार, दि. ९/९/२०२६ रोजी सकाळी ८.३० वा. पंचगंगा नदीतिरी येथे

# घरात घुसून मारहाण: रिक्षाची मोडतोड, नऊ जणांवर गुन्हा

सांगली, ता.८(प्रतिनिधी )–

**घराच्या भिंतीवर थुंकल्याचा जाब विचारला म्हणून एका कुटुंबाला घरात घुसून बेदम मारहाण करण्यात आली, त्यांच्या घराच्या दरवाजावर लाथा घालून घरासमोर उभ्या असलेल्या रिक्षाची काच फोडून मोठे नुकसान केल्याचा प्रकार चिंतामणी नगर मध्ये घडला आहे. याप्रकरणी संजयनगर पोलिसांनी काही महिलांसह नऊ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

शहरातील चिंतामणीनगर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या सुनीता सुनील मोहिते यांनी मारहाण आणि रिक्षाची मोडतोड केल्याची फिर्याद दिली आहे. या फिर्यादीची दखल घेऊन पोलिसांनी संशयित विजय मोटे, मंथन मोटे, अथर्व माळी,ओंकार माळी, अनिता मोटे, सावित्री मोटे, कविता माळी, शुभांगी माळी, दीपक मोटे (सर्वजण रा. चिंतामणीनगर झोपडपट्टी) आदींच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. रविवारी शेजारी राहणाऱ्या दीपक मोटे याच्या घराला रंग देण्याचे काम सुरू होते. त्यावेळी रंग देणाऱ्या कामगारांपैकी एकजण भिंतीवर थुंकला. याचा जाब मोहिते यांनी विचारल्याचा राग आल्याने संशयितांनी मोहिते यांच्या घराच्या दरवाजावर लाथा घालून घरात घुसून शिवीगाळ करून बेदम मारहाण केली.

# श्री आदिनाथ बँकेच्या चेअरमनपदी चंद्रकांत मगदूम

## व्हा. चेअरमन पदी मधुकर मणेरे

इचलकरंजी,ता.८–

**येथील श्री आदिनाथ को–ऑप. बँकेच्या रिक्त झालेल्या चेअरमन व व्हा. चेअरमन पदासाठीची निवड सहकारी संस्था हातकणंगले उपनिबंधक एन.ए.परजणे यांचे अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये चेअरमनपदी चंद्रकांत पारीसा मगदूम यांची आणि व्हाईस चेअरमनपदी मधुकर देवाप्पा मणेरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**


चंद्रकांत मगदूम


मधुकर मणेरे

चेअरमन पदासाठी चंद्रकांत मगदूम यांचे संचालक बाळासाहेब पारीसा चौगुले यांनी तसेच अभयकुमार मगदूम यांनी व्हा.चेअरमन पदासाठी मधुकर मणेरे यांचे नांव सुचविले. त्यास अनुक्रमे संचालक सुभाष काडाप्पा व श्रेणिक मगदूम यांनी अनुमोदन दिले. निवडीनंतर एन. ए. परजणे व ज्येष्ठ संचालकांच्या हस्ते नूतन चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयकुमार उपाध्ये यांनी केले. नुतन चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी, संस्थापक चेअरमन स्व. आप्पासो मगदूम यांचे स्मरण करत बँक सक्षम असून पूर्वीपासून गुणवत्तापूर्ण कामकाज करत आली असून पुढील काळातही करणार असल्याची ग्वाही दिली. याप्रसंगी संचालक सुदर्शन खोत, अनिल बम्मणणावर, संपत कांबळे, गुरूनाथ हेरवाडे, सुकुमार पोते, संचालिका सौ. मंगल देवमोरे, सौ. अनिता चौगुले उपस्थित होते.

# आरक्षित जागांच्या मोबदल्यासाठी १०० कोटींचा निधी

## आमदार राहुल आवाडे यांच्या पाठपुराव्याला यश

इचलकरंजी,ता.८–

**इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील विकास आराखड्यातील विविध विकासकामांसाठी आरक्षित जागा संपादनासाठी १०० कोटी रुपयांचा विशेष निधी देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूरी दिली आहे. या संदर्भात आमदार राहुल आवाडे यांनी शासन दरबारी केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला असून, शहराच्या विकासातील एक मोठा आर्थिक अडसर दूर झाला आहे.**

इचलकरंजी शहराच्या विकास योजनेत अनेक भूखंड रस्ते, उद्याने, शाळा, दवाखाने, खेळाची मैदाने आणि सार्वजनिक सुविधांसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहेत. मात्र, या जागांच्या भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी महापालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून हे प्रकल्प रखडले आहेत. संबंधित जागामालकांना मोबदला न मिळाल्यामुळे कायदेशीर अडचणी व विकासकामांना ब्रेक लागत होता. शिवाय जागा मालकास मोबदला वेळेत मिळत नसल्याने काही व्यापारी, एजंट हे कमी दरात करार करून जागा हडपण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर लोकप्रतिनिधींना हाताशी धरून कायदेशीर नोटीस देऊन महानगरपालिकेकडून संबंधित जागेवर टाकण्यात आलेले आरक्षण रद्द करुन घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर टीडीआरनुसार होणारी रक्कम घेण्यास जागा मालक नकार देत असल्याने विकासकामात अडचणी निर्माण होत असल्याबद्दल आमदार आवाडे यांनी सविस्तर विवेचन केले.या सर्व पार्श्वभूमीवर आमदार राहुल आवाडे यांनी राज्य शासनाकडे विशेष आर्थिक तरतुदीची मागणी लावून धरली होती. १०० कोटींच्या या भरीव निधीमुळे महापालिकेला जागांचे तातडीने भूसंपादन करून ज्या कारणांसाठी त्या आरक्षित केल्या त्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करता येणार आहे. या माध्यमातून शहराचा सुनियोजित विस्तार होण्याबरोबरच वाढत्या लोकसंख्येला पुरेशा सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणे शक्य होईल.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी करताना आम. राहूल आवाडे शेजारी महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या,स्थायी समितीचे अध्यक्ष सतिश मुळीक

इचलकरंजी शहराचा कायापालट करण्यासाठी सुनियोजित पायाभूत सुविधांची उभारणी आवश्यक आहे. आरक्षित जागांच्या मोबदल्याचा प्रश्न सुटल्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेली विकासकामे आता प्रत्यक्षात येतील. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे आमदार राहुल आवाडे यांनी म्हटले आहे.



# टोप येथे उड्डाणपुलाच्या कॉलमवरील सळ्या काढण्यास सुरुवात

## सहापदरीकरणाच्या कामाचा बोजवारा

टोप,ता.८ (प्रतिनिधी) –

**टोप येथील राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या सहापदरीकरणाच्या कामातील उड्डाणपुलाच्या कॉलमसाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी सळ्या गॅस कटरच्या साहाय्याने कापून काढण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून संबंधित ठेकेदार कंपनीकडून कॉलमवरील लोखंडी स्ट्रक्चर कापून काढले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या सहापदरीकरणाच्या कामाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

टोप परिसरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम रखडल्याने दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. तसेच अपघातांचा धोकाही कायम आहे. उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन वाहतूक सुरळीत होण्याची अपेक्षा असताना, पिलरसाठी उभारण्यात आलेले लोखंडी स्ट्रक्चरच कापून काढले जात असल्याने वाहनचालक व स्थानिक नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. पेठनाका ते कोगनोळी या मार्गावरील सहापदरीकरणाचे काम यापूर्वी एका कंपनीकडे होते. कामातील दिरंगाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून संबंधित कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

# मद्यधुंद ट्रकचालकाची एसटीला धडक

सरुड,ता.८(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर–रत्नागिरी मार्गावरील भाडळी खिंड येथे मद्यधुंद अवस्थेत ट्रक चालवणाऱ्या चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात समोरून येणाऱ्या एसटी बसला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी शाहूवाडी पोलिस ठाण्यात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी बसचालक सचिन आनंदराव चिले हे एसटी बस घेऊन जात होते. यावेळी समोरून कोळसा वाहतूक करणारा ट्रक येत होता. ट्रकचालक रेवनाप्पा श्रीसाहिल कोडवण्णा (वय ३४, रा. अहिरसंग, ता. इंडी) याने मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगाने तसेच चुकीच्या बाजूने ट्रक चालवत एसटी बसच्या उजव्या बाजूला जोरदार धडक दिली.

धडकेमुळे एसटी बसचे तसेच ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात एसटी चालक सचिन चिले जखमी झाले.

अपघातानंतर सचिन चिले यांनी शाहूवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून ट्रकचालक रेवनाप्पा कोडवण्णा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास शाहूवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक परशुराम शिरसाट व संभाजी पाटील करत आहेत.

# जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याची मोहिम बंद करा

## पॉवरलूम असो.चा इशारा

इचलकरंजी,ता.८ –

**स्मार्ट मीटरमुळे एम.डी. शुट होऊन वीज बिले तिप्पट ते चौपट येत असल्यामुळे यंत्रमाग व इतर उद्योजकांचा स्मार्ट मीटरवर विश्वास नसल्याने त्याला विरोध आहे. परंतु, महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उद्योजकांवर दबाव आणून दडपशाहीने मीटर बदलण्याच्या पद्धतीचा इचलकरंजी पॉवरलूम असोशिएशनच्या वतीने जाहीर निषेध नोंदवत विरोध दर्शविण्यात आला आहे. त्याचबरोबर उद्योगाच्या ठिकाणीच असलेल्या मीटरनुसारच येणारी बिले भरली जातील. जबरदस्तीने मीटर बसविणेची मोहिम तात्काळ बंद करावी, असा इशाराही देण्यात आला आहे.**

या संदर्भात दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनच्या शिष्टमंडळाने महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्निल काटकर व अधिक्षक अभियंता जी.एम. लटपटे यांची भेट घेऊन स्मार्ट मीटरला विरोध दर्शविणारे निवेदन दिले. यावेळी इचलकरंजी विभागाचे कार्यकारी अभियंता वैभव गोंदील उपस्थित होते.




निवेदनात, कांही दिवसांपासून इचलकरंजी व परिसरात महावितरणकडून जुने वीज मिटर बदलली जात आहेत. जे उद्योजक मिटर बदलण्यास विरोध करीत आहेत, त्यांच्यावर दडपशाहीने भिती घालून दबाव आणत जबरदस्तीने मीटर बदलले जात आहेत. महावितरणचे कनिष्ठ अधिकारी व वायरमन दादागिरीची भाषा व वीज तोडणेची धमकी देण्यासह संपूर्ण भाग सिंगल फेज किंवा लाईट बंद करून मीटर बदलली जात आहेत. त्यामुळे उद्योजक व महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये वादाचे व संघर्षाचे प्रकार घडत आहेत.

वीज जोडणीत फॉल्ट अथवा तांत्रीक दोष निर्माण करून तो दुरूस्त करायचा असल्यास मीटर बदलुन घ्यावेच लागेल किंवा मीटरचे रिडींग घेणार नाही अशी धमकी दिली जात आहे. त्यामुळे जागोजागी संघर्ष निर्माण होत आहे. तर आम्हाला निलंबनाची धमकी अधिकाऱ्यांकडून दिली जात असल्याचे उत्तर मिळत आहे. शिवाय काही ठिकाणी डांबावर मीटर बसविणेत आलेली असून असे कृत्य महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून होत आहे. त्यामुळे जबरदस्तीने मीटर बसविणेची मोहिम बंद करावी असे निवेदनात म्हटले आहे.

शिष्टमंडळामध्ये पॉवरलूम असोशिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष रफिक खानापूरे, संचालक सतीश कोष्टी, राजगोंडा पाटील व प्रकाश गौड यांच्यासह यंत्रमागधारकांचा समावेश होता.

# बार व बेंच यांचे समन्वयातून न्यायालयीन कामांचा जलद निपटारा

## न्यायाधीश एस. एस. तांबे

इचलकरंजी,ता.८–

**दि इचलकरंजी बार असोसिएशन, इचलकरंजी तर्फे नविन रुजू झालेल्या जिल्हा न्यायाधीश एस.एस. तांबे यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. न्यायाधीश एस.एस. तांबे यांचे स्वागत सिनिअर ॲड. अनिल रुईकर यांनी केले. यावेळी न्यायाधीश तांबे यांनी बार व बेंच यांचे समन्वयातून न्यायालयीन कामकाजांचा जलद निपटारा होणे शक्य असलेबाबत नमूद केले.**

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश एल.डी. बिले, न्यायाधीश जी.एम. नदाफ व ॲड. अनिल रुईकर यांनी वकिलांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजगोपाल तोष्णीवाल यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महिला प्रतिनिधी दिपाली हणबर यांनी केले तर आभार सेक्रेटरी अभिजीत माने यांनी मानले.


नुतन जिल्हा न्यायाधीश एस.एस. तांबे यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करताना ॲड अनिल रूईकर शेजारी जिल्हा न्यायाधीश एल.डी. बिले, न्यायाधीश जी.एम. नदाफ ,बार असो.चे अध्यक्ष ॲड राजगोपाल तोष्णीवाल व इतर.

कार्यक्रम यशस्वी करणेसाठी दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष राजगोपाल तोष्णीवाल, उपाध्यक्ष राजाराम सुतार, सेक्रेटरी अभिजीत माने, जॉ. सेक्रेटरी आदित्य मुदगल, खजिनदार विजय शिंगारे, महिला प्रतिनिधी दिपाली हणबर, कार्यकारिणी सदस्य महेश कांबळे, राहुल काटकर, शैलेंद्र रजपूत, किर्ती जैद, . अर्चना कुलकर्णी, कोल्हापूर जिल्हा नोटरी संघाचे अध्यक्ष सिनिअर ॲड. अमित सिंग,अरुण बडवे, डी.एम. लटके, एस.एस. कुलकर्णी, संजय गजबी, ॲड. इरफान जमादार, एस.बी. सावेकर, बी.डी. पाटील, आयुब कोतवाल, शरद शिंदे व क्लार्क प्रविण फगरे तसेच इचलकरंजी बार असोसिएशनचे सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

## फाळणी बारा पत्रकाची नोंद रखडल्याने

# मंडल अधिकारी कार्यालयाला कुलूप ठोकले

कबनूर,ता.८(वार्ताहर)–

**येथील गट क्रमांक १०१७/२/२ च्या फाळणी बारा पत्रकाची नोंद करण्याचे आदेश अप्पर तहसीलदार महेश खिलारी यांनी ता.२८ जुलै २०२६ रोजी ग्रामसहसूल अधिकाऱ्यांना दिले होते.आदेश झाल्यानंतर एक महिन्यानी त्यांनी नोंद घातली. तथापि मंडल अधिकारी राजु बावणे यांनी अद्याप सदरची नोंद मंजूर न केलेने माजी सरपंच उदय गिते यांनी सोमवारी सायंकाळी मंडल अधिकारी कार्यालयास कुलूप लावले.त्यामुळे गावात एकच खळबळ उडाली आहे.**

माजी सरपंच श्री गीते म्हणाले,तलाठी कार्यालयात वारंवार पाठपुरावा केल्यानंतर नोंद घालण्यात आली.मात्र,त्यानंतर मंडल अधिकाऱ्यांकडून सदर नोंद मंजूर होणे आवश्यक आहे.याबाबत अनेकवेळा संपर्क करूनही विलंब करण्यात येत आहे.दरम्यान मंडल अधिकारी श्री.बावणे यांनी सोमवारी संध्याकाळपर्यंत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.मात्र,दुपारी चार नंतर ते कार्यालयात उपस्थित नव्हते.त्यामुळे सायंकाळी मी तलाठी मंडल अधिकारी कार्यालयाला कुलूप लावले.



तलाठी कार्यालयात मंडल अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून नोंद मंजूर करून त्याची प्रत दिल्यानंतरच मंडळ अधिकारी कार्यालयाची चावी देण्यात येईल,अशी भूमिका श्री.गीते यांनी घेतली.

मंगळवारी सकाळी कार्यालयास कुलूप लावलेले पाहून मंडल अधिकारी श्री.बावणे यांनी तहसीलदार व प्रांताधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सदरची बाब सांगितली आणि त्यांच्या परवानगीने कुलूप तोडून आपल्या कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात केली.

**दिवसभर शासकीय कामात असल्याने विलंब**

मंडल अधिकारी श्री.बावणे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले ,काल दिवसभर मी शासकीय कामातच होतो.त्यामुळे सदर प्रकरणास मंजुरी देण्यास वेळ मिळाला नाही. आज सकाळी सदर कामास मंजुरी दिली आहे.

# थकबाकीपोटी सुमारे तीन लाख वसूल

कोल्हापूर, ता. ८ (प्रतिनिधी)–

**महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा विभागामार्फत शहर व संलग्नीत ग्रामीण भागात थकबाकीदार व अनाधिकृत नळ कनेक्शनविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.**

शहर व ग्रामीण भागातील मोठे थकबाकीदार तसेच अनाधिकृत नळ कनेक्शनधारकांचे कनेक्शन खंडीत करण्याची कारवाई वेळोवेळी करण्यात येत आहे. याअंतर्गत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व उपद्रव शोध पथकामार्फत शहरातील विक्रमनगर परिसरात मोठे थकबाकीदार नळ कनेक्शनधारक यांच्यावर कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान ६ थकबाकी धारकांची कनेक्शन तोडण्यात येऊन थकबाकीपोटी रू.२ लाख ९५ हजार ८४७ रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करण्यात आली आहे.

# महावितरणकडून विशेष मोहिमेत ५१३ वीज चोरांवर कारवाई

कोल्हापूर, ता. ८ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर परिमंडल कार्यालय अंतर्गत येणाऱ्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात राबविलेल्या विशेष मोहिमेत ५१३ ठिकाणी अनधिकृत वीज वापर करणाऱ्यांना महावितरणकडून दणका देण्यात आला आहे. यामध्ये मीटरमध्ये फेरफार केलेल्या कोल्हापूर मंडलात ८३ वीज चोऱ्यांचा तर सांगली मंडलात २८० वीजचोरांचा समावेश आहे.**

नियमानुसार दंड व वीज चोरीच्या रकमेचा भरणा न करणाऱ्या या वीज चोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. तर अनधिकृत वीज वापराचे १५० प्रकार आढळून आले आहेत.

वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी वीज चोरीविरुद्ध कोल्हापूर परिमंडल अंतर्गत नियमित कारवाई सुरु असते. त्यानुसार कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमध्ये वीज चोरीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ४७४१ तर सांगली जिल्ह्यात २९९० वीज ग्राहकांची तपासणी करण्यात आली.

वीज चोरीविरुद्ध नियमितपणे सुरु असलेली मोहीम आणखी तीव्र करण्याचे निर्देश कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी दिले आहेत.

विजेची चोरी करण्याऐवजी अधिकृत वीज जोडणी घेऊन सुरक्षित वीजपुरवठा घ्यावा व फौजदारी कारवाई व कारावासाची शिक्षा टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

SIDDHAGIRI GURUKUL FOUNDATION'S
SIDDHAGIRI NURSING INSTITUTE
A/P : KANERI,
TAL : KARVIR, DIST : KOLHAPUR 416234
E Mail : siddhagirinursingcollege@gmail.com,
7767011008 / 9356872628
ADMISSION OPEN NOTIFICATION
ACADAMIC YEAR 2026-27

- Candidate Must Submit application in process at institute
- Last date of application receipt....
- The details schedule will be published on college website

Course : **Post Basic B.Sc. Nursing**
Duration : **2 Year**
Eligibility : **As per MUHS Rules**
Website : **www.snik.in**
Contact Details : **7767011008**

श्री. संतकृपा शिक्षण संस्थेचे
**श्री. संतकृपा कॉलेज ऑफ फार्मसी घोगांव, ता.कराड जि. सातारा**
**थेट व्दितीय वर्ष फार्मसी प्रवेश 2026-27**
(After CAP Admissions)
Vacancy after Against CAP Admission - 4*

थेट व्दितीय वर्ष फार्मसी After CAP मध्ये प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांनी दिनांक - 09-09-2026 ते 11-09-2026 3.00 PM पर्यत महाविद्यालयाकडे अर्ज करावेत.

थेट व्दितीय वर्ष मध्ये प्रवेश होणाऱ्या जागा प्रवेशाचे वेळापत्रक व फी तपशील आमच्या www.sscop.org या संकेतस्थळावर पाहता येईल.

–: प्रवेशासाठी संपर्क : –
9158008220 / 9158008312 / 9158008182
* Indicate Seat increased due to cancellation of Admission.

प्राचार्य
श्री. संतकृपा कॉलेज ऑफ फार्मसी, घोगांव
ता. कराड, जि. सातारा

सचिव
श्री. संतकृपा शिक्षण संस्था, घोगांव
ता. कराड, जि. सातारा


विश्वगुरु बसवण्णा

**लिंगायत समाजाची कौटुंबिक माहिती संकलन पुस्तिकेसाठी**

|| कायकवे कैलास ||

**आवाहन**

**इचलकरंजी** – लिंगायत समाजासाठी निःस्वार्थीपणे योगदान दिलेले **लिंगैक्य श्री. ज्ञानबा दत्तवाडे (तात्या)** व **लिंगैक्य श्री. मल्लय्या स्वामी (दादा)** यांच्या स्मरणार्थ लिंगायत समाजाची कौटुंबिक माहिती संकलन करून त्याची एक अद्ययावत संपर्कसूची तयार करण्यात येणार आहे.

समाज बांधव व शहरातील अत्यावश्यक सेवा करणाऱ्या संस्था आणि शासकीय विभाग यांच्याशी संपर्क करता येईल अशी ही संपर्कसूची पुस्तिका तयार करण्यात येणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात किंबहुना पश्चिम महाराष्ट्रात एक आदर्श व लिंगायत समाज संदर्भ पुस्तिका म्हणून गौरव प्राप्त व्हावी अशी संपर्कसूची बनविण्याची कै. ज्ञानबा दत्तवाडे व कै. मल्लय्या स्वामी यांची इच्छा होती. त्यांची स्वप्नपूर्ती करणेचे काम हाती घेण्यात आले आहे. तरी समाजातील सर्व पोटजाती लिंगायत पंचम, वाणी, तेली, माळी, कोष्टी, कुंभार, बणगार वगैरे सर्व कुटुंबियांनी आपआपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती विहीत नमुन्यातील फॉर्म भरून द्यावा, असे आवाहन **श्री. प्रकाश ज्ञा. दत्तवाडे** व **श्री. अनिल म. स्वामी** यांच्या वतीने करण्यात येत आहे. विहित नमुन्यातील फॉर्म खालील पत्त्यावर आपण भरून द्यावेत ही विनंती. सदर फॉर्म मोफत दिले जातील.

१) **श्री बसवेश्वर नागरी सहकारी पत संस्था, १२ / ३१८ ड, गर्ल्स हायस्कूल समोर, इचलकरंजी. संपर्क : ०२३०–२४२५१३४**
२) **अक्कमहादेवी महिला नागरी सहकारी पत संस्था म., १६/२४/१ संभाजी चौक, इचलकरंजी. संपर्क : ०२३०–२४२०६१८**
३) **मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर सह. संघ लि., बस स्टँड जवळ, स्टेट बँकेच्या मागे, इचलकरंजी. संपर्क : ०२३०–२४२१९२४**
४) **शिवशक्ती ऑफसेट प्रिंटर्स, वीरशैव बँके जवळ, इचलकरंजी. संपर्क : ७३९१९१९५०२**

■ संपादकीय ■

# अस्वस्थतेच्या मुळाशी...

देशातील जनमानसात विविध कारणांवरून सध्या मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे,ही अस्वस्थता आता इतकी वाढली आहे की लोक स्वयंस्फूर्तीने संघटितपणे रस्त्यावर उतरून आपला आवाज उठवू लागले आहेत.या आंदोलनाची कारणे वेगवेगळी आहेत. सगळ्यांचा रोख सरकारच्या निष्क्रियेशी जोडला जातो आहे आणि ही अस्वस्थता बेफिकिर सरकारच्या विरोधातच आहे हे प्रामुख्याने येथे लक्षात घ्यावे लागेल.शेतकरी, विद्यार्थी, महिला, कामगार आणि एकूणच सामान्य नागरिक रस्त्यावर येण्यासाठी जणू संधीच शोधतो आहे,असे वाटू लागले आहे. एकट्या पुणे शहराचा विचार केला तर पुणे शहरात एकाच दिवशी नागरिकांचे तीन मोठे मोर्चे निघाले. पहिला मोर्चा डीजे विरोधातला होता.कर्णकर्कश आवाजावर प्रतिबंध घालावा, या मागणीसाठी याआधीही पुण्यात दोन वेळा आंदोलन झाले तरीही रविवारी जो मोर्चा सामान्य नागरिकांनी आयोजित केला होता त्याला मोठा प्रतिसाद मिळाला.या मोर्चाचे अधिकृत आवाहन केवळ समाज माध्यमातून केले गेले आणि तेवढ्या आधारावर लोक मोठ्या प्रमाणावर आपला असंतोष व्यक्त करते झाले. रविवारीच दुसरा मोर्चा हिंजवडीतील आयटी पार्कमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी काढला. या आयटी पार्कमध्ये अनेक दिवस पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे. खड्डे, कचरा, पिण्याचे पाणी,सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि मेट्रोला होत असलेला उशीर या समस्यांवरून हा मूक मोर्चा काढला गेला होता.रविवारीच तिसरा मोर्चा पुण्यात निवृत्त शिक्षकांनी काढला. जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या या मूक मोर्चामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर शिक्षक आणि निवृत्त शिक्षक सहभागी झाले होते. जुनी पेन्शन योजना लागू करा,अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. एकाच दिवशी इतक्या मोठ्या प्रमाणात निघणारे हे मोर्चे अस्वस्थ समाज मनाचेच निदर्शक आहेत.हा असंतोष केवळ स्थानिक पातळीवर नाही तर राज्य आणि केंद्र सरकारच्या विरोधातही आहे. राज्यातल्या कंत्राटदारांचे हजारो कोटी रुपये राज्य सरकारने थकवले असल्याने राज्यातील कंत्राटदार संघटनाही आता आक्रमक झाल्या आहेत.त्यांनी राज्यातल्या सर्व जिल्हाधिकारी कार्यालयापुढे केंद्र सरकारच्या विरोधात तर देशपातळीवरून विविध ठिकाणी सातत्याने आंदोलने होत आहेत, पण आंदोलकांच्या मूलभूत मागण्यांकडे लक्ष देण्याऐवजी लोकांचे लक्ष अन्यत्र विचलित करणे किंवा थातूरमातूर आश्वासने देऊन आंदोलकांना वाटेला लावणे असेच प्रकार सातत्याने सुरू आहेत.दिल्लीत विद्यार्थ्यांनी केलेला आक्रोश सगळ्या जगाने पाहिला. या आंदोलनाला इतका अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला की,सरकारी दडपशाहीचे भय आता युवकांनी झुगारून दिले आहे,असा एक ठोस संदेश त्यातून दिला गेला. दिल्लीतील विद्यार्थ्यांचे हे आंदोलन होण्यापूर्वी दिल्ली जवळच्याच नोएडा आणि फरिदाबाद येथील हजारो कामगार एके दिवशी अचानक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात एल्गार पुकारला. विविध कंपन्यांमधील कर्मचारी संघटितपणे एकाच वेळी रस्त्यावर उतरणे हे केवळ आणि केवळ त्यांच्यावर सुरू असलेल्या अन्यायाच्या विरोधातील असंतोषाचे प्रकरण आहे हे सरकारने ध्यानात घ्यायला हवे होते.पण सरकारने त्यातही पाकिस्तानचा अँगल आणला आणि हे आंदोलन देशद्रोही ठरवले. आंदोलकातील काही मोजक्या म्होरक्यांवर त्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले आणि हे आंदोलन दडपून टाकण्यात सरकारने यश मिळवले.वास्तविक किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करा आणि आम्हाला निदान किमान वेतन तरी द्या या इतक्या सामान्य मागणीसाठी कामगारांचे हे आंदोलन होते. ती मागणीसुद्धा तुम्ही झिडकारून लावत असाल तर ही असंतोषाची खदखद कामगारांच्या मनात कायम राहणार आहे आणि त्याचा उद्या आणखी मोठा स्फोट होणार आहे हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. सरकारच्या विरोधात आवाज उठवणे हा मोठा गुन्हा ठरला आहे.आपल्या मागण्यांचा उच्चारसुद्धा करायचा नाही ही जोरजबरदस्ती नागरिक आता सहन करणार नाहीत. हा देशाच्या कानाकोपऱ्यात सुरू असलेला असंतोषाचा वणवा अतिशय कौशल्याने हाताळायला हवा.त्यात समजूतदारपणाचीही भूमिका हवी. पण आपल्या विरोधात मोर्चा काढणारे सगळेच देशद्रोही आहेत अशीच जर सरकारची भूमिका कायम राहणार असेल तर या पुढील काळात जनक्षोभाचा स्फोट नेमक्या कशा पद्धतीने होईल याचा अंदाज लागेनासा झाला आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारला जबाबदारीचे भान कधी येणार हा मुख्य प्रश्न आहे.मुळात या सगळ्या असंतोषाला सरकारची बेजबाबदार धोरणे कारणीभूत आहेत हेही सरकारच्या लक्षात यायला हवे. जनतेला दिलेले शब्द आपण पाळत नाही, किमान मूलभूत गरजांकडे आपण लक्ष देत नाही, ही नकारार्थी भूमिका सरकारसाठी अडचणीची ठरत आहे, ही सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे.

# सोन्याचं अर्थकारण आणि धोरणे

**भारतीय कुटुंबांसाठी सोने ही केवळ गुंतवणूक नाही. लग्नकार्य, सण-उत्सव,सामाजिक प्रतिष्ठा आणि अडचणीच्या काळातील आधार अशा अनेक गोष्टींशी त्याचे नाते जोडले गेले आहे.त्यामुळे सोने खरेदी कमी करा, असे सांगणे सहज शक्य असले तरी भारतीयांची सोन्याविषयीची मानसिकता बदलणे तितके सोपे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे महिन्यानंतर पुन्हा एकदा नागरिकांना सोने खरेदी मर्यादित करण्याचे आवाहन केले आहे. त्यामागे व्यक्तिगत बचतीपेक्षा देशाच्या आयात खर्चाचे गणित अधिक महत्त्वाचे आहे.**

भारतात वर्षाला साधारण ७०० ते ९०० टन सोने आयात होते. चीननंतर भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा सोने ग्राहक आहे. देशांतर्गत मागणीचा बहुतांश भाग आयातीमधून भागत असल्याने सोन्याचा वाढता मोह अखेरीस देशाच्या व्यापार ताळेबंदावर येऊन आदळतो. मे महिन्यात पंतप्रधानांनी असेच आवाहन केल्यानंतर सोन्याच्या आयातीत झालेली घट लक्ष वेधून घेणारी आहे. 'मेटल्स फोकस' च्या आकडेवारीनुसार मेमध्ये भारताने २९.४ टन सोने आयात केले. मागील वर्षी याच महिन्यात ३०.६ टन आयात झाली होती.म्हणजे आयात जवळपास ४ टक्क्यांनी कमी झाली. त्यानंतर घट अधिक तीव्र झाली.जूनमध्ये आयात २० टक्क्यांनी,जुलैमध्ये २३.७ टक्क्यांनी आणि ऑगस्टमध्ये जवळपास ३० टक्क्यांनी घटली. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर सलग चार महिन्यांत दिसलेला हा कल दुर्लक्ष करण्यासारखा नाही. या घटीचे संपूर्ण श्रेय मात्र एका आवाहनाला देता येणार नाही.मेमध्ये सरकारने सोने आणि चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढविले. त्यामुळे आयात केलेले सोने महागले.त्याच काळात जागतिक बाजारातील सोन्याचे भावही चढे राहिले. महागड्या सोन्यामुळे ग्राहकांच्या खरेदीवर स्वाभाविक मर्यादा येतात.त्यामुळे आयातीतील घट ही पंतप्रधानांचे आवाहन, वाढलेले सीमाशुल्क आणि उच्च भाव या तिन्ही घटकांचा एकत्रित परिणाम मानावा लागेल. आता सप्टेंबरमध्येही आयात घटण्याची अपेक्षा असून 'इंडिया



बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन'ने ती सुमारे १५ टक्क्यांनी कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. या आकड्यांकडे वर्षाच्या सुरुवातीपासून पाहिल्यास चित्र आणखी बोलके होते. जानेवारीमध्ये सोन्याची आयात मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल १७१.६ टक्क्यांनी वाढून ३६.६ टनांवरून ९९.४ टनांवर पोहोचली होती. फेब्रुवारीतही ३०.८ टनांवरून ६६ टनांपर्यंत वाढ झाली; म्हणजे ११४.३ टक्क्यांची उसळी. मार्चमध्ये चित्र अचानक बदलले आणि आयात ५०.५ टनांवरून ३२.९ टनांवर आली. ही घट ३४.९ टक्के होती.एप्रिलमध्ये पुन्हा ३०.७ टक्क्यांची वाढ होऊन आयात ३४.९ टनांवरून ४५.६ टनांपर्यंत गेली.त्यामुळे मेनंतर सलग दिसणारी घट ही वर्षाच्या सुरुवातीच्या प्रचंड वाढीच्या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाची ठरते. सरकारची खरी चिंता सोने किती खरेदी केले जाते यापेक्षा त्यासाठी देशातून किती परकीय चलन बाहेर जाते, ही आहे.भारताला आवश्यक असलेल्या कच्च्या तेलाचा मोठा हिस्सा आयात

### दैनंदिनी

करावा लागतो. त्यात सोनेही मोठ्या प्रमाणावर परदेशातून आणावे लागल्यास आयात खर्च वाढतो.निर्यात आणि आयात यांतील अंतर वाढल्यास व्यापार तूट फुगते आणि त्याचा परिणाम चालू खात्याच्या तुटीवर होतो. रुपयावरील दबावापासून परकीय चलनाच्या मागणीपर्यंत त्याचे पुढचे परिणाम जाणवू शकतात. सोन्याची आयात दीर्घकाळ नियंत्रित राहिली, तर व्यापार ताळेबंदावरील काही दबाव कमी करण्यास निश्चित मदत होईल. या प्रश्नाला दुसरी आणि अधिक विलक्षण बाजू आहे. एकीकडे भारत दरवर्षी शेकडो टन सोने परदेशातून विकत घेतो,तर दुसरीकडे भारतीय कुटुंबांकडे अंदाजे ३१,००० टन सोने पडून असल्याचे मानले जाते.पिढ्यान्‌पिढ्या जमविलेली ही संपत्ती प्रचंड आहे; पण तिचा मोठा हिस्सा दागिने किंवा नाणी या स्वरूपात तिजोरीत बंद असतो.अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने या संपत्तीचा उत्पादक वापर अत्यल्प आहे.सरकारपुढील आव्हान म्हणूनच केवळ नवे सोने विकत घेऊ नका, एवढे सांगण्याचे नाही; घराघरांत पडून असलेले सोने आर्थिक प्रवाहात आणण्यासाठी नागरिकांना विश्वासार्ह आणि आकर्षक मार्ग उपलब्ध करून देण्याचेही आहे. यासाठी यापूर्वी सुवर्ण मुद्रीकरणासारख्या योजना आणल्या गेल्या; परंतु भारतीयांच्या सोन्याशी असलेल्या भावनिक नात्यामुळे अपेक्षित प्रतिसाद मिळविणे अवघड ठरले. घरातील दागिना हा केवळ त्यातील सोन्याच्या वजनाइतका नसतो. त्याला कौटुंबिक स्मृती,वारसा आणि प्रसंगी धार्मिक - सांस्कृतिक संदर्भ असतो. त्यामुळे तिजोरीतील ३१,००० टन सोने म्हणजे लगेच अर्थव्यवस्थेत आणता येईल असा ३१,००० टनांचा साठा,असे समीकरण मांडणेही व्यवहार्य ठरणार नाही.नागरिकांना सोने आर्थिक व्यवस्थेत आणण्यास प्रवृत्त करायचे असेल तर परतावा, सुरक्षितता,करव्यवस्था आणि प्रक्रिया या सगळ्यांबद्दल अधिक विश्वास निर्माण करावा लागेल. सीमाशुल्क वाढवून आयात महाग करण्यालाही मर्यादा आहेत. करातील मोठी तफावत निर्माण झाली की बेकायदा मार्गाने सोने आणण्याचे आकर्षण वाढू शकते. अधिकृत आयात कमी झाली म्हणजे देशातील सोन्याची मागणी तेवढ्याच प्रमाणात कमी झाली, असा सरळ निष्कर्ष म्हणूनच धोकादायक ठरतो.अधिकृत बाजार, ग्राहकांची प्रत्यक्ष मागणी आणि अनधिकृत पुरवठा यांचाही विचार करावा लागतो.सोन्याच्या आयातीवरील नियंत्रण दीर्घकाळ टिकवायचे असेल,तर केवळ कर वाढविण्यापेक्षा घरगुती आर्थिक बचतीला अधिक आकर्षक पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

# भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड

जागतिक पातळीवर आर्थिक अस्थिरता आणि मंदीचे सावट असतानाही,भारतीय अर्थव्यवस्थेने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के जीडीपी वाढ नोंदवून आपल्या अफाट क्षमतेची जगाला नव्याने ओळख करून दिली आहे. मेक इन इंडियामुळे वाढलेले देशांतर्गत उत्पादन आणि डिजिटल इंडियामुळे आलेली पारदर्शकता व गती या दुहेरी इंजिनाच्या जोरावर भारताने थेट परदेशी गुंतवणुकीतही मोठी झेप घेत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा मान मिळवला आहे.



सक्षम नेतृत्व आणि धोरणात्मक स्थैर्यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत राहिली असून, जागतिक संकटांचे रूपांतर संधीत करत भारत आज विकसित भारताच्या दिशेने अत्यंत आत्मविश्वासाने आणि खंबीरपणे वाटचाल करत आहे.भारताच्या या आर्थिक भरारीचा पाया अत्यंत भक्कम आहे, हे नुकत्याच समोर आलेल्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीच्या (एप्रिल-जून) आकडेवारीवरून स्पष्ट होते.रिझर्व्ह बँकेचा ७ टक्क्यांचा अंदाज मागे टाकत भारताने तब्बल ७.८ टक्के इतका घसघशीत जीडीपी विकासदर नोंदवला आहे. आयएमएफ,जागतिक बँक आणि ओईसीडी यांसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांनी या कामगिरीची दखल घेत स्पष्ट केले आहे की,२०२६ मध्ये जागतिक विकासदर जेमतेम २.५ टक्क्यांच्या आसपास राहील, मात्र भारत ६.४ टक्के ते ६.६ टक्के दराने वाढून जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान अबाधित ठेवेल. ही आकडेवारी भारताच्या आर्थिक लवचिकतेची साक्ष देते. जेव्हा चीन आणि युरोपातील देश अनुक्रमे ४ टक्के आणि १ टक्केच्या आसपास संघर्ष करत आहेत, तेव्हा भारताचा हा वेग खऱ्या अर्थाने लक्षवेधी ठरतो.

या यशाचे सखोल विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, हा विकास केवळ एका क्षेत्रावर अवलंबून नसून तो सर्वंकष आहे. भारताच्या सेवा क्षेत्राने १० टक्क्यांची दमदार वाढ नोंदवली आहे, तर मेक इन इंडिया आणि प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह यांसारख्या धोरणांमुळे उत्पादन क्षेत्राने ९.२ टक्क्यांची लक्षणीय मुसंडी मारली आहे. एकेकाळी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असणारा भारत आज स्मार्टफोन, औषधनिर्मिती, संरक्षण साहित्य आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे जागतिक उत्पादन केंद्र बनत आहे. यामुळे केवळ परकीय चलनाचीच बचत झाली नाही,तर देशांतर्गत पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली असून देशांतर्गत भांडवली गुंतवणुकीत ११.९ टक्क्यांची मोठी झेप पाहायला मिळाली आहे.

या उत्पादन क्रांतीला डिजिटल इंडियाची अत्यंत भक्कम जोड मिळाली आहे.युपीआय आणि डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरने देशातील तळागाळातील आर्थिक व्यवहारांचे स्वरूपच बदलून टाकले आहे. संपूर्ण जग आर्थिक अडचणीत असताना, युनायटेड नेशन्स ट्रेड अँड डेव्हलपमेंटच्या ताज्या अहवालानुसार भारतातील थेट परदेशी गुंतवणुकीत तब्बल ४४ टक्क्यांची वाढ होऊन ती ३९ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. परदेशी गुंतवणूकदारांचा हा ओघ भारताच्या स्थिर आणि पारदर्शक धोरणांवरील विश्वासाचे प्रतीक आहे.

■ प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल

**एकदा एक मानसशास्त्रज्ञ लिफ्टमध्ये चढला.त्याच्यासोबत आणखी दोन-तीन प्रवासी लिफ्टमध्ये होते.लिफ्टने दोन-तीन मजले पार केले असतील,तेवढ्यात अचानक त्यातील एका व्यक्तीने मानसशास्त्रज्ञावर जोरजोरात ओरडायला सुरुवात केली. काही क्षणांतच त्याचा संताप इतका अनावर झाला की,त्याने चक्क मानसशास्त्रज्ञाच्या चेहऱ्यावर थुंकले.लिफ्टमधील इतर प्रवासीही हे दृश्य पाहून अवाक्? झाले. मात्र, मानसशास्त्रज्ञाच्या चेहऱ्यावर ना राग होता, ना संताप. त्याने शांतपणे खिशातून रुमाल काढला, चेहरा पुसला आणि काहीही न बोलता पुन्हा स्थिर उभा राहिला.**

# शांततेची ताकद

काही वेळाने लिफ्ट एका मजल्यावर थांबली.दरवाजे उघडताच मानसशास्त्रज्ञाने त्या व्यक्तीकडे एकदा पाहिले, हलकेच हसला आणि लिफ्टमधून बाहेर पडला.त्याच्यासोबत आणखी एक व्यक्तीही त्या मजल्यावर उतरली. त्याला हा प्रसंग काही केल्या समजत नव्हता. त्याने आश्चर्याने विचारले,'त्या व्यक्तीने तुम्हाला इतके वाईट-वाईट बोलले, तुमच्या चेहऱ्यावर थुंकले; तरीही तुम्ही त्याला काहीच प्रत्युत्तर दिले नाही. उलट,तुम्ही त्याच्याकडे हसून पाहिलंत आणि शांतपणे बाहेर पडलात.हे सगळं तुम्ही इतक्या सहजपणे कसं सहन केलंत?'

मानसशास्त्रज्ञ पुन्हा हसला आणि शांतपणे म्हणाला, 'त्याने माझ्याशी जसा व्यवहार केला, ती त्याची समस्या आहे; माझी नाही. त्याच्या मनात काय चालले आहे, त्याचा सामना त्यालाच करायचा आहे. मला माझी शांतता गमावून त्याच्या समस्येचा भाग होण्याची गरज नाही.'

तो पुढे म्हणाला,'समजा, त्याच्या रागाला उत्तर देताना मीही रागावलो असतो,त्याच्यावर ओरडलो असतो किंवा त्याच्याशी भांडलो असतो, तर काय बदललं असतं? त्याचा राग कमी झाला नसता; उलट माझीही शांतता नष्ट झाली असती.त्याची समस्या तिथेच राहिली असती आणि त्यात माझी आणखी एक समस्या जोडली गेली असती.'

आपल्या आयुष्यातही असे अनेक लोक भेटतात.काही जण विनाकारण आपल्यावर राग काढतात, अपमान करतात, टोमणे मारतात किंवा आपल्या संयमाची परीक्षा घेतात. त्यांच्या वागण्यामुळे आपणही तसाच राग व्यक्त करावा, अशी परिस्थिती ते निर्माण करतात. पण आपल्या मनाचा ताबा दुसऱ्याच्या हातात देणे, हीच खरी चूक असते. ज्याने आपल्या अंतर्मनाला स्थिर केले आहे, ज्याला स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवता येते, त्याच्यावर बाहेरच्या व्यक्तीच्या वर्तनाचा सहज परिणाम होत नाही. तो दुसऱ्याच्या चिथावणीला बळी पडून स्वतःचा स्वभाव बदलत नाही. कोणी आपल्याला शिवी दिली म्हणून आपणही शिवी द्यावी, असे नाही.कोणी आपल्यावर रागावले म्हणून आपणही रागावले पाहिजे, असेही नाही. कधी कधी हसू हेच सर्वात प्रभावी उत्तर असते आणि शांतता हेच सर्वात मोठे प्रत्युत्तर असते.

आपल्या आयुष्यात समस्या निर्माण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बदलणे आपल्या हातात नसते. मात्र,त्या व्यक्तीच्या वागण्याला आपण कशी प्रतिक्रिया द्यायची, हे नक्की आपल्या हातात असते. म्हणूनच, पुढच्या वेळी कोणी तुम्हाला विनाकारण दुखावण्याचा प्रयत्न केला, तर क्षणभर थांबा. तात्काळ प्रतिक्रिया देऊ नका. एक दीर्घ श्वास घ्या आणि स्वतःला विचारा मी त्याच्या वागण्यामुळे माझी शांतता का गमवावी? कारण दुसऱ्याचा राग तुमची जबाबदारी नाही; तुमची शांतता मात्र तुमचीच जबाबदारी आहे.

■ मच्छिंद्र ऐनापुरे, जत

## वाचकांचा पत्रव्यवहार

### ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत वाढ

जगात अनेक देशात जेष्ठांची संख्या वाढत चालल्याचे चित्र समोर आले आहे.अमेरिकन जनगणना ब्युरोच्या अहवालानुसार २०२५ मध्ये जगात लहान मुलापेक्षा ज्येष्ठ वाढले आहेत. आकडेवारीनुसार ५ वर्षाखालील मुलांचा वाटा लोकसंख्येत १० टक्केपेक्षा कमी आहे. तर ज्येष्ठ नागरिकांचा वाटा तब्बल १०.५ टक्के एवढा झाला आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. अनेक देशात आरोग्य सुविधा चांगल्या प्रकारे पुरविल्या जातात. याशिवाय जगात जन्मदर सुद्धा घटत चालला आहे.प्रति महिना जन्मदर २.१ किंवा त्या पेक्षाही कमी आहे अशा ठिकाणी सुमारे ७१ टक्के लोकसंख्या राहत आहे. लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी २.१ हा जन्मदर आवश्यक मानला जातो. २०२५ मध्ये ६५ वयावरील ज्येष्ठांची संख्या जगामध्ये ८५.२ कोटी आहे ती २०६० पर्यंत २ अब्जावर जाईल.ज्येष्ठांची संख्या सध्या जपान, चीन व अमेरिका यामध्ये जास्त होत चालली आहे.अनेक युरोपियन देशात ज्येष्ठाना अनेक सुविधा व आरोग्य सेवा पुरवल्या जातात. अनेक ज्येष्ठ प्रकृती चांगली असल्यामुळे देशासाठी आपले योगदान सेवानिवृत्तीनंतर सुद्धा देत आहेत. आज भारतात सुद्धा जेष्ठाना अनेक सुविधा पुरविल्या जातात. त्यात आणखी वाढ होण्याची आवश्यकता आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक प्रकृती चांगली असल्यामुळे आपले योगदान अनेक क्षेत्रात देऊ इच्छितात त्यांना योग्य ती संधी मिळणे आवश्यक आहे. एकूणच या पुढील काळात ज्येष्ठांची संख्या वाढणार असल्यामुळे त्यांना योग्य तो सन्मान, आरोग्य व सेवा मिळावयास हव्यात.

■ शांताराम वाघ

### भारतीय वैज्ञानिकांचे उत्तुंग यश

भारतीय रक्षा अनुसंधान संघटन म्हणजेच डीआरडीओ आणि हैदराबाद विद्यापीठ यांच्या संयुक्त प्रयत्नाने बीएएम२४ या इंधनाची निर्मिती झाली आहे. बोरॉन,हायड्रोजन आणि नायट्रोजन या मूलद्रव्यांच्या साह्याने हे इंधन तयार केले गेले आहे. या इंधनामुळे मिसाईल्स आणि स्पेस रॉकेट यांना अधिक शक्ती प्राप्त होणार आहे. अशी शक्तिशाली इंधने थोड्या घर्षणाने स्फोटक बनतात. त्यामुळे त्यांची साठवणूक आणि वाहतूक धोकादायक ठरते.याचबरोबर अशा प्रकारची इंधने हवेतील आर्द्रता शोषून घेतात त्यामुळे अर्थातच त्यांची क्षमता घटते. पण बीएएम२४ हे इंधन या सर्व धोक्यांपासून सुरक्षित आहे.घर्षण किंवा हाताळणी यामुळे हे स्फोटक होत नाही, तसेच हवेतील आर्द्रता ते शोषून घेत नाही. त्यामुळे हाताळणी, वाहतूक आणि त्याची साठवण अत्यंत सुरक्षित आहे.कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही काळ हे सुरक्षित रहाते. हे नवीन इंधन सैन्यशक्ती आणि इस्त्रोचे संशोधन कार्य यासाठी वरदान ठरणार आहे.भारतीय वैज्ञानिकांनी मिळवलेल्या या यशामुळे जग अचंबित झाले आहे. भारताने या शोधाचे पेटंट घेतले आहे. देशाच्या दृष्टीने ही फार मोठी उपलब्धी आहे. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने भारत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर वेगाने वाटचाल करत आहे.ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची,गौरवाची गोष्ट आहे.


■ संध्या काटदरे

### गणेशमूर्ती शास्त्रानुसार हवी

नुकताच सोशल मीडियावर एक व्हिडिओ बघण्यात आला. त्यामध्ये एक मुलगा गणपतीची मूर्ती कशा पद्धतीने तयार करायची? याचा विचार करताना दिसतो. कसला विचार करतो? असे त्याचे वडील त्याला विचारतात. तेव्हा तो म्हणतो की, बाबा यंदा चॉकलेटपासून किंवा भाजीपाल्यापासून गणेशमूर्ती बनवण्याचा विचार आहे. तेव्हा त्याचे वडील त्याला सांगतात की, गणेश मूर्ती शास्त्रानुसार हवी. जर तुझी आई घरामध्ये दाढीमिशा वाढवून वावरली तर तुला कसे वाटेल? तुझे बाबा जर घरामध्ये साडी नेसून वावरले तर तुला कसे वाटेल? तेव्हा तो मुलगा म्हणतो हे विचित्र आहे सगळं. त्यावर वडील म्हणतात की, चॉकलेट आणि भाज्यांपासून गणपती बनवणे हे सुद्धा विचित्रच आहे. गणेशमूर्ती ही शास्त्रानुसार असायला हवी.श्री गणेश अथर्वशीर्षमध्ये ज्याप्रमाणे गणेश मूर्तीचे वर्णन केलेले आहे त्याप्रमाणे मूर्ती असायला हवी. मूर्ती ही शाडू मातीचीच असायला पाहिजे. अशा प्रकारे वडिलांनी मुलाचे प्रबोधन केल्यावर त्या मुलाला त्याच्या चुकीची जाणीव होते आणि तो शास्त्रानुसार गणपती बसवण्याचा निर्णय घेतो. अशा प्रबोधनात्मक व्हिडिओचे सर्वत्र प्रसारण होणे आवश्यक आहे.

■ भीमराव साळुंखे

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**बुधवार,ता.०९.०९.२०२६,** विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, वर्षा ऋतो,श्रावण मासे,कृष्ण पक्षे,त्रयोदशी तिथी, १२.३२ नंतर चतुर्दशी तिथी, आश्लेषा नक्षत्र, १५.१५ नंतर मघा नक्षत्र, कर्क रास, १५.१५ नंतर सिंह रास,शिवयोग, २१.५३ नंतर सिद्धयोग, वाणिज करण १२.३२ नंतर, विष्टी करण २३.३१ पर्यंत, दिनमान १२.१५, सुर्योदय ०६.२४, सुर्यास्त १८.३० (कोल्हापूरचे) राहूकाळ दुपारी १२ ते १.३०, शिवरात्री, भद्रा १२.३२ ते २३.३१, दुपारी १२.३० पर्यंत, धान्य कापणी, चुलीत अग्नी घालणेस, केळी लागवड, स्थावर खरेदी विक्री.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**-आजचा दिवस तुमच्या कुटुंबाचा आनंद वाढवण्याचा असेल. दिवसाच्या सुरुवातीला कुटुंबातील एखाद्या प्रिय व्यक्तीच्या यशामुळे आनंदाचे वातावरण असेल.आरोग्य सामान्य राहील.

**वृषभ**- बुद्धिमत्तेचा वापर करून ज्या गोष्टीसाठी खूप काळ प्रयत्न करत आहेत ते सर्व साध्य करू शकतील. विशेष म्हणजे तुमचे जवळचे मित्र यामध्ये खूप मदतगार ठरतील.

**मिथून**- आजची सुरुवात तुमच्या करिअर आणि व्यवसायासाठी खूप शुभ ठरेल. कामानिमित्त लांब किंवा कमी अंतराचा प्रवास होण्याची शक्यता आहे.

**कर्क**- आजचा दिवस थोडा धावपळीचा राहणार आहे. अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो.यामुळे तुम्हाला अतिरिक्त मेहनत आणि प्रयत्न करावे लागतील.

**सिंह**- करिअर असो किंवा व्यवसाय, संघर्षानंतरच यश मिळेल.अशा परिस्थितीत तुमच्या कोणत्याही कामात निष्काळजी राहू नका.

**कन्या**-व्यवसाय करणाऱ्या लोकांना नवीन संधी मिळू शकतात. तुम्हाला तुमच्या मुलाशी संबंधित काही चांगली बातमी मिळेल,ज्यामुळे तुमचा आदर वाढेल.

**तुळ**- आजचा दिवस अधिक शुभ आणि फायदेशीर ठरणार आहे. लोकांकडून पूर्ण सहकार्य मिळेल ज्यामुळे तुमचे सर्व काम वेळेवर पूर्ण होईल.

**वृश्चिक**-कामाच्या ठिकाणी वरिष्ठ आणि कनिष्ठ दोघेही तुमच्याशी पूर्णपणे दयाळूपणे वागतील.आरोग्याबद्दल तुम्हाला थोडी काळजी वाटू शकते.

**धनु**-आरोग्याकडे आणि नातेसंबंधांकडे खूप लक्ष द्यावे लागेल. कामाच्या बाबतीत तुम्हाला शिस्त राखावी लागेल. पैशाचा व्यवहार करताना विशेष काळजी घ्या.

**मकर**- अहंकार किंवा रागाच्या भरात कोणाबद्दलही अपशब्द वापरू नका अन्यथा तुम्हाला नंतर पश्चात्ताप करावा लागू शकतो. आरोग्य सामान्य राहील.

**कुंभ**- दिवस तुमच्यासाठी भाग्यवान असणार आहे. तुमचे सर्व नियोजित काम वेळेवर पूर्ण होतील.मेहनतीचे फळ मिळेल.प्रवास शुभ आणि फायदेशीर ठरेल.

**मीन**-नोकरदार लोकांसाठी उत्पन्नाचे अतिरिक्त स्रोत बनतील.संचित संपत्ती वाढेल.राजकारणाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस विशेषतः फायदेशीर ठरेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०, पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# दुसरा हप्ता त्वरित द्या, अन्यथा तीव्र आंदोलन

## अथणी शुगर तांबाळे युनिटला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा

गारगोटी,ता.८(प्रतिनिधी)-

**भुदरगड तालुक्यातील अथणी शुगर लि. तांबाळे युनिटने गत २०२५-२६ या सालामध्ये, ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर गणेश चतुर्थीपूर्वी ३००/- रुपयेचा दुसरा हप्ता जमा करावेत,अशी मागणी भुदरगड तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजित दादा पोवार व तालुकाध्यक्ष मायकल बारदेस्कर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन कारखाना व्यवस्थापनास दिले.**


अथणी शुगर तांबाळे युनिटला निवेदन देताना जिल्हाध्यक्ष अजितदादा पोवार, मायकेल बारदेस्कर व इतर मान्यवर.

निवेदनात म्हटले आहे की, गत गळीत हंगामात तुटलेल्या उसाच्या साखरेसह उपपदार्थांना वर्षभर उच्चांकी दर मिळाले आहेत. यावर्षी साखर विक्रीमध्ये बाजारात तेजी असून, वर्षभर साखरेला चांगला भाव मिळाला आहे.तसेच,खरीप हंगामातील शेवटच्या टप्प्यातील कामे व रब्बी हंगामातील मशागत, मजुरी, बि-बियाणे, खते व श्रावणातील सणवार हे सर्व पाहता, शेतकऱ्याच्या हातामध्ये खर्चासाठी सध्या पैसे नाहीत. त्याचबरोबर, वाढलेले खतांचे दर, मशागत, वाढलेली मजुरी व महागाई, गतवर्षी ऊस तोडणी कामगार व वाहतूकदार यांचेकडून ऊस तोडणीसाठी झालेली पिळवणूक, सरकारची नेहमी चुकत असलेली धोरणे या सर्व आस्मानी व सुलातानी संकटामध्ये शेतकरी घेरला आहे.

या परिस्थितीत शेतकऱ्याच्या हातात चार पैसे आले तर तो आपल्या शेतीची कामे योग्य रितीने व वेळेत करू शकतो व आपल्या साखर उद्योगासाठी ते पूरक व फायदेशीर ठरेल.

तसेच, गत हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेला ऊस पुरवठा, रिकव्हरी, त्यातून निर्माण झालेली साखर, उपपदार्थ प्रत्यक्ष कारखाना स्थळावरील व इतर गोडावून मधील शिल्लक असलेली साखर व उपपदार्थ सरकारने महिन्याकाठी साखरेसाठी निर्यातीचा दिलेला कायदेशीर कोटा व यातून शेतकऱ्यांना मिळालेला दर हा सर्व लेखाजोखा लेखी स्वरूपात मिळावा. या सर्व गोष्टींचा व शेतकऱ्यांचा हिताचा विचार करून, गणेश चतुर्थी पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर ३००/- रुपयेचा दुसरा हप्ता तातडीने वर्ग करावा अन्यथा, नाईलाजास्तव आंदोलन पुकारले जाईल, याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील, असा इशाराही जिल्हाध्यक्ष अजितदादा पोवार यांनी दिला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष कुंडलिक गुरव, तालुका अध्यक्ष मायकल बारदेस्कर, विश्वासराव पाटील, फत्तेसिंह सावंत, अरुण पाटील, प्रमोद सिद्रुक, दशरथ पाटील, किरण देसाई, विजय देसाई, सर्जेराव देसाई, शेतकरी बांधव व संघटनेचे इतर सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरगूडात महिलांना कराटे, योगा व मार्शल आर्टचे प्रशिक्षण

मुरगूड,ता.८(प्रतिनिधी)-

**शहराला पाणीपुरवठा करणारे जलशुद्धीकरण केंद्र सीसीटीव्हीच्या निगरानीखाली आणण्यासाठी सीसीटीव्ही बसवण्याच्या विषयासह मुलींना व महिलांना सार्वजनिक जीवनात वावरताना स्वसंरक्षणार्थ कराटे,योगा किंवा मार्शल आर्टसारखे प्रशिक्षण देण्याचा ठराव मुरगूड नगरपालिका सभेत संमत करण्यात आला.**

**नगरपालिका सभेत ठराव संमत**



याविषयावरील चर्चेत नगरसेवक अनिल राऊत यांनी काही शंका उपस्थित केल्या तर नवीन जलशुद्धीकरण कार्यान्वीत असले तरी शहराला नियमित व वेळेत पाणीपुरवठा व्हावा यासाठी जुने जलशुद्धीकरण बंद न करता ते तसेच चालू ठेवण्याची सूचना नगरसेवक दत्तात्रय मंडलिक व नगरसेविका सौ.गीतांजली आंगज यांनी केली. सभाध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ.सुहासिनी पाटील होत्या.नगरपालिकेची सर्वसाधारण सभा यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली.या सभेस उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सभेत आरोग्य कर्मचाऱ्यांचे सात महिन्यापासून रखडलेला पगार गणेश उत्सव सणापूर्वी देण्यात यावा तसेच कायम कर्मचाऱ्यांना दिपावली सणासाठी सानुग्रह अनुदान १६ हजारऐवजी २५ हजार देण्याची मागणी गटनेते सुहास खराडे व नगरसेवक दत्तात्रय मंडलिक, रणजित भारमल यांनी केली. शहरात मच्छी बाजार विकसित करण्यास सभेत मान्यता देण्यात आली.५ कोटीच्या या कामासाठी २५ टक्केचा पालिकेचा माफ करता येईल का ? असा प्रश्न नगरसेवक सुनिल रनवरे यांनी उपस्थित केला.त्यावर तसा प्रस्ताव पाठवू,असे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले.खाऊ गल्लीतील अतिक्रमणे काढूनही आता नव्याने तेथे खोकी बसविली जात असल्याकडे लक्ष वेधले.त्यावर मुख्याधिकाऱ्यांनी पाहणी करून कारवाईचे आश्वासन दिले. या सभेत विविध विषयावरील चर्चेत पालिका पाणीपुरवठा सभापती सत्यजित पाटील,नगरसेविका सौ.संजीवनी कांबळे,सौ.विजयमाला शिंदे ,वैशाली गोधडे,नगरसेवक राजू आमते व रणजित भारमल, विजय मेंडके आदींनी सहभाग घेतला. विषयपत्रिका वाचन रणजित निंबाळकर यांनी केले तर कार्यालय अधिक्षका स्नेहल नरके-पाटील यांनी आभार मानले.

# भैरवनाथ विकास सेवा संस्थेस ४.९२ लाख नफा

निढोरी,ता.८(वार्ताहर)-

**स्व.शंकरराव पाटील (आण्णा) यांनी सन १९४९ मध्ये स्थापन केलेल्या निढोरी येथील श्री भैरवनाथ सहकार समूहाच्या संचलित विविध संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.**

यंदा तब्बल ४ कोटी ९७ लाख रुपयांचे वार्षिक कर्जवाटप केले असून, संस्थेला ४ लाख ९२ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याचे सांगण्यात आले.स्वागत व प्रास्ताविक माजी सरपंच अमित भैया पाटील यांनी केले.

संस्थेचे चेअरमन केशवकाका पाटील म्हणाले, भविष्यात सभासदांना बँकेच्या विविध योजना, कर्ज सुविधा तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील.

संस्थेचे सचिव नारायण अगज यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सभेसमोर सादर केला.भैरवनाथ सहकारी दूध व्यावसायिक संस्थेचे चेअरमन शशिकांत भाऊ पाटील यांनी दूध संस्थेच्या कामकाजाबाबत सभासदांना मार्गदर्शन केले.दूध संस्थेचे सचिव बी.एम.कांबळे यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला.भैरवनाथ मजूर सहकारी संस्था व विविध मार्केटिंग संस्थेच्या कामकाजाचा आढावाही सभेत घेण्यात आला.सभेस व्हा.चेअरमन सर्जेराव मगदूम,अशोक पाटील, सातापा पाटील, डॉ.भिकाजीराव मोरबाळे, सुरज लोहार, आनंदा सुतार, भागोजी चौगले, राजाराम पाटील, रामचंद्र कांबळे, आनंदा जोंधळे, भैरवनाथ बुगडे, तुषार पाटील, उपसरपंच अमोल पाटील, सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

# जिनवाणी संस्थेने महिला सक्षमीकरणाला महत्व दिले

## सुनिता हवले; वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

बोरगाव,ता.८(प्रतिनिधी)-

**सहकार म्हणजे केवळ आर्थिक व्यवहार नव्हे,विश्वास, सहकार्य आणि विकासाची भावना याच विश्वासावर जिनवाणी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीने २५ वर्षात आपल्या सभासदांचा विश्वास संपादन करीत एक सक्षम व विश्वासार्ह संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.**

याचे श्रेय सभासद, ठेवीदार, कर्मचारी आणि संस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आहे. याच उद्देशाने स्थापन केलेल्या संस्थेकडून महिला सक्षमीकरणाला महत्त्व देत असल्याचे मत संस्थेच्या अध्यक्षा सौ.सुनीता हवले यांनी व्यक्त केले.


वार्षिक सर्वसाधारण सभेत दीपप्रज्वलन प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सुनिता हवले, शेजारी शुभांगी पाटील व अन्य.

बोरगाव येथील सिद्धेश्वर सभागृह येथे जिनवाणी अर्बन को-ऑपरेट सोसायटीची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प्रा.डॉ. रूपाली आडमुठे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली.

सुनिता हवले पुढे म्हणाल्या, एकूण सभासद ७०९, भाग भांडवल २२ लाख १० हजार,ठेवी ४ कोटी २९ लाख ९० हजार, कर्जे १ कोटी ६१ लाख १६ हजार, विविध बँकांमध्ये ३ कोटी ५२ लाख ८७ हजार रुपयांची गुंतवणूक केली असून संस्थेस अहवाल सालात ११ लाख ७७ हजार रुपयांचा नफा झाल्या असल्याचे सांगितले.

मॅनेजर सौ.रेखा बंकापुरे यांनी नफा तोटा अंदाज पत्रकाचे वाचन केले. डॉ.शुभांगी पाटील वसुंधरा थोरात,डॉ.रूपाली आडमुठे, ॲड.पद्मश्री चौगुले यांनी संस्थेच्या विषयी मनोगत व्यक्त केले.सभेस स्मिता माळी, संस्थेच्या उपाध्यक्ष रोहिणी बस्सन्नावर, संचालिका अलका पाटील, माणिक फिरगन्नावर, सविता मैशाळे, जयश्री पाटील, पद्मश्री तेरदाळे, लता पाटील, सुनंदा हवले, सुनिता हवले, हलीमा मुजावर,लक्ष्मीबाई शिंगे,चंद्राबाई एदमाळे,भारती पाटील, सुधा झावरे, राजश्री चिपरे, हौसाबाई माळगे, शेवंती कमते, वैशाली हवले यांच्यासह महिला सभासद उपस्थित होत्या.


जिल्हा बँक निवडणुकीसाठी सहकार खात्याकडे ठराव दाखल करताना राहूल देसाई, प्रकाश वास्कर आदी.

# जिल्हा बँक निवडणुकीसाठी काँग्रेसचे ठराव सहकार खात्याकडे दाखल

गारगोटी,ता.८(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्यात गोकुळ जिल्हा दूध संघानंतर कोल्हापूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा धुरळा उडणार आहे. या निवडणुकीसाठी सहकारी संस्थाचे ठराव दाखल करण्याची सर्वच तालुक्यात लगबग सुरु आहे.भुदरगड तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या पक्षाचे ठराव गारगोटी येथील सहकार खात्याच्या सहायक निबंधक यांच्याकडे दाखल केले.**

भुदरगड तालुका राष्ट्रीय काँग्रेसने काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा संस्था गटातून ३६ठराव व इतर संस्थेचे ९५ ठराव दाखल करण्यात आले.यावेळी बिद्री साखर कारखान्याचे संचालक राहुल देसाई,सत्यजितराव जाधव,शामराव देसाई, जीवन पाटील, प्रकाश कुलकर्णी, धोंडीराम मगदूम, संदीप पाटील, सचिन घोरपडे, एस. एम. पाटील, सुरेश नाईक,प्रकाश वास्कर, अनिल तळकर, प्रताप मेंगाने, सुरेश खोत, शिवाजी मातले, एच.डी.देसाई,रत्नाकर देसाई, संभाजी नलगे यांच्यासह काँग्रेसचे ठराव धारक उपस्थित होते.

# जय जिनेंद्र सौहार्द संघास १.२५ कोटीचा नफा-खोत

बेडकिहाळ,ता.८(वार्ताहर)-

**शमनेवाडी येथील श्री जय जिनेंद्र सौहार्द सहकारी संघाची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संघाच्या कार्यालयात अध्यक्ष बाबासाहेब खोत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**

संस्थेस १ कोटी २५ लाखांचा नफा झाल्याचे सांगण्यात आले.सभेस प्रमुख पाहुणे म्हणून सदलगा अर्बन बँकेचे संचालक डॉ.बी.ए.भोजकर, माजी जिल्हा पंचायत सदस्य सुदर्शन खोत, जयवर्धन पाटील उपस्थित होते. स्वागत करून प्रास्ताविकात आर.बी.खोत यांनी संस्थेचा कार्याचा आढावा घेतला.

अहवाल वाचन करताना अध्यक्ष बाबासाहेब खोत म्हणाले, संस्थेचे १३७१ सभासद, शेअर भागभांडवल ५० लाख ८ हजार, ठेवी ३३ कोटी १२ लाख, निधी १० कोटी ७५ लाख ५४ हजार, गुंतवणूक १९ कोटी ४५ लाख, तर १९ कोटी ८८ लाख ५५ हजारावर कर्ज वितरीत करण्यात आले असून, संस्थेस १ कोटी २५ लाख ६७ हजारावर नफा झाला असून सभासदांना १५ टक्के प्रमाणे लाभांश वितरीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.नफा तोटा ताळेबंद पत्रक वाचन मुख्यकार्य निर्वाहक कुमार गोडवे यांनी केले.सुदेश खोत यांनी मनोगत व्यक्त केले.


वार्षिक सभेत अहवाल वाचन करताना बाबासाहेब खोत सोबत संचालक मंडळ सदस्य.

यावेळी धनपाल धनाप्पगोळ,तात्यासाहेब खोत, उदय तपकिरे, आप्पासाहेब गाडवे, चंद्रकांत मुन्नोळे, कुमार बोने, दीपक खोत, आदित्य खोत, सतीश सोनावणे, पार्श्वनाथ नारे, शकुंतला खोत, देवकी शिगुप्पे, भारत खोत,प्रदीपकुमार खोत, बाहुबली शिरगुप्पे, सुनील हेरगे, जयकुमार खोत, सुरेश खोत, शीतल सोमण खोत,अजित खोत यांच्यासह शमनेवाडी, बेडकिहाळ व नेज येथील सभासद व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन वर्धमान शिरगन्नावर यांनी केले.आभार उदयकुमार तपकिरे यांनी मानले.

# साहित्यामध्ये शिक्षणाला मानवी स्पर्श देण्याची शक्ती

## -डॉ.याकोल्ली

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)-

**शिक्षण हे केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन नाही; ते व्यक्तीमत्त्व विकास, मूल्यांचा विकास आणि समाजाच्या परिवर्तनासाठी एक मार्गदर्शक दिवा आहे.साहित्यामध्ये शिक्षणाला मानवी स्पर्श देण्याची शक्ती आहे आणि कृष्णमूर्ती पुराणिकाच्या साहित्यातून जीवनमूल्ये, सामाजिक जाणीव आणि मानवी संवेदनशीलता प्रभावीपणे व्यक्त झाली आहे, असे मत सौंदत्तीचे निवृत्त प्राचार्य डॉ.वाय.एम. याकोल्ली यांनी व्यक्त केले.**



निपाणी येथील कार्यक्रमात बोलताना डॉ.वाय.एम.याकोल्ली.

शिक्षक दिन आणि कृष्णमूर्ती पुराणिकाच्या जयंतीनिमित्त आयोजित 'शिक्षण आणि कृष्णमूर्ती पुराणिका साहित्य' या विशेष व्याख्यानमालेत बोलत ते होते. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ.एम.एम.हुरली यांनी मनोगत व्यक्त केले. कन्नड विभागाचे प्रमुख डॉ.बी.एम.जनगौडा यांनी स्वागत केले.बेळगाव येथील कृष्णमूर्ती पुराणिक फाउंडेशनचे मानद सचिव, आनंद पुराणिक यांनी प्रास्ताविक भाषण केले.प्रा.शंकरमूर्ती के.एन. यांनी तज्ज्ञ व्यक्तींची ओळख करून दिली. सागर पाटील यांनी पुस्तक वाचन निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणाचा तपशील वाचून दाखवला. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या पी.यु प्राचार्य हेमा चिक्कमठ, आयक्यूएसी समन्वयक डॉ.अतुलकुमार कांबळे, डॉ.एस.एम.रायमाने, डॉ.एम.डी. गुरव, डॉ.तेजस्विनी नंदी, डॉ.आनंद केंचक्कनवर, डॉ.शशीधर कुंबार, डॉ.एस.आर.हुन्नरगी, एस.एस.सुन्नल, एस.एस.घोरपडे, नागराज बेळगावकर आणि सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# संकेश्वर वीरराणी कित्तूर चन्नम्मा सौहार्दला ४०.५३ लाख नफा-पाटील

संकेश्वर,ता.८(वार्ताहर)-


**संकेश्वर वीरराणी कित्तूर चन्नम्मा अर्बन क्रेडीट सौहार्द सहकारी संस्थेला चालू आर्थिक वर्षात ४० लाख ५३ हजार ७४५ रुपये नफा झाला असून सभासदांना २० टक्के लाभांश देत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष मलगौडा ऊर्फ बसनगौडा पाटील यांनी सांगितले.ते संस्थेच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.**

प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व संचालकांनी संस्थेचे संस्थापक दिवंगत नागेश पाटील ,वीरराणी कित्तूर चन्नम्मा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.स्वागत व अहवाल वाचन,नफा-तोटा विभागणी वाचन सीईओ विश्वनाथ मिर्जी यांनी केले.यावेळी बारावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थीनी सन्मती शिवानंद बस्तवाडी हिचा सन्मान करण्यात आला.सभेला अप्पासाहेब पचंडी,राजू शिंदे, रावसाहेब कुरबेट, शंकर शिरकोळी, सचिन पाटील, विनय चौगला, महेश बाडकर, नागेश उपाध्ये, इरगौडा पाटील, रेखा दुंडगे, श्रीदेवी वैरागी, सरोजनी पचंडी, बसगौडा पाटील, आणाप्पा शेलार, जयवंत गस्ती, सुरेश मळनाईक, अंकली शाखेचे संचालक मंडळ,सभासद,कर्मचारी वर्ग उपस्थित होते.आभार सीईओ विश्वनाथ मिर्जी यांनी मानले.

# आडी मल्लिकार्जुन डोंगरावर चौथ्या सोमवारीही भाविकांची मांदियाळी

कोगनोळी,ता.८(प्रतिनिधी)-

**श्री क्षेत्र आडी (ता. निपाणी) येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मल्लिकार्जुन डोंगरावर श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली होती. मंदिर परिसरासह मंदिरामध्ये हर हर महादेवाचा गजर दिवसभर सुरु होता. दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. त्यामुळे मल्लिकार्जुन मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता.**


आडी येथील मल्लिकार्जुन डोंगर परिसरात झालेली भाविकांची मांदियाळी.

श्रावणी यात्रेनिमित्त गाभाऱ्यातील मल्लिकार्जुन देवाची विशेष पूजा बांधण्यात आली होती. बेल वाहण्याचा कार्यक्रम झाल्यावर दिवसभर भाविक दर्शनासाठी डोंगरावर येत होते. येथे सकाळपासूनच प्रसादाचे वाटप करण्यात आले. आडी क्रॉसपासून पायऱ्यावरुन चालत तर डोंगराच्या पाठीमागून वाहनाने थेट डोंगरावर भाविक येत असल्याचे दिसून आले.मंदिर परिसरातील व्यावसायिकांची चारही सोमवारी आर्थिक उलाढाल चांगली झाली. मंदिर परिसरात बेल, नारळ, साखर, कापूर, उदबत्ती यासह अन्य साहित्यांची दुकाने थाटली होती. त्यामुळे व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण दिसून येत होते.

# गौरी-गणपतीच्या शिदोरीत बेकरी पदार्थांचा शिरकाव

## पारंपारिक भाजी-भाकरी काळाच्या पडद्याआड

शिरगाव,ता.८(आनंदराव चौगले)-

**ग्रामीण भागात गौरी-गणपती सणानिमित्त सासरवाशीण बहिणींना माहेरची शिदोरी देण्याची आत्मीयतेची परंपरा आजही जपली जात आहे. मात्र, काळाच्या ओघात या शिदोरीचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. पूर्वी आपुलकीने अन् कष्टाने बनवलेल्या पारंपारिक भाजी-भाकरीची जागा आता बेकरीतील तयार पदार्थांनी घेतली असून, अस्सल ग्रामीण चव आणि परंपरा हळूहळू हरवत चालल्याचे चित्र दिसत आहे.**



गौरी-गणपतीचा सण म्हणजे सासरवाशीण महिलांसाठी जिव्हाळ्याची पर्वणी! 'बंधू येईल न्यायला, गौरी-गणपतीच्या सणाला...' या ओळींप्रमाणे महिलांना माहेरची आणि भावाची आतुरतेने ओढ लागलेली असते. पूर्वीच्या काळात शिदोरी म्हटलं की, चुलीवर थापलेल्या पांढऱ्याशुभ्र तांदळाच्या मऊ भाकऱ्या,अळूच्या वड्या किंवा वरणाची चविष्ट भाजी असा साग्रसंगीत बेत असायचा. दिवसभर चुलीपुढे राबून संध्याकाळी ही मायेची शिदोरी सासरवाशीण बहिणीपर्यंत पोहोचवली जायची.

मात्र, आताच्या धावपळीच्या आणि रेडीमेड जमान्यात ही मेहनत मागे पडली आहे. भाजी-भाकरीची जागा आता बेकरीतील बुंदीचे लाडू, खाजा, बालूशाही आणि इतर सुक्या फराळाने घेतली आहे. त्यामुळे परंपरेचे स्वरूप बदलले असून शिदोरीतील पारंपारिक खाद्यसंस्कृती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

### बेकरी पदार्थांना उधाण; दुकानांमध्ये गर्दी

सध्या ग्रामीण भागात शिदोरीची देवाणघेवाण सुरू असल्याने स्थानिक बेकरी आणि मिठाईच्या दुकानांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. वेळेची बचत आणि तयार पर्याय उपलब्ध असल्यामुळे नागरिक बुंदीचे लाडू, बालूशाही आणि खाजा यांसारख्या बेकरी पदार्थांना पसंती देत आहेत.

# लिटल एंजल्स स्कूलमध्ये दहीहंडी उत्साहात साजरी

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)-

**लिटल एंजल्स इंग्लिश मीडियम स्कूल, निपाणी येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास शाळेचे चेअरमन प्रसन्नकुमार गुजर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी सहभाग घेत मानवी मनोरा रचत दहीहंडी फोडली.याप्रसंगी व्हा.चेअरमन सचिन खोत,डॉ.प्रकाश कदम, प्रा.सौ.फक्रुनिसा मुल्ला यांचे मार्गदर्शन लाभले.

# निधन वार्ता

## सदाशिव पाटील

कोगनोळी,ता.८(प्रतिनिधी)-



येथील श्री सदगुरु पूर्णानंद महाराज लोकसेवा मंडळाचे सचिव सदाशिव रघुनाथ पाटील (वय ६६) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा,मुलगी, सून, जावई, नातवंडे, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

## प्रकाण भोसले

मुरगूड,ता.८(प्रतिनिधी)-



सरपिराजीराव घाटगे नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन प्रकाश ज्ञानदेव भोसले (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रु, पुढील प्रत्येक शब्दास ७ रु, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**स्वतंत्र बंगला विकणे आहे.** प्लॉट २५०० स्के. फूट, बांधकाम अंदाजे ३५०० स्के. फूट, ४ बीएचके लक्झरी बांधकाम यशोलक्ष्मी नगर रोड, इचलकरंजी. ९३७११५५००७, ९३७२११५५००७ (संपर्क वेळ-१० ते २)

**इचलकरंजीतील** टाईल्स प्लंबिंगचे शोरूम बंद होत असलेने क्लिअरन्स सेल मटेरियलवर ५०% पर्यंत सूट. संपर्क-९६२३९७७२३५

**७२ इंची डोडीया कंपनीचे** क्रॉस गियर व ऑईल पाईप सहित ४८ माग पाहिजेत. संपर्क-९५०३१२७०३१

**प्लॉट विकणे-** रूई मानेनगर येथील २ गुंठेचा एनए प्लॉट ४० बाय ५० कंपौंडसह विकणे. संपर्क-९८२२०३२०९९

**कपडे वाळत घालण्याचे** हँगिंग स्टँड डासाची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी. संपर्क-राहुल एंटरप्रायजेस. ७५०७७७१६६६४, ७५०७७७२६६६४

**लालमाती-** गार्डनसाठी लॉनसाठी, वृक्षारोपणसाठी निसर्ग सृष्टीसाठी व कुंड्यांसाठी नदीची सुपिक, कसदार मळीची लॉन स्पेशालिस्ट लाल माती, विटाचे रवडे डंपरने, ट्रॅक्टरने मिळेल. पोत्यावर सुध्दा मिळेल. ७८८८२०४५१३

**६४ इंची २४ भिडे लूम विकणे आहे.** संपर्क-९५७९६०५६६९

**अर्जंट विकणे-** १ बीएचके फ्लॅट, ३ बीएचके फ्लॅट मॉडर्न हायस्कूलजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. फोन-९५२७७७८८६६

**प्लॅटिना १०० नोव्हे. २०२१ मॉडेल** गुडकंडिशन गाडी विकणे आहे. ९७६२९३९९७३

**जमीन विकणे आहे.** बोरगाव पाचवा मैल मेन रोडलगत ८४ गुंठे शेतजमिन विकणे आहे. प्लॉटिंगसाठी उपयुक्त संपर्क-७५८८४९८२१, ७५८८४९८३०

**अर्जंट २ बीएचके** रो हाऊस विकणे आहे. फूल फर्निचरसह २४ तास पाणी, कार पार्किंग सनसिटीमधे यड्राव फाटा, सोसायटी फर्निचरमागे, मो.८९९९९५७३४३

**महासत्ता चौक पॅराडाईज कॉलनी** येथे ऑफिस व १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट उपलब्ध आकर्षक दर व ॲमिनिटीज. संपर्क-९३२५८३०५९२

**फ्लॅट विकणे** १ बीएचके सांगली नाका, अभय डेअरीसमोर, वेदुता रेसिडेन्सी, बी-विंग, इचलकरंजी, सागर जोशी, मो. ८८५६९३६७३१.

**जुने व नवीन पॉवरलूम** घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशिन डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू ८३१७२९१००८

**२ बीएचके फ्लॅट** रेडी पजेशन विक्रीसाठी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८९०११६१६१

## * बोअरवेल *

**चौगुले बोअरवेल्स जयसिंगपूर** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. मो. ९९६०१०५४२१.

## * व्यवसाय *

**एक्स्ट्रा इन्कम-** मिळवण्याची सुवर्णसंधी. आपली नोकरी व व्यवसाय करून तुम्हाला वेळेनुसार २ तास काम करून एक्स्ट्रा इन्कम मिळवू शकता? वय, शिक्षण व अनुभवाची अट नाही. संधी सर्वांसाठी संपर्क-योग शिक्षक-नंदकुमार सर-९८५०६१५४२१

## * नोकरी विषयक *

**अर्जंट हवेत-**सेल्सपर्सन-२, कॉम्प्युटर ऑपरेटर-२ जागा सुशिक्षित पात्रता बी.कॉम/१२ वी पास, कॉम्प्युटरचे सखोल ज्ञान, संवाद कौशल्य असणे आवश्यक. आकर्षक पगार. संपर्क- श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रुणवाल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- बालाजी बेकरी, एएसडी कॉलेजजवळ. फोन-९९६००९८२७९, ७३७६१२७१११

**परमिट रूम बियर बारमध्ये** पुर्णवेळ/पार्टटाईम वेटर कामगार पाहिजेत. इचलकरंजी. ७०२००२२७९६, ९४२२०४३९४६

**कॉस्मेटिक शॉपसाठी** कामगार पाहिजेत. मुले, मुली, महिला, फूलटाईम, पार्टटाईम संपर्क- गायत्री डिस्ट्रीब्युटर्स, एएसडी कॉलेजजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. ९६६५०४६७००

**ऑफिस रिटेल कामासाठी** गरजू मुले पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३० वर्षे. वेळ-८ तास. संपर्क-९२२५८३४८०२

**शुध्द शाकाहारी** स्वयंपाकासाठी लेडीज पाहिजे. तीन बत्ती चौक, संपर्क-९०४९९५४४२४

**दाताच्या दवाखान्यासाठी** १२ वी पास व कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली फूलटाईम लेडीज/जेंटस असिस्टंट पाहिजेत. तीन बत्ती चौक. ८९९९३०७३८१

**डिप्लोमा/डिग्री इलेक्ट्रीकल** व इलेक्ट्रॉनिक्स हेल्पर पाहिजे. संपर्क-७४४४०४३२०७

**इचलकरंजी किडस् वेअरमध्ये** अनुभवी व हेल्पर मुले व मुली पाहिजेत. संपर्क-९९२२६२४६७६

**कामगार पाहिजे.** इलेक्ट्रीक दुकानामध्ये मोटर रिपेअरीसाठी शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजे. पगार-१२ हजार. रविराज इलेक्ट्रीकल्स, गणेशनगर. ९९२१९४९२४२

**पाहिजेत.** मॉड्युलर फर्निचर कंपनीमध्ये सुतार पाहिजेत. आकर्षक पगार-१७००० ते २५०००. संपर्क-९४२२०४३२१९

**पाहिजेत.** मॉड्युलर फर्निचर कंपनीमध्ये हेल्पर पाहिजेत. संपर्क-८७६६०८८८१५. संपर्क वेळ-११ ते ५

**फिनिश कापड विक्रीसाठी** सेल्समन पाहिजे. (ऑल इंडिया टूर) करणी ग्रुप, इचलकरंजी. मो. ९३७११०३३५१, ७०९६७९१५१५

**कामगार पाहिजे.** कॉस्मेटिक शॉपमध्ये कामासाठी मुलगी पाहिजे. पत्ता- यशश्री ब्युटी सेंटर, खंजिरे मळा, इचलकरंजी. फोन-९७७४८३३९९९, ७०३००५६३००

**पेट्रोल पंपावरती** पेट्रोल सोडण्यासाठी कामगार पाहिजे. संपर्क-९३१५०६६३५५

**हातकणंगले लक्ष्मी वसाहत** सिक्युरिटी गार्ड भरती ८ तास ड्युटी. १०,५००/- पेमेंट. संपर्क-८३०८८७७६६०, ७९७२९४७०९८

**कामगार पाहिजेत.** फिटर, ड्रीलर शिकाऊ टर्नर, फ्लोपर/हेल्पर. संपर्क-९८९००६९५९८

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** ड्युटी- १२ तास, पगार-१२,०००, १३,०००, शहापूर, जे.के. नगरजवळ फक्त रात्रपाळी व दिवसपाळी मिळेल. मो. ९२८०२३२६६, ९७७५२१९६१४

**६ फुट लेथ मशीनवर** काम करण्यासाठी अर्जंट अनुभवी टर्नर पाहिजे, ८ तास ड्युटी, आभार फाटा, चंदूर. संपर्क-९९६०१६५४२७

**होलसेल कापड पेढीवर** काम करण्यासाठी कामगार पाहिजे. पगार-१०,००० ते २०,०००/-. संपर्क-९५७९६९२४९४

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**मॉन्टेक लाईफ स्टाईल कंपनीमध्ये** कामगार पाहिजे. सॉक्स पॅकिंग चेकिंगसाठी-महिला-२, शिक्षण-पदवीधर/डिप्लोमा. पार्वती इंडस्ट्री इस्टेट, इचलकरंजी. ९३०९१८७८७७, ९५२९४६८६८५. संपर्क वेळ-सकाळी १० ते सायं.५

**अर्जंट सुरक्षा स्टाफ भरती चालू आहे.** जे.के. नगर कृष्णानगर येथील नामवंत कंपनीकरीता आकर्षक वेतन मेडिकल सुविधा संपर्क-९८८१३५८८१६

**पाहिजेत**

**इचलकरंजी येथे ऑफिस कामकाजासाठी मराठी व इंग्लिश टायपिंगचा अनुभव असलेले क्लार्क-२, ऑफिसबॉय (शिपाई) २ व निर्व्यसनी ४० वयाच्या आतील ड्रायव्हर-२ नेमणेचे आहे**

**त्वरीत संपर्क साधा**

**9371607123**

**निर्व्यसनी कायमस्वरूपी ड्रायव्हर** पाहिजे आहे. धनलक्ष्मी कॉटन मिल्स. कापड मार्केट समोर.

**Solace Kansya Foot Therapy Centre** मध्ये लेडीज लागणार आहे. अर्जंट भरती, टाईम-१०.३० ते ८.००. संपर्क-९९३०३७७७११

**सीएनसी, व्हीएमसी सेटर** व ऑपरेटर टर्नर पाहिजेत. एनपी चौक, जवाहरनगर, इचलकरंजी. संपर्क-७८७५७०५४४०

**१० वी नापास मुले पाहिजेत.** गरजूंनी भेटावे. संपर्क-८३०८००११६११

**पॅकिंगसाठी लेडीज पाहिजे.** कामासाठी मुलगा गारमेंटचे शिलाईचे काम घरी देवू. संपर्क-८२०८०२७९३४, ९४०४२६८२५४

**परमिट रूमसाठी वेटर पाहिजे.** पार्टटाईम किंवा फूलटाईम, वेळ-६ ते रात्री ११. संपर्क-९६२३१९०८१०

**मेडिकल ऑफिसर** व नर्सिंग स्टाफ पाहिजे. उत्तम टॉकीजमागे, आयोध्या हॉस्पिटल. संपर्क-९७६६३४०९११, ९९२२३७५३१४

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरु १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण. Graphic Design, Ms-Office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर. पत्ता- इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर, इचलकरंजी. - संपर्क- ९२८४२६४९८०

**ऑफिस कामासाठी-** मुली पाहिजेत. पद-सेल्स असिस्टंट, पगार-बेसिक सॅलरी+इन्सेंटिव्ह, स्थळ-लिंबू चौक, इचलकरंजी. संपर्क-९२८४००७४०४

**मुले पाहिजेत.** एअरजेट कारखान्यातील कापूस काढणेसाठी मुले पाहिजेत. वेळ-९ ते १ व ४ ते ६. पगार-१५०००/- वय- ३० पर्यंत. संपर्क-९७६०००५७७८

**टू व्हीलर शोरूमकरीता** सर्व्हिसिंग कामगार साफसफाई कामगार पाहिजेत. अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजे.** किमान बारावी पास, उत्तम संभाषण कौशल्य असलेले फ्रेशर अथवा अनुभवी लेडीज अथवा जेंटस सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजे. फॅशन डिझायनिंग झालेल्यांना प्राधान्य. ९४२११०५४४४

**अॅमेझॉन कंपनीमध्ये** पार्सल डिलेव्हरी करण्यासाठी त्वरीत मुले पाहिजेत. टू व्हीलर, ड्रायव्हींग लायसन व ५ जी. मोबाईल आवश्यक. राजेंद्र सर-९०६६०१४४४२

**सिक्युरिटी गार्ड भरती-** इचलकरंजी, तारदाळ, शहापूर, खोतवाडी, यड्राव, कोंडिग्रे, चिपरी, जयसिंगपूर, नांदणी, हरोली, जांभळी, आकर्षक पगार. संपर्क-७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८

**DTDC** कुरिअरमध्ये ऑफिससाठी स्टाफ भरती सुरू. ऑफिसबॉय. संपर्क-९७३०६८६२५३, ७०३००२११०८

**कामगार पाहिजेत.** पॅकिंगसाठी ४ महिला व भरणी उतरणीसाठी २ हमालांची आवश्यकता आहे. अर्जंट संपर्क-सरस्वती ट्रेडर्स. सरस्वती मार्केट, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी.

**रंगाचे दुकानात** कामगार व अकौंटंट पाहिजे, अजय पेंटस, कल्पना टॉकीज, इचलकरंजी. ९४०४७१२५६०

**रंगाचे दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. गरजूंना प्राधान्य. संपर्क- नवभारत पेंटस, बंगला रोड, इचलकरंजी. फोन-९८२३१८१४४८

**ऑफिस कामासाठी** लेडीज/मुली पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. पत्ता-एपील वेअर हाऊस, थोरात चौक, इचलकरंजी. ९६०७३३५७७७, ७८७५६९९९२४

**ऑफिस स्टाफ पाहिजे.** कॉम्प्युटर अकौंटींग, एक्सेलचे ज्ञान असणारा, संपर्क-९८२३३५३३३२

**शोरूम कामासाठी** जेंटस व लेडीज पाहिजेत. (पॅकिंग व लफ्टींगसाठी) जेपी संघवी. सुंदर बागेजवळ. ९४२२४१४३८५, ८८८८८८८२४८

**किंग्स वॉच इचलकरंजी येथे** फिश कटर (अनुभवी) बिलींग काऊंटरसाठी महिला कर्मचारी व हेल्पर पाहिजे. आकर्षक पगार, त्वरीत काम. संपर्क-९१४६०४१३६५

**अकौंटींग टॅली प्राईममध्ये** अनुभवी स्टाफ पाहिजे. विवाहीत लेडीजना प्राधान्य. संपर्क-८०१०२२२८२५

**जेंटस कामगार पाहिजे.** बेसिक




१३ हजार पगार+इन्सेंटीव्ह. संपर्क-९६०४०००८४५

**कपड्याच्या शोरूममध्ये** फूल टाईम कॅशियर पाहिजे. बेसीक कॉम्प्युटर येणे आवश्यक. पत्ता- जुन्या नगरपालिकेसमोर, इचलकरंजी. ८६६८९४५३५५

**पाहिजेत.** वे ब्रिज (वजन काटा) लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट येथे जेंटस अथवा लेडीज ऑपरेटर पाहिजे. फॅमिलीसहीत राहणेची सोय. संपर्क-९६०९०९८०९०

**एअरजेट लूम वर्कशॉपमध्ये** रिपेअरी कामासाठी लेथ मशिन ऑपरेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क-९२८४८०१९६९, खोतवाडी

**पिटर इंग्लंड रेडिमेड शोरूममध्ये** मुले/मुली पाहिजेत. वेळ- ६ ते १०, पगार-४०००, वेळ-सकाळी १० ते सायं. ६, पगार-८०००, भेटा- व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचल.

**प्रिंट शॉपमध्ये** अनुभवी/शिकाऊ (अविवाहीत मुलगी) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क-व्यंकटेश-९८९०८६९१२९

**व्हीआय मध्ये** सिमकार्ड विक्रीसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी सुविधा. संपर्क-८५३०७६६४२९

**टेलरिंग कामगार पाहिजेत.** पॅन्टमेकर, शर्टमेकर किंवा ऑल राऊंडर पाहिजेत. संपर्क-७७४१०१७१७७

**लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर** व टेलिफोन ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९६०४०००८४५

**हॉस्पिटल कामासाठी** अनुभवी किंवा सर्टिफिकेट असलेले डे/नाईटसाठी एएनएम/जीएनएम स्टाफ पाहिजे. संपर्क-९८८१८११९३३, इचलकरंजी.

**भारतातील नामांकित ज्वेलरी** राजेश सिल्वर या मॅन्युफॅक्चरींग कंपनीमध्ये जेवण करण्याकरीता गरजू कायमस्वरुपी जोडपे पाहिजे. आकर्षक पगार, जोडपे शाकाहारी पाहिजे. राहण्याची व जेवणाची सोय, दररोज चहा, नाष्टा, जेवण (२०० माणसे) संपर्क-७५०७३०७८७८, पत्ता- महावीर नगर, बँक ऑफ इंडियाजवळ, हुपरी

**नर्स/कंपौंडर पाहिजेत.** भेटा- मानस क्लिनिक अँन्ड नर्सिंग होम, कागवडे मळा, अग्रसेन भवनसमोर, विकली मार्केटच्या मागे, इचलकरंजी.फोन-(०२३०) २४३००१५

**कामगार पाहिजेत.** टू व्हीलर गाड्यांच्या शोरूमकरीता वॉशिंगसाठी व ऑफिसबॉयसाठी कामगार पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत.** टू व्हीलर गाड्यांच्या शोरूमकरीता सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**पाहिजेत.** श्री ग्राफिक्समध्ये एअर फायबर इन्स्टॉलेशन व सेल्समन कामासाठी मुले पाहिजेत. पगार-१०००० पासून पुढे. संपर्क-९६०७०४५१०५, ७६२०१५४९०१

**पेट्रोल पंपावर** कामगार पाहिजे. संपर्क-९३५६६७०७४६

**पाहिजेत.** आईस्क्रीम व्यवसायासाठी बिलींगसाठी (टॅली) आवश्यक तसेच डिलेव्हरीसाठी ड्रायव्हर काम डिलेव्हरी बॉय पाहिजे. वयोमर्यादा ३५ पर्यंत. हिरो शोरूमजवळ, यड्रावफाटा इचलकरंजी. फोन-७०५८५३५८५३

**ऑफिस कामासाठी** दिवाणजी पाहिजे. ७०६६८५७३४०

**अनबॉक्स मोबाईल प्रिमियम** मोबाईल शॉपमध्ये मोबाईल आणि ॲक्सेसरीज सेलसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार-९००० ते २०००० संपर्क-८७९६१७११११, ९५९५४८७२४२

**दुध डेअरी येथे** कामासाठी जेंटस हेल्पर पाहिजे. ओंकार दुध डेअरी, सांगली नाका, सोलगे मळा, इचलकरंजी. ९३२६०२२९१०

**कार ड्रायव्हिंगसाठी** एक व्यक्ती पाहिजे. ७०६६८५७३४०

**पाहिजेत.** अकौंटंट टॅलीचे ज्ञान आवश्यक, ट्रक ड्रायव्हर-संपर्क-एम.आर. पॉलिमर्स, बोरगाव. ६३६४१२६६५०

**हार्डवेअर दुकानात** अनुभवी/शिकाऊ कामगार व दिवाणजी पाहिजे. उमिया हार्डवेअर, वखारभाग, इचलकरंजी. ८४११०३५४११

**पाहिजेत.** आण्णाज फॅशन शॉपमध्ये कबनूर शाखेसाठी अकौंटंट व नदीवेस नाक्यासाठी सेल्समन पाहिजेत. (पगार-७ ते १० हजार) लेडीज/जेंटस. संपर्क-९५६१७१४२६२

**पाहिजेत.** प्लांट इनचार्ज-२, बीएसस्सी फूड, एमएससी फूड बेकरी कामाचा अनुभवी. बिलींग करिता-२, पदवीधर, टॅली आवश्यक, अनुभवी स्टोअर इनचार्ज-२, पदवीधर, स्टोअर कामाचा १ वर्ष अनुभवी, बस ड्रायव्हर-२. लायसन आवश्यक अनुभवी. फोन-९७६२५६६५५

**रिशेप्सनिस्ट पाहिजे.** कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक, समक्ष भेटा, पाटील आर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी.

**पावडर कोटींग कंपनीमध्ये** काम करणेसाठी होतकरू मुले पाहिजेत व अकौंटींगसाठी मुलगा पाहिजे. संपर्क-९६५७०७८९६६

**इचलकरंजी येथील** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी दु. ३ ते रात्री ११, ८ तास, कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. संपर्क-९९२१०२३०६८

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती मालवाहतुक गाडीवर लायन्सधारक (एलएमव्ही-टीआर) अनुभवी व हुशार. संपर्क-९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**अॅमेझॉन कंपनीमध्ये** डिलेव्हरी बॉय पाहिजेत. पुणे एरिया राहण्याची व जेवणाची सोय आहे. पगार २५०००/-. संपर्क-९१४५३२७७६३, ८४८३९९१३२९.

**डॉमिनोज पिझ्झामध्ये** पिझ्झा डिलेव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. डॉमिनोज पिझ्झा इचलकरंजी पेट्रोल आणि बाईक कंपनीकडून. संपर्क-८६२३०३६०२१

**फ्लिपकार्डमध्ये** इचलकरंजी आणि जवळपास भागात पार्सल डिलेव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क-९५६१८९०२४८, ९९६०४११५८७

**मेडिकल स्टोरसाठी** फार्मासिस्ट पाहिजे. राजवाडा, झेंडा चौक, इचलकरंजी. मो. ९९३९११९०९०९, ९६२३७३२१२०

**पाहिजेत.** सुखमंगल इंडस्ट्रिज या नामांकित कंपनीमध्ये पुढील पदे भरणे आहेत. १) मोल्डींग व मेल्टिंग सुपरवायझर-२. २) लॅब इन्चार्ज-१ ३) लॅब असिस्टंट-२ ४) पॅटर्न मेकर-१ ५) क्वॉलिटी इन्चार्ज-१ ६) मेंटनन्स हेल्पर-२ संपर्क-९५६१८९५२६२, ९६२३४३१५४७

**Senior Staff Required-** to CA Firm for taxation, Audit Finance, Qualification CA/CA Final MBA/M.Com/B.Com Address-Chougule and Associates Chartered Accountants, Ichalkaranji. Mob. 9423858214, E-Mail ID-chougaleassociate@gmail.com

**संजीवनी वायरनेटींग** इंडस्ट्रीजमध्ये साधेलूम चालवणारे कामगार पाहिजेत. कोरोची दररोज फक्त दिवसपाळी पगार १० हजार ते १२ हजार महिना. संपर्क -७६२०५५७७७१.

**पाहिजेत इचलकरंजी** शहर परिसरात पार्ट टाईम शैक्षणिक कामासाठी कौन्सिलर नेमणे आहेत. मो. ८०८७६११०२३.

**चिपींग ग्रायंडिंग** व हेल्पर कामासाठी कामगार पाहिजेत. मो. ९४२२८३८०००, ९४२२८३७०००.

## * हॉटेल विषयक *

**हॉटेल /नाष्टा सेंटरसाठी** फायनांशियल पार्टनर पाहिजे. संपर्क-७७६९९७११७१

## * वधुवर विषयक *

**सर्व समाजातील भरपूर स्थळे** नोंदणी मोफत, मराठा मुलगी, घटस्फोटित नोकरी करणारी वय २९. संपर्क-९५२९४०७२९२

## * कर्ज विषयक *

**होमलोन मॉर्गेज** चालू कर्ज कमी रेटने एनए असो नसो प्लॉटतारण खरेदी प्रॉपर्टी खात्रीने १ कोटीपर्यंत मंजूरी. ९०९६०६५१०५, ७०५८७२१३२५

## * शैक्षणिक *

**Physics, Chemistry,** Maths, Biology (11th, 12th CET, NEET, JEE, Board) Home Tution available. Contact-7057980980

## * आरोग्य विषयक *

**मुळव्याध, कंबरदुखी, गुडघेदुखी, वाई, वात** कफ, पित्त, दमा, धाप इ. विकारावर ९०% गुणकारी आयुर्वेदिक औषध मिळेल. सकाळी १० ते ५. संपर्क-७७६९९७७१७१

## * भाड्याने देणे घेणे *

**१ बीएचके सेमी फर्निश्ड** भाड्याने देणे आहे. सिध्दकला कॉलनी, मुसळे हायस्कूलमागे, सांगली रोड. मो. ८०८७१८४५०६

**महासत्ता चौकजवळ** मोक्याच्या ठिकाणी टॉयलेटसहीत गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-७८८८३१८४५५, ७८८८२४६३७६

**उत्तरमुखी आरसीसी गाळे** भाड्याने देणे आहे. ७५० स्के. फूटाचे २ गाळे महासत्ता चौक, ८० फुटी रोडटच, इचलकरंजी. ९९७०००५५५८, ९६९७०००५५५८

**खुली जागा भाड्याने देणे.** पी.बा.पाटील मळा, टाकवडे रोड, इचलकरंजी. संपर्क-७४४१९६६९६१

**हॉटेल, बँक, पतसंस्था** आणि इतर व्यवसायासाठी आरसीसी दुकानगाळा भाड्याने किंवा विक्रत देणे. संपर्क-स्टेशन रोड, अजब फर्निचरसमोर. ९८२२०६१७०५

**स्टेशन रोड, दत्त मंदिरसमोर** गाळा भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**कुडचे मळ्यामध्ये** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**कुडचे मळ्यामध्ये** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. फक्त शाकाहारींसाठी. ९२७२६२९३५२, ८१४९९१३०८८. एजंट क्षमस्व.

**भाड्याने देणे आहे.** हॉल व गाळा डेक्कन समोर, इचलकरंजी. संपर्क-९५६११७१७८३

**सर्व सोयीनियुक्त** वनरूम किचन (अटॅच संडास बाथरूमसह) जय सांगली नाका भाड्याने देणे. संपर्क-९८३४९२४०३४, ९४२२०४७०५२

**मेडिकल दुकानासाठी** चांदणी चौक येथे मेडिकल व इतर कारणासाठी तयार फर्निचरसह दुकानगाळा भाड्याने देणेचा आहे. ७८८८२०४५१३

**बंगला भाड्याने देणे आहे.** २ बीएचके सर्वसोयीनियुक्त चिंतामणी गणेश मंदिराजवळ, लोकमान्य नगर, कोरोची. संपर्क-९६५७९५७८७३

**भाड्याने देणे.** २ बीएचके सर्वसोयीनियुक्त पार्किंगसह लिफ्टची सोय, ४ था मजला, अलायन्स हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी (शाकाहारी) फोन-९८५००२१३१०

**शाहू कॉर्नर मुसळे बिल्डींगमधील** पहिल्या मजल्यावरील २२५ स्के. फूटाचे २ दुकानगाळे, पतसंस्था, ऑफिस दुकानाकरीता भाड्याने देणे. मो. ९४२२०४४९१४, ९६०५८३३६३९

**गाळा भाड्याने देणे आहे.** १० बाय ३० मायरेखा टॉकीज शेजारी एस.एस. मोबाईलसमोर, कोल्हापूर रोडटच, इचलकरंजी. संपर्क-९९७५१०३७९३

**आरसीसी ३ रूम** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. कोळी डॉक्टर दवाखानाजवळ, दगडी पाण्याच्या टाकीशेजारी, कबनूर, इंदिरा कॉलनी. ९२७०७४५६१२

**भाड्याने देणे** १००० स्के.फुटांचे ऑफिस काचेचे, वेल फर्निश्डसह सर्व सोईनीयुक्त, डॉ. बडे शेजारी, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ७०५७८५१००८.

**दुकानगाळा भाड्याने देणे.** शरद कॉलेजजवळ सुवर्णमनी कॉम्प्लेक्स गाळा नं.९ १२ बाय १४. संपर्क-९६६५११९३९४

**शेड भाड्याने देणे.** आरसीसी २८ बाय ६० चे शेड सर्वसोयीनियुक्त २० एचपी लाईटसह तारदाळ, संपर्क-९५५२९१८६५, ८८०५९१८६८५

**भाड्याने देणे.** ११०० स्के. फूट कमर्शियल ३ बीएचके चे २ फ्लॅट सर्वसोयीनियुक्त बोअरसह कागवाडे मळा, इचलकरंजी. फोन-९९६०९१२९२६, ९८५०१८१८६८

**भाड्याने देणे** चालू कंडीशनमध्ये २३० सेमी सुडोकामाचे १८ एअरजेट लुम शेडसह भाड्याने देणे आहे. मो. ८६६८४०५०४१.

## गौरी-गणपतीसाठी शिराळा आगाराच्या जादा बसेस

**शिराळा,ता.८ (प्रतिनिधी)**

**गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन शिराळा एसटी आगारातील २२ बसेस जादा वाहतुकीसाठी पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे दि. १० ते १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आगारातील काही लांब पल्लयाच्या तसेच ग्रामीण भागातील बसफेऱ्या रद्द करण्यात येणार असून, काही ग्रामीण फेऱ्या उशिराने धावणार आहेत. याची प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहन एस टी आगार वाहतूक नियंत्रक सतीश सुतार यांनी केले आहे.**

या कालावधीत नाशिक, संभाजीनगर, सकाळी ९.३० वाजताची स्वारगेट, चिंचवड, सोलापूर, बारामती आणि अक्कलकोट या लांब पल्ल्याच्या बसफेऱ्या बंद राहणार आहेत.



## एन.डी. चौगुले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षपदी प्रतीक चौगुले

**कोतोली, ता.८(प्रतिनिधी)-**

**सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ,माळवाडी-कोतोली संचलित एन. डी. चौगुले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षपदी प्रतीक चौगुले यांची निवड करण्यात आली.**

संस्थेचे संस्थापक प्रा. एन. डी. चौगुले यांनी २००१ मध्ये संस्थेची स्थापना केली. गेल्या २५ वर्षात संस्थेने कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यात विविध शैक्षणिक शाखांचा विस्तार केला आहे.बालवाडीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणाबरोबरच फूड सायन्स, नर्सिंग, शुगर टेक्नॉलॉजी यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

प्रतीक चौगुले हे शैक्षणिक व सहकार क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. निवडीवेळी संस्थेचे सहसचिव प्रा. अमोल घाडगे, मुख्य लिपिक सर्जेराव पाटील, प्राचार्य विश्वास तळेकर, प्राचार्य अनिकेत पाटील, प्रा. रूपाली चौगुले यांच्यासह संचालक उपस्थित होते. यावेळी प्रतीक चौगुले यांचा सत्कार झाला.

## एस टी आरक्षणासाठी धनगर समाज रस्त्यावर

**आटपाडी,ता.८-**

**धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यात यावा, यासह अन्य मागण्यांसाठी धनगर समाज रस्त्यावर उतरला. आ. गोपिचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. सांगलीत ढोल वाजवत आक्रोश मोर्चा काढला. येळकोट येळकोट, जय मल्हार ! चा नारा घुमला. पलूसमध्ये मेंढ्यांसह चक्काजाम आंदोलन करण्यात आले. आष्टयात अप्पर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. आटपाडीत गजी-ढोलाच्या गजरात तहसील कार्यालयावर धडक देण्यात आली.**


धनगर समाजाच्या न्याय्य हक्कांसह विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर काढण्यात येत असलेल्या आक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर आटपाडीत धनगर समाजाच्यावतीने मोर्चा काढण्यात आला. पारंपरिक धनगरी गजी-ढोलाच्या गजरात निघालेल्या या मोर्चात तालुक्यातील हजारो समाजबांधव सहभागी झाले. मोर्चानंतर तहसीलदार शीतल बंडगर यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

ब्रह्मानंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली दादासाहेब मोटे, जयवंत सरगर, रमेश कातुरे, महादेव पाटील, विष्णू अर्जुन यांच्या उपस्थितीत मोर्चा काढण्यात आला. धनगर समाजाच्या मागण्या केवळ निवेदनापुरत्या मर्यादित न राहता शासनाने त्यांची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली. धनगर समाजाच्या या प्रश्नांकडे शासनाने केवळ आश्वासनांच्या चौकटीत न पाहता ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मोर्चातून व्यक्त झाली. शासनाने या सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

## अज्ञात दिव्यांगाचा उपचारादरम्यान मृत्यू

**निपाणी,ता.८ (प्रतिनिधी)**

**तवंदी हायवेवरील महामार्गाच्या डिव्हायडरमध्ये अत्यंत गंभीर आणि हलाखीच्या परिस्थितीत सोडून देण्यात आलेल्या अज्ञात दिव्यांग व्यक्तीचा सोमवारी बेळगाव जिल्हा रुणालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.**



४ डिसेंबर २०२१ रोजी काही नातेवाईकांनी एका असहाय्य दिव्यांग व्यक्तीला तवंदी हायवेवरील दुभाजक (डिव्हायडर) मध्ये अत्यंत वाईट आणि गंभीर अवस्थेत बेवारस टाकून दिले होते.

हालचाल करता येत नसलेल्या या व्यक्तीची परिस्थिती पाहून परिसरातील माजी नगरसेवक जुबेर बागवान यांच्यासह नागरिकांनी त्यांना निपाणीतील गांधी हॉस्पिटलमार्फत प्रथमोपचार देण्यात आले.

त्यानंतर पुढील उपचारासाठी बेळगाव येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या ५ वर्षांपासून या दिव्यांग व्यक्तीवर बेळगाव जिल्हा रुणालयात उपचार सुरू होते. मात्र, आज त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.



## शेतकऱ्यांचे महावितरण अभियंता यांना निवेदन

टाकवडे,ता.८(प्रतिनिधी)

टाकवडे (ता. शिरोळ) येथील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी आठ तास वीज दिली जात होती. परंतू आता चार तास वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांची पिके वाळत आहेत. पाऊस नसल्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.त्यामुळे तालुका पंचायत समिती सदस्य बंटी उर्फ प्रतीक पाटील यांनी शेतकऱ्यांना आठ तास वीज उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी महावितरणचे अभियंता आडके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. आडके यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन दोन दिवसात आठ तास वीज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.



## निपाणीमध्ये लिंगायत स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम

निपाणी,ता.८(प्रतिनिधी)–

निपाणी शहरातील सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ निपाणीतर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

व्हनशेट्टी पार्कमधील दया गार्डन तसेच लिंगायत स्मशानभूमी परिसरात रोटरीच्या सदस्यांनी स्वच्छता केली.

व्हीएसएम संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोठीवाले व केएलई संस्थेचे संचालक अमर बागेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रोटरीच्या हेल्थकेअर विभागाचे चेअरमन दिलीप पठाडे यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यावेळी परिसरातील कचरा, पालापाचोळा व इतर अनावश्यक वस्तू हटवून स्वच्छता करण्यात आली.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष चेतन लगारे, सचिव राजेंद्र सदलगे, चिंतामणी वाळवे, वीरेंद्र तारळे, सुनील बल्लोळ, रमेश पै, सुहास परमणे, सोमनाथ परमणे, संजय नंदर्गी, गणेश पट्टणशेट्टी, सागर भोसले यांच्यासह रोटरीचे सदस्य उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर २१४ पैकी गुंठेवारी बिगरशेती प्लॉट नं ११ व १२ चे एकत्रीत क्षेत्र ४३७२-०० चौरस फुट ची खुली जागा मिळकत यासी एकत्रीत चतु:सिमा पुर्वेस - गट नं २१३, पश्चिमेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं १०, उत्तरेस - गट नं २१५ सदरची मिळकत ही शंकर भिवा हालके रा इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीची संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही ता . ०८/०९/२०२६

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**

पत्ता:- ३ / १५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूरमो.नं. ९८८१०१४७२५

### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७५४ पैकी प्लॉट नं. ७ चे क्षेत्र- ९६-३२ चौ.मी ची खुली जागा मिळकत संपुर्ण . यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ८ ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. ६ ची मिळकत, दक्षिणेस- २० फुट रस्ता , उत्तरेस- शिरगावे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत हि अशोक सदाशिव माळी, सुनिता अशोक माळी रा. इचलकरंजी यांचे सामाईक कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही ता.०८/०९/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**

ऑफिस :गाळा नं. ३४, राजाराम स्टेडियम, रजिस्टर ऑफीस शेजारी, इचलकरंजी. ७८२०९०९७०५

### जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन - जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी हातकणंगले पैकी मौजे कोरोची येथील ग्रामपंचायत हद्दीतील याचा गट नंबर ६५६ असून याचा प्लॉट नंबर ५ याचे क्षेत्र ३०४५.०० चौ.फु. याचे व २८३.०० चौ.मी.ची बिगरशेती खुली जागा व यामध्ये असणारे इतर पक्के बांधकाम असणारी मिळकत यासी चतु:सिमा पूर्वेस- खुली जागा, पश्चिमेस - २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस- ओपन स्पेस.येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत हि मुळची श्री. महादेव तायाप्पा सूर्यवंशी, रा. कोरोची, यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असुन ती त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांनी सदर मिळकत ही श्री.बालाजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या इचलकरंजी यांच्या बोजा व्यतिरिक्त सदर मिळकत हि निर्वेध,निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून खरेदी देणेचे ठरले आहे. सदर मिळकत संदर्भात कोणताही न्यायालयीन वाद,हक्क, प्रोटगी कोणताही खाजगी सरकारी बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस आज दि.०८/०९/२०२६

**ॲड. बाबासो एम. पाटील**

वार्ड नं.१७/७७ स्वामी विवेकानंद कॉलनी, शाहू पुतळ्या जवळ इचलकरंजी. मो.९२२६८८७००१

## प्रेरणा नागरी पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

इचलकरंजी, ता. ८

**येथील प्रेरणा नागरी सहकारी पत संस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रोटरी क्लब सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सचिव सलीम मुजावर यांनी विषयांचे वाचन केले.सभेपुढील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.**



प्रेरणा नागरी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना अण्णासाहेब शहापुरे शेजारी बाळगोंडा पाटील, सतिश मगदूम, शिवगोंडा पाटील आदी.

स्वागत व प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब शहापुरे यांनी, संस्थेचा फक्त नफा मिळविणे हा एकच उद्देश नसून समाजातील सर्व घटक, छोटे व्यावसायिक , व्यापारी, लघुउद्योजक, कामगार, वाहतूकदार व गरजूंना पतपुरवठा केला असून, कर्जदार सभासदांनी कर्जाची रक्कम वेळेत भरून कर्ज वसुलीस सहकार्य करून कायदेशीर कटू प्रसंग टाळावेत, असे आवाहन केले.

सभेला सतीश मगदूम, शिवगोंडा पाटील, अशोक चणविरे, प्रदीप पाटील, राजू हुपरे, प्रमोद केस्ती, संतोष हंकारे,बाजीराव साससे, सुभाष आमाशी, रमजान बालेखान, संजय चरविणे, संजीवनी उरणे, सुमन शेट्टी,आलमआरा नदाफ, राजेंद्र मोरे यांच्यासह सभासद उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक बाळगोंडा पाटील यांनी आभार मानले.



## पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

**कबनूर,ता.८ – येथील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील नागरी सहकारी पतसंस्थे ची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मामा लिगाडे सांस्कृतिक भवन दिगंबर जैन मंदिर, याठिकाणी खेळीमेळीत झाली.**

संस्थेच्या सेक्रेटरी स्मिता पाटील यानी,विषय पत्रिकेचे वाचन केले.सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली.सं. चेअरमन ज्ञानदेव बडवे यांनी अहवाल वाचन करून संस्थेच्या सांपत्तीक स्थितीचा आढावा घेतला.यावेळी संजय केटकाळे, धनंजय कोले, पांडूरंग वाकरेकर, यांच्यासह शांतीनाथ पतसंस्थेचे चेअरमन मिलिंद कोले यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर २९३ पैकी प्लॉट नंबर १८ चे क्षेत्र २१० चौरस मिटर ची जागा मिळकत यासी चतु:सिमा- पुर्वेस - श्री दत्तात्रय नरळे यांची मिळकत. पश्चिमेस - २० फुट रस्ता. दक्षिणेस - श्री शिवाजी जाधव यांची मिळकत. उत्तरेस - प्लॉट नंबर १७ ची मिळकत सदर ची मिळकत श्री. पंकज नवनाथ जाधव रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री राहुल रघुनाथ पाटील रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इज़मेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.०७/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

मौजे तमदलगे येथील गट नं. ३८७ पैकी ३८२४१ चौ. फुट ची मिळकत. यासी चतु: सिमा-पुर्वेस - वाघमोडे यांची मिळकत, पश्चिमेस -५० फुट रस्ता, दक्षिणेस - संदिप भिमाणे यांची मिळकत, उत्तरेस- चिंचवाडे यांची मिळकत. सदर मिळकत ही मूळची श्री नुतन बाळासाहेब चोपडे रा. रेंदाळ, शांताबाई सर्जेराव येडके रा. आष्टा शालाबाई रामचंद्र पुणेकर रा. तमदलगे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यानी श्री अशोक सदाशिव माळी यांना करारपत्र करून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी संचकारपत्र केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही बोजा, हक्क, दावा, पोटगी, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता.०७/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६३९ पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे/ प्लॉट नं. १५ मधील पूर्व बाजूचे क्षेत्र ७८६ चौरस फुट ची जागा मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस- श्री कदम यांची मिळकत, पश्चिमेस श्री पाथरवट यांची मिळकत, दक्षिणेस- श्री. भगाटे यांची मिळकत, उत्तरेस- रस्ता सदर मिळकत ही श्री. नजीर- अब्दुल नदाफ रा. इचलकरंजी यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी करारपत्र केलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. ०८/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

ता. शिरोळ पैकी मौजे नांदणी हद्दीतील गट नं. ३५९ पैकी क्षेत्र १५०.० चौ.मी. ची जागा मिळकत यासी चतु:सिमा - पुर्वेस : विजय माणगांवे यांची मिळकत, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : आप्पासो माणगांवे यांची मिळकत, उत्तरेस : खातुनबी अल्ला कुरणे यांची मिळकत. सदर मिळकत श्री सचिन अशोक व्हटकर यांचे मालकीची असून, त्यांनी सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांना संचकार चिठ्ठि लिहून दिलेले असून आमचे अशिल लवकरच सदर मिळकत खरेदी करणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्कसंबंध, दावा, पोटगी, कर्जबोजा वगैरे असलेस नोटीस प्रसिध्दिपासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली जाहीर नोटीस सही दि.०८/०९/२०२६.

**ॲड. सुनिल सुरेंद्र धुपदाळे,**

पत्ता - १७ / २९४, पुजारी मळा, ए.एसी. कॉलेज मागे, इचलकरंजी, मो. नं. ९३२६०२२३८५.

## तारदाळ ग्रामीण पतसंस्थेला ८१ लाखांचा निव्वळ नफा

### के. जी. पाटील यांची माहिती

तारदाळ,ता.८(वार्ताहर)

**तारदाळ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ८१ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, पुढील वर्षी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक नफा मिळविण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष के. जी. पाटील यांनी दिली.**



तारदाळ ग्रामीण पतसंस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना संस्थापक चेअरमन के.जी. पाटील शेजारी प्रसाद खोबरे,प्रियांका खोबरे, दत्तात्रय मगदूम आदी.(छाया – गजानन खोत)

येथील तारदाळ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा राम मंदिरात खेळीमेळीच्या वातावरणात झाली. प्रमुख पाहुणे म्हणून सहकारी संस्थेचे कंगने उपस्थित होते.

के. जी. पाटील यांनी आर्थिक प्रगतीचा आढावा घेत संस्थेकडे सध्या ३२ कोटी रुपयांच्या ठेवी असून, १७ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेची गुंतवणूक २३ कोटी रुपये असल्याचे सांगितले.

यावेळी माजी जि.प.सदस्य प्रसाद खोबरे, पं.स. सदस्या प्रियंका खोबरे, चंद्रकांत चौगुले, प्रकाश खोबरे, यासीन मुजावर, कुमार चौगुले, उपाध्यक्ष दत्तात्रय मगदूम, संचालक केशव कोळी, डॉ. राजेश पाटील, नितीन चौगुले,मदन चौगुले,दत्तात्रय खांडेकर, शालाबाई खोत, अनिता मगदूम, सचिव श्रीकांत चौगुले यांच्यासह सेवकवर्ग, सभासद उपस्थित होते.

## आ. सतेज पाटील यांनी घेतल्या ठरावधारकांच्या गाठीभेटी

निढोरी,ता.८(वार्ताहर)

**कोल्हापूर जिल्हा दूध संघ (गोकुळ) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून आ. सतेज पाटील यांनी कागल दौऱ्यादरम्यान ठरावधारकांच्या गाठीभेटी घेतल्या. निढोरी येथील सुरेशराव सूर्यवंशी आणि बिद्रीचे संचालक सुनीलराज सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनी गोकुळ निवडणुकीसंदर्भात चर्चा केली. यावेळी सूर्यवंशी गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच त्यांनी सामाजिक कार्यकर्ते देवानंद पाटील यांच्याही निवासस्थानी भेट दिली.**



आ.सतेज यांचे स्वागत करताना सुरेशराव सूर्यवंशी, सुनीलराज सूर्यवंशी.

गोकुळ ही सर्वसामान्य दूध उत्पादकांची जीवनवाहिनी असून तिचा राजकीय आखाडा होऊ नये,अशी भावना सामान्य शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. सध्या महायुतीमधील जागावाटपा चा पेच सुटणे कठीण असल्याने बड्या नेत्यांनी स्वतंत्रपणे मतदारांची चाचपणी सुरू केली आहे. जिल्ह्यात मंत्री हसन मुश्रीफ यांचे मोठे वजन असल्याने गोकुळचे सत्ताकेंद्र त्यांच्याभोवती फिरताना दिसत आहे.

या निवडणुकीत पक्षीय लेबलपेक्षा नेत्यांच्या वैयक्तिक फॉर्म्युलावरच पॅनेलची निर्मिती होण्याची शक्यता असून, बिनविरोधची शक्यता सध्या तरी मावळल्याचे चित्र आहे.

### जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. ८४ पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे प्लॉट नं. ६ चे क्षेत्र २००० चौरस फुट ची जागा मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस - सारडा यांची मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस- श्री. पटवेगार यांची मिळकत, उत्तरेस- श्री. माने यांची मिळकत. सदर मिळकत ही श्री. सुनिल चंद्रकांत बिडकर व सौ. सीमा सुनिल बिडकर रा. पुणे यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी संचकारपत्र केलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता ०७/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नंबर ९८४ पैकी क्षेत्र हे ०.१०.०० आरची शेतजमीन मिळकत सर्व यासी चतु:सिमा पुर्वेस- श्री. मोगरे यांची मिळकत, पश्चिमेस-रस्ता, दक्षिणेस- सरकारी रस्ता, उत्तरेस- श्री. अजित पाटील यांची मिळकत, सदरची मिळकत ही सुगंधा रविंद्र बुचडे रा. शहापूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून १५ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना, कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन - जिल्हा तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी इचलकरंजी मा. सह दुय्यम निबंधकसो, वर्ग २ इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील मौजे कबनूर येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

क.ग.नं. २१ एकूण क्षेत्र ३.५६ आर पो ख. ०.०४.०० आर आकार रु. १०= ३१ पैसे यापैकी क्षेत्र हे. ०.०१.३६ आर आकार रु. ०.०४ पैसेची मिळकत यासी चतु: सिमा खालीलप्रमाणे पुर्वेस - खतीब वकील यांची मिळकत, पश्चिमेस - सालूटगी यांची मिळकत, दक्षिणेस- ४० फूट रस्ता, उत्तरेस - तहसिलदार यांची मिळक़त, येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळक़त त्यामधील दगड, माती, जल, ही यानोटीसीचा विषय आहे. वरील नमूद मिळकत ही महेश सिताराम पाटील व सुरेश सिताराम पाटील रा. कबनूर यांच्या मालकीची असून सदर व्यक्ती आमचे अशिल श्री विठ्ठल रखुमाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. इचलकरंजी यांचे संस्थेचे सभासद असून त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलाना दिला आहे सबब सदर मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही हक्कसंबंध करार, अधिकार, बोजा वगैरे असलेस तो त्यांनी आजपासून ७ (सात) दिवसाचे आत आम्हास खालील पत्यावर कागदपत्रावर लेखी पटवून द्यावी तदनंतर येणारी हरकत, तक्रार वगैरे आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस अशी दि. ०८/०९/२०२६

**ॲड. सोनल आनंदा कदम**

रा. ओंकार चौक, कबनूर, जि. कोल्हापूर मोबाईल नं. ७०३८७३६७७३

### जाहीर नोटीस

१) श्री. राहुल कुमार ढाले, रा. म्हसोबा रोड, बौध्दा समाज मंदिर, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, २) श्री. संकेत सुनिल रोकडे, रा. चौंडेश्वरी कॉलनी, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर तर्फे वकिल - ॲड. शुभम उर्फ विकास विजयकुमार बेले, रा. शुभंकरोती हाऊस, जैन बस्ती जवळ, भैरववाडी - कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेकडून......

आमचे अशिलांनी दिले माहिती व अधिकारावरून व दाखविले कागदपत्रांवरून तमाम लोकांना, पतसंस्थांना, तसेच बँकांना या जाहीर नोटीसींने कळविणेत येते की,

१)मिळकतीचे वर्णन - मौजे अब्दुललाट, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील गट नंबर - २६३४ एकूण क्षेत्र हे ०.५०.०० आर आकार रु. १.१२ पै. ची शेत जमीन मिळकत असून, यापैकी श्री. बाळू उर्फ बाळासो दत्तू पोवार व रामचंद्र दत्तू पोवार यांचे सामाईक मालकी व हिस्सेची तिचे क्षेत्र हे. ०.४७.६४ आर त्याचा आकार रू. १.०७ पै. ची शेत जमीन मिळकत. यापैकी श्री. बाळू उर्फ बाळासो दत्तू पोवार, रा. वर्धमान चौक, अब्दुललाट, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांची वडिलार्जित मालकी व कब्जे - वहिवाटीची शेत जमीन मिळकत असून, त्यांचे हिस्सेस येणारी शेत जमीन तिचे क्षेत्र हे ०.२३.८२ आर, आकार रु. ०.५३ पै. ची शेत जमीन मिळकत. यासी चतु:सिमा.-

पूर्वेस-याच गट नंबर मधील उल्हास बापू गवराई यांची क्षेत्र हे ०.०२.३६ आर ची शेत जमीन मिळकत.

पश्चिमेस-याच गट नंबर मधील रामचंद्र दत्तू पोवार यांची क्षेत्र हे ०.२३.८२ आर ची शेत जमीन मिळकत.

दक्षिणेस-श्री. कुबेर बरगाले यांची शेत जमीन मिळकत.

उत्तरेस-श्री. पारीसा बरगाले यांची शेत जमीन मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनांची शेत जमीन मिळकत असून, सदर मिळकतीमध्ये सामाईक वहिवाटीचा अंतर्गत रस्ता आहे.

२)वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. बाळू दत्तू पोवार, वगैरे यांच्या सामाईक मालकी व हिस्सेची शेत जमीन मिळकत असून, त्यांनी सदर मिळकतीचे खरेदीपूर्व करारपत्र करून देवून, आमचे अशिलांच्याकडून संचकार रक्कम ही स्विकारली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची खात्री आमचे अशिलांना देणेत आली आहे.

३) तरीही वरील वर्णनांच्या मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा इ. वगैरे बाबत तक्रार असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर आपली तक्रार लेखी अथवा प्रत्यक्ष भेटून सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत अथवा तक्रार न आलेस आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. व त्यानंतर कोणाचीही कोणतीही हरकत वा तक्रार चालणार नाही. हरकत दारांनी त्यांच्या हरकती / तक्रार स्वेच्छेने सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल. व खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी म्हणून दिली जाहिर नोटीस.दि. ०७/०९/२०२६.

उपरोक्त अशिलांतर्फे वकिल-

**ॲड. शुभम उर्फ विकास विजयकुमार बेले**

रा. ''शुभंकरोती हाऊस'', भैरववाडी-कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर मो. ७७४३८३९३३२

ई-मेल - shubhambele777@gmail.com

# नाविन्यपूर्ण विचारातून उद्योगक्षेत्रातील संधीचा लाभ घ्या

राकेश कुमार शर्मा

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)-

**सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या औद्योगिक युगात विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता नाविन्यपूर्ण विचार, कौशल्य विकास आणि उद्योजकीय दृष्टिकोन आत्मसात करून उद्योगक्षेत्रातील नवनवीन संधींचा लाभ घ्यावा,असे प्रतिपादन डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राकेश कुमार शर्मा यांनी केले.**

डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या ई-सेलतर्फे आणि आयआयटी बॉम्बे नॅशनल आंत्रप्रेन्युअरशिप चॅलेंज २०२६ अंतर्गत आयोजित 'युरेका उद्योजकीय पिच स्पर्धे'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



युरेका उद्योजकीय पिच स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित डॉ.राकेश कुमार शर्मा व इतर प्रमुख मान्यवर.

विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप संस्कृती आणि सर्जनशीलता रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत ५७ संघांमधील २१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या नावीन्यपूर्ण व्यावसायिक कल्पना सादर केल्या. डॉ.राकेश शर्मा यांनी उद्योग क्षेत्रातील बदलते प्रवाह, औद्योगिक क्षेत्रातील प्रगती आणि भविष्यातील संधी यावर विचार व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी बदलत्या औद्योगिक वातावरणाशी जुळवून घेत नाविन्यपूर्ण विचार, कौशल्यविकास आणि उद्योजकीय दृष्टिकोन आत्मसात करण्याचे आवाहन केले.स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे संचालक डॉ. अजित पाटील यांनी उद्योगाचे महत्त्व तसेच विद्यार्थ्यांच्या करिअरमध्ये उद्योगक्षेत्राची असलेली भूमिका अधोरेखित केली. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत नाविन्यपूर्ण व्यावसायिक कल्पना व स्टार्टअप संकल्पना सादर करण्यात आल्या. नावीन्यपूर्णता, व्यवहार्यता, बाजारपेठेतील क्षमता, व्यवसाय मॉडेल आणि सादरीकरण कौशल्य या निकषांवर ७ संघांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

या स्पर्धेत डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटने प्रथम क्रमांक, डी.वाय. पाटील कृषी व तांत्रिक विद्यापीठ, तळसंदेने द्वितीय तर डॉ.सायरस पूनावाला स्कूल, वडगावने तृतीय क्रमांक प्राप्त केला. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आम.सतेज डी.पाटील,ऋतुराज पाटील आणि पृथ्वीराज पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. कार्यक्रमास डॉ.ए.एम.गुरव, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# ग्रामसचिवालयाची वास्तु सुसज्ज उभारणार

-आम.महाडिक

हेरले,ता.८(प्रतिनिधी)-

**पुलाची शिरोली येथे आगामी ५० वर्षांचा दूरदृष्टीने विचार करून सर्व प्रशासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी नवीन भव्य व सुसज्ज तीन मजली ग्रामसचिवालय इमारतीचा भूमिपूजन सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. आमदार अमल महाडिक आणि आमदार अशोकराव माने यांच्या शुभहस्ते हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी सरपंच सौ.पद्मजा करपे या होत्या.**

कार्यक्रमाची सुरुवात छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहून करण्यात आली. त्यानंतर आमदार अमल महाडिक व आमदार अशोकराव माने यांच्या हस्ते धार्मिक विधी संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व कुदळ मारून प्रत्यक्ष बांधकामाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला.



पुलाची शिरोलीत ग्रामसचिवालय इमारतीच्या पाया खुदाई प्रसंगी बोलताना आम.अमल महाडिक, सोबत आम.अशोक माने, सरपंच पद्मजा करपे, कमल कौंदाडे, अरुण माळी, राजेश पाटील आदी.

यावेळी आमअमल महाडिक म्हणाले की, 'पुलाची शिरोलीच्या भविष्यातील ५० वर्षांच्या गरजा विचारात घेऊन ही तीन मजली भव्य प्रशासकीय इमारत उभारली जात आहे. यामुळे सर्व प्रशासकीय सेवा एकाच छताखाली मिळून ग्रामस्थांची मोठी सोय होणार आहे. या इमारतीसाठी सध्या सव्वा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, वर्षभरात हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ही वास्तू उभारताना निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही,'असे आश्वासनही त्यांनी दिले. आम अशोकराव माने म्हणाले की, 'या ग्रामसचिवालय इमारतीसाठी मी स्वतः २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून,आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. सरपंच पद्मजा करपे यांनी शिरोलीच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण पंचायत समिती व ग्रामपंचायत कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास कमल कौंदाडे, अरुण माळी,सुरेश पाटील, दिलीप पाटील,विजय जाधव, डॉ. सोनाली पाटील,सलीम महात,मीनाक्षी कांबळे, उदय पाटील, राजेश पाटील, धनाजी पाटील, प्रकाश कौंदाडे, बाळासाहेब पाटील,श्रीकांत कांबळे, सुजाता पाटील, मनीषा सकपाळ, नजिया देसाई, वसिफा पटेल, अनिता शिंदे, विजय पाटील, सचिन गायकवाड, श्रीधर पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक गीता कोळी यांनी केले.स्वागत बाजीराव पाटील यांनी केले.आभार कृष्णात करपे यांनी मानले.

## धनगर आरक्षणासाठी शाहूवाडीत तीव्र निदर्शने

मलकापूर,ता.८(प्रतिनिधी)-

**धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने सोमवारी शाहूवाडी तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. ढोल-कैताळाच्या पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि जोरदार घोषणाबाजीने तहसील कार्यालयाचा परिसर दुमदुमून गेला.**

आंदोलकांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार शुभांगी जाधव यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असून, शासनाने आता कोणतीही संदिग्ध भूमिका न घेता सर्वोच्च न्यायालयात धनगर समाजाची बाजू पूर्ण कायदेशीर ताकदीने मांडावी आणि हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा,अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनाचे नेतृत्वकर्ते पांडुरंग वगरे म्हणाले,शासनाने समाजाच्या भावनांचा अंत न पाहता आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी. या आंदोलनावेळी स्वाभिमानी पँथरचे अध्यक्ष प्रकाश कांबळे, दिलीप बंडगर, सतीश काळे, शुभम साखरे, सुनील काळे, अनिल कांबळे, सचिन कांबळे, प्रदीप माने, रवी शिसाळ, रायसिंग शिसाळ, शंकर शिस आदी उपस्थित होते.



## व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूलचे महाराष्ट्र प्रज्ञाशोध परिक्षेत सुयश

कबनूर,ता.८-

**महाराष्ट्र प्रज्ञाशोध आणि सर्वोत्कृष्टता केंद्र, पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परिक्षेत व्यंकटेश्वरा स्कूलमधील प्रणिल राहुल चांडक इ. ९ वी हा तालुकास्तरावर बक्षीसपात्र ठरला तर अदित्य आश्विन चिल्लाळ इ. ९ वी याने उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले तसेच प्रशालेतील एकूण १६ विद्यार्थी प्रशस्तिपत्रधारक ठरले.**

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन दीपक राठी, व्हा. चेअरमन,रामजी मुंदडा, सेक्रेटरी कमलेश राठी, ट्रेझरर महेश भुतडा, जॉ.सेक्रेटरी राजेश लोया, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. स्मिता ढेरे बालकांचे यांनी कौतुक केले तर चिफ-को-ऑडिनेटर्स, को-ऑर्डिनेटर्स, शिक्षकवृंद यांनी यशस्वितांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सै.टाकळीत इको फ्रेंडली गणपती बनवण्याची कार्यशाळा संपन्न

सैनिक टाकळी,ता.८(प्रतिनिधी)-

**श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, सैनिक टाकळी येथे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने इको फ्रेंडली गणपती बनवण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली.**

या कार्यशाळेत एम. एम. धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मातीपासून आकर्षक व पर्यावरणपूरक श्री गणेशाच्या मूर्ती तयार केल्या. कार्यशाळेनंतर शाळेच्या वतीने उत्कृष्ट कलाकृती सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन मुख्याध्यापक विनोद पाटील यांच्या हस्ते सत्कार सत्कार केला.

# मुक्त विद्यापीठात प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांनी ज्ञानवर्धन करावे

विरूपाक्ष खानाज

इचलकरंजी,ता.८-

**ज्ञान साधनेसाठी वय, लिंग, जाती-धर्माचे बंधन नसते. ज्ञान साधनेसाठी खडतर मेहनत, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाची गरज असते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचवण्याचे काम केले आहे.**

अभ्यासकेंद्रामध्ये बी. ए.,बी.कॉम., बी.बी.ए., बी. ए. एम.सी.जे., (वृत्तपत्रविद्या पत्रकारिता डिग्री / डिप्लोमा) एम. ए. (मराठी / हिंदी /इंग्रजी / उर्दू / अर्थशास्त्र/ राज्यशास्त्र/समाजशास्त्र/लोकप्रशासन / इतिहास) एम.कॉम.आणि एम.बी.ए.



उद्बोधन सत्रात बोलताना प्रा.विरुपाक्ष खानाज व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

(एम.बी.ए. एन्ट्रान्स सुरु आहे.) अशा अनेक अभ्यासक्रमांना १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत प्रवेश सुरू असून त्याचा लाभ घेत प्रामाणिकपणे ज्ञान संपादन करून आपला विकास केला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विरूपाक्ष खानाज यांनी केले.

नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स-इचलकरंजीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित नवोदित विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी उद्बोधन सत्रात अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.विद्यार्थी उद्बोधन सत्राच्या सुरूवातीला केंद्र समन्वयक डॉ. आर.व्ही. सपकाळ यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयातील समंत्रक प्रा.एफ.एन.पटेल, प्रा.सौरभ पाटणकर, डॉ.संतोष साळुंखे, प्रा.ओंकार कुलकर्णी, प्रा.स्मिता मंतेरो, प्रा.एस.एस.पाटील, प्रा.अर्जुन पाटील, प्रा.गिरीष कुलकर्णी, प्रा.पी.बी.पाटील आदिसह विविध वर्गाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ.आर.व्ही. सपकाळ यांनी केले.डॉ.माधव मुंडकर यांनी आभार मानले.

## शहरात सुरु असलेल्या विविध कामांना गती द्या-डॉ.भारूड

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)-

**शहरातील विविध विकासकामे, नागरी सुविधा, महसूलवाढ, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा तसेच आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामांना गती देण्याच्या सूचना आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या.**

नागरिकांच्या समस्या विभागीय कार्यालय स्तरावरच तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक ते अधिकार प्रदान करण्यात येतील असेही त्यांनी स्पष्ट केले.आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

घरफाळा, अतिक्रमण,परवाना आदी विषयांबाबत सहा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. यावेळी अतिरिक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर, उप-आयुक्त किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त उज्वला शिंदे, स्वाती दुधाणे, डॉ. विजय पाटील, संजय सरनाईक, मुख्य लेखापरिक्षक कलावती मिसाळ, शहर अभियंता रमेश मस्कर, जल अभियंता हर्षजीत घाटगे, आरोग्याधिकारी डॉ.प्रकाश पावरा, नगरसचिव सुनील बीद्रे, उपशहर रचनाकार महादेव फुलारी आदी उपस्थित होते.

## गंगामाई विद्यामंदिरतर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान

इचलकरंजी,ता.८-

**सौ.गंगामाई विद्या मंदिर व रोटरी क्लब टेक्स्टाईल सिटी यांच्याकडून शिक्षक दिना निमित्त आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आले.**

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब टेक्सटाईल सिटीचे अध्यक्ष हेमंत दोषी, सेक्रेटरी शैली जैन, सौ.दिप्ती मराठे, संस्था अध्यक्षा सौ. प्रिती कट्टी,संस्था सेक्रेटरी सौ.पूर्वा सौंदत्तीकर, शाळा सेक्रेटरी सौ.आर्या चांदेकर, सर्व कार्यकारिणी, मुख्याध्यापिका सौ.छाया गवळी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सौ.गंगामाई महिलालय संस्थेतर्फे



आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त विजेत्या शिक्षिका.

दरवर्षी दिला जाणारा 'वेणू विठ्ठल दातार' हा आदर्श शिक्षिका पुरस्कार यावर्षी सौ.भक्ती द्रविड यांना प्रदान करण्यात आला.

रोटरी क्लब टेक्सटाईल सिटी यांच्याकडून मुख्या.सौ.छाया गवळी, सौ.शितल खानाज व सौ. श्वेता कचरे यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. दोन्ही संस्थांकडून सर्व शिक्षिकेंना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सौ.प्रिती कट्टी यांनी व आभार सौ.आर्याताई चांदेकर यांनी मानले. सूत्रसंचालन सौ.स्वाती पाटील यांनी केले.

## बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार


आष्टा,ता.८(प्रतिनिधी)-

**बिबट्याने शेतात वस्तीवर असलेल्या मेंढपाळाच्या कळपावर हल्ला केला. मेंढपाळानी टॉर्च पाडून आरडाओरड करताच बिबट्या पळून गेला.बिबट्याच्या हल्ल्यात अनिल मोहन गावडे यांची एक शेळी ठार झाली.**

आष्टा दुधगाव रस्त्यावर काळा ओढा परिसरात सोमवारी मध्यरात्री ही घटना घडली. मेंढपाळानी प्रसंगावधान दाखवल्याने कळपामधील अनेक मेंढ्यांचा जीव वाचला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनेचा पंचनामा केला.


## श्री गुरुदेव आध्यात्मीक केंद्र

यांच्या विद्यमाने



श्रावण मास समाप्ती निमित्त

कणेरी मठाचे अधिपती

परमपूज्य श्री अदृश्य काडसिध्देश्वर स्वामीजी यांचे

आध्यात्मिक प्रवचन

बुधवार, दि. 9 सप्टेंबर 2026 रोजी सायंकाळी 6 ते रात्री 8 पर्यंत.

तरी सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा.

पंचवटी टॉकीज मागे, रुग्गे मळा, इचलकरंजी.

श्रीहरी शुक्रवार, ता. ४/०९/२०२६ पासून रोज ३ खेळ, दु. १ वा.

ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच मिस डॉली

४ व ७ वा.

A हॉट लडकी प्रौढांसाठी

श्रीदत्त शुक्रवार, ता. ४ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता

मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट

द रिव्हेंजर

A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A


















# सामाजिक उपक्रमांतून गणेशोत्सव साजरा करा

## तहसीलदार शामला खोत; शिराळ्यात गणेश मंडळांची बैठक

शिराळा,ता.८(प्रतिनिधी)-

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिराळा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच डॉल्बीमुक्त, ध्वनी प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले.**



शिराळा तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत बोलताना तहसीलदार शामला खोत, समवेत इतर अधिकारी.

गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी, सरपंच, पोलिस पाटील, ग्रामसेवक तसेच गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक शिराळा तहसीलदार कार्यालयात घेण्यात आली. बैठकीस तहसीलदार शामला खोत-पाटील, पोलिस निरीक्षक जंभाजी भोसले, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुरज कांबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप गादेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तहसीलदार शामला खोत-पाटील यांनी गणेशोत्सव काळात सर्व गणेश मंडळांनी कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन केले. त्या म्हणाल्या, ध्वनी प्रदूषण टाळून पर्यावरणपूरक पद्धतीने तसेच सामाजिक उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविण्यावर मंडळांनी भर द्यावा. राज्य शासनाच्या गणेशोत्सव स्पर्धेत तालुक्यातील नोंदणीकृत गावांमधील गणेश मंडळांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. मंडळांनी केलेल्या सामाजिक, पर्यावरणपूरक तसेच जनजागृतीपर उपक्रमांची माहिती स्पर्धेसाठी सादर करावी, असे आवाहनही त्यांनी केले. गणेशोत्सव मंडळांनी महाप्रसादाचे आयोजन करण्यापूर्वी आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे. अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दिलेल्या नियम व सूचनांचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धकांच्या वापराबाबत शासनाने निर्धारित केलेल्या ध्वनी मर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पोलिस निरीक्षक जंभाजी भोसले म्हणाले, गणेश मंडळांनी नगरपंचायत, पोलिस ठाणे तसेच संबंधित विभागांकडून आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे. गणेशोत्सव काळात मिरवणुका व इतर कार्यक्रम शांततेत पार पडण्यासाठी मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे. गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. मंडप उभारताना वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच विद्युत जोडणी घेताना आणि मंडपावर विद्युत रोषणाई करताना योग्य ती खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीस भीमराव यादव, विनोद पाटील यांच्यासह तालुक्यातील सरपंच, पोलिस पाटील, ग्रामसेवक, गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शेतकऱ्यांसाठी आज विशेष प्रशिक्षण

सातारा,ता.८(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत आले पिकाच्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम बुधवार ता.९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता, सोनगाव तर्फ सातारा, येथील राधाकृष्ण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.**

या प्रशिक्षणामध्ये आले पिकाविषयी एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, आले पीक उत्पादन वाढ ते आले प्रक्रिया व मुल्यवर्धन तसेच आले पिकातील विविध टप्प्यामधील भर नियोजन व मशिनरी प्रात्यक्षिक या तांत्रिक बाबींवर सखोल मार्गदर्शन या बरोबर बायोमिक्स, ट्रायकोडर्मा, सोलर लाइट ट्रॅप, पिवळे निळे चिकट सापळे इ.विषयी उपस्थित शेतकऱ्यांना विशेष तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सदर मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन सातारा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर ठोस निर्णय घ्या

कराड,ता.८(प्रतिनिधी)-

**धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कराड तालुक्यातील धनगर समाज बांधवांनी तहसील कार्यालयावर धडक दिली. ढोल वाजवत करण्यात आलेल्या या आंदोलनातून एसटी आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करण्यासह विविध मागण्यांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.**



कराड : येथे तहसील कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी धनगर समाजाने ढोल वाजवून आंदोलन केले.

### मागणीसाठी कराड येथे ढोलाचा गजर करत आंदोलन

आंदोलनकर्त्यांनी प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे व निवासी नायब तहसीलदार बाबुराव राठोड यांची भेट घेऊन शासनाच्या नावे मागण्यांचे निवेदन सादर केले. धनगर समाजाला एसटी आरक्षण मिळणे हा कायदेशीर व घटनात्मक अधिकार असून, त्यासाठी समाजाच्यावतीने गेल्या अनेक वर्षांपासून लोकशाही मार्गाने आंदोलने, मोर्चे व निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, अद्यापही या मागणीवर शासनाकडून अंतिम व ठोस कार्यवाही झालेली नसल्याने समाजात असंतोष निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

आरक्षणाच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणात शासनाने ठोस भूमिका मांडून प्रतिज्ञापत्र दाखल करावे. तसेच आरक्षणाबाबत प्रतिकूल निर्णय झाल्यास समाजाच्या हितासाठी पर्यायी 'प्लॅन बी' तयार ठेवावा, अशी मागणीही करण्यात आली. याशिवाय आदमापूर येथील संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करून देवस्थानच्या व्यवस्थापन मंडळात किमान ३१ विश्वस्तांचा समावेश करावा. तसेच धनगर समाजातील व्यक्तीला अध्यक्षपद देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील मिसिंग लिंकला स्वातंत्र्यवीर शिंगोबा धनगर यांचे नाव द्यावे, तसेच मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.



राजारामनगर येथे उमाजी नाईक यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, समवेत इतर मान्यवर.

## राजारामनगर येथे आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक जयंती साजरी

ईश्वरपूर,ता.८(प्रतिनिधी)-

**आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरोधात सशस्त्र उठाव करून स्वातंत्र्य लढ्याची मुहूर्तमेढ रोवली आहे. त्यांनी स्वातंत्र्य,स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष ही मूल्ये समाजाला दिली आहेत. नव्या पिढीने त्यांचे विचार आणि संघर्षाचा आदर्श आत्मसात करावा,असा विश्वास उरुण ईश्वरपूरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे यांनी व्यक्त केला.**

राजारामनगर (मंडले वस्ती) येथे आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांची २३५ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सागर जाधव, प्रकाश जाधव, प्रकाश शेळके, राजवर्धन लाड, अविनाश सावंत,दाजी शेळके, योगेश शेळके, अमोल पाटोळे,अमोल मंडले, उमाजी मंडले,नितीन मंडले, विकास मंडले, आकाश मंडले,वैभव मंडले प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अनेक समाज बांधव उपस्थित होते.

## प्रा.शरद पाटील महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनी गुणवत्ता यादीत

मिरज,ता.८(प्रतिनिधी)-

**लोकनेते प्रा.शरद पाटील महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील तीन विद्यार्थिनींनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये झालेल्या एम.एस्सी.भाग-२ परीक्षेच्या शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**



या गुणवत्ता यादीत सबीहा किल्लेदार हिने ८५.७५ टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक, तर अंजली कौलापुरे हिने ८४.९५ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तसेच जुवेरिया शेख हिने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक मिळविला आहे. या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेच्या चेअरमन ॲड. सरोज रायनाडे,प्रभारी प्राचार्य डॉ.एस.बी. गायकवाड, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ.विनय चौगुले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# सर्वसामान्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविणार

## खा.उदयनराजे; कोरेगावात नागरिकांशी साधला संवाद

कोरेगाव,ता.८(वार्ताहर)-

**सातारा जिल्हा संपर्क दौऱ्यांतर्गत खास.उदयनराजे भोसले यांनी कोरेगाव येथे भेट देऊन शहर व परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधला.**



खास.उदयनराजे भोसले यांचा सत्कार करताना जयवंत पवार, सुनील खत्री, राहुल बर्गे व इतर मान्यवर.

माजी उपनगराध्यक्ष जयवंत पवार यांच्या निवासस्थानी आयोजित या संवाद कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ.सौ. प्रियाताई शिंदे, भाजपचे सातारा लोकसभा मतदारसंघाचे संयोजक सुनील काटकर, प्रतापगड विकास प्राधिकरणाचे सदस्य काका धुमाळ, ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. रमेश पाटील, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील खत्री,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहुल बर्गे, जि.प.सदस्य हणमंतराव जगदाळे, रत्नदीप फाळके, माजी सदस्य किरण बर्गे, माजी नगरसेवक महेश बर्गे, सचिन बर्गे, माजी उपनगराध्यक्ष सुनील बर्गे, उपनगराध्यक्ष राहुल रघुनाथ बर्गे यांच्यासह नगरसेवक राजेंद्र वैराट, बच्चूशेठ ओसवाल, श्रावण जंगम, आजी-माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जयवंत पवार, संतोष पवार व संपूर्ण पवार कुटुंबीयांच्यावतीने शाल व श्रीफळ देऊन खास. उदयनराजे भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना खास. उदयनराजे भोसले यांनी कोरेगाव शहर, तालुका तसेच विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या प्राधान्यक्रमाने सोडविल्या जातील,अशी ग्वाही दिली. जलमंदिर पॅलेस येथे दररोज जनता दरबार आयोजित केला जात असून, या दरबारात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची समस्या ऐकून घेतली जाते व त्याला न्याय देण्यासाठी प्रयत्न केले जातात, असेही त्यांनी सांगितले.

# गणेशोत्सव मंडळांनी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

सातारा,ता.८(प्रतिनिधी)-

**सन २०२६ चा गणेशोत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यात येत असून, उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले आहे.**

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अर्ज करण्यास ता.११ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी सातारा जिल्ह्यातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणीकृत अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे पात्र असतील. पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ganeshostav.pldmka.co.in या पोर्टलवर ता.११ सप्टेंबरपर्यंत केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. ऑनलाईन अर्ज केलेल्या मंडळांची प्रत्यक्ष पाहणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीकडून करण्यात येणार आहे. या समितीमार्फत जिल्ह्यातील उत्कृष्ट एका गणेशोत्सव मंडळाची निवड करून त्याची शिफारस राज्यस्तरीय समितीकडे करण्यात येईल. राज्य व जिल्हास्तरावरील पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# कोयना बँकेचा २०० कोटींच्या ठेवींचा टप्पा पार



कराड : सभेत मार्गदर्शन करताना बँकेचे संस्थापक ॲड. उदयसिंह पाटील. यावेळी चेअरमन के.टी.पाटील व संचालक मंडळ.

कराड,ता.८(प्रतिनिधी)-

**येथील कोयना सहकारी बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न झाली. संस्थेने २०० कोटी रुपयांहून अधिक ठेवींचा टप्पा पार केल्याबद्दल यावेळी समाधान व्यक्त करण्यात आले.**

दरम्यान, कराडातील विद्यानगर येथे नवीन शाखा सुरू करण्यास रिझर्व्ह बँकेची मंजुरी मिळाल्याची माहिती देण्यात आली. भविष्यात मुंबईतही शाखा सुरू करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे चेअरमन के. टी. पाटील यांनी यावेळी सांगितले. चेअरमन के.टी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेच्या प्रारंभी लोकनेते स्व. विलासकाका पाटील-उंडाळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

बँकेचे संस्थापक ॲड. उदयसिंह पाटील यांनी, तंत्रज्ञानाच्या युगात जलद व पारदर्शक सेवा देताना आर्थिक शिस्त,सक्षम वसुली आणि गुणवत्तापूर्ण कर्जवाटप यांचा समतोल राखण्याचे आवाहन केले.

अधिराज पाटील यांनीही बँकेच्या प्रगतीस शुभेच्छा दिल्या. सभेपुढील विषयांचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी जे.व्ही. माने यांनी केले. सभेपुढील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. संचालक तुकाराम डुबल यांनी श्रद्धांजलीचा ठराव मांडला. यावेळी आयटी तज्ज्ञ सुनील बोटलवार व बँकिंग तज्ज्ञ प्रताप चव्हाण यांनी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले. तसेच सभासदांच्या पाल्यांना पाल्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. दिनकर रामिष्ठे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.उपाध्यक्ष साहेबराव शेवाळे यांनी आभार मानले.

# राजारामबापू साखर कारखाना सेवक पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

ईश्वरपूर,ता.८(प्रतिनिधी)-

**राजारामबापू पाटील साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्थेने सातत्याने कामगारांचे हित साधत त्यांना आर्थिक पाठबळ दिले आहे. भविष्यातही कामगारांच्या आर्थिक प्रगतीस चालना दिली जाईल,असा विश्वास राजारामबापू साखर कारखान्याचे संचालक कार्तिक पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष व राजारामबापू साखर कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक विजय मोरे यांनी १३.२५ टक्के लाभांश जाहीर केला.**



राजारामबापू पाटील कारखाना सेवकांची पतसंस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना संचालक कार्तिक पाटील, समवेत संस्थेचे अध्यक्ष विजय मोरे,राजेंद्र चव्हाण,तानाजी खराडे व संचालक.

राजारामनगर येथे संस्थेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष व कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक विजय मोरे हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.वाळवा तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघाचे अध्यक्ष राजेंद्र चव्हाण, जनरल सेक्रेटरी तानाजी खराडे, कारखान्याचे सचिव डी.एम. पाटील,कामगार संचालक विकास पवार,मनोहर सन्मुख,संस्थेचे उपाध्यक्ष किरण बाबर उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

प्रारंभी तानाजी खराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या प्रगतीचा आढावा मांडला. सचिव शिरीष जोशी यांनी विषयपत्रिकेचे व मागील इतिवृत्ताचे वाचन केले. यावेळी विविध अधिकारी व कामगार तसेच सभासद उपस्थित होते.

# एकविरा पतसंस्थेला १४ लाखांचा नफा-बसुगडे

आष्टा,ता.८(प्रतिनिधी)-

**श्री एकविरा नागरी पतसंस्थेला सुमारे चौदा लाख रुपयांचा नफा झाला असून सभासदांना ११ टक्के लाभांश देणार आहोत, अशी घोषणा पतसंस्थेचे संस्थापक तथा आष्टा नगरपालिकेचे पाणीपुरवठा सभापती नंदकुमार बसुगडे यांनी केली. आष्टा येथील एकविरा मंदिर सभागृहात श्री एकविरा पतसंस्थेची बारावी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.**




एकविरा नागरी पतसंस्थेच्या सभेत बोलताना चेअरमन नंदकुमार बसुगडे,व्यासपीठावर वैभव शिंदे,विशाल शिंदे,भाग्यश्री शिंदे व इतर.

यावेळी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे, भाग्यश्री शिंदे, नगराध्यक्ष विशाल शिंदे, उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्याणी, नगरसेवक विराज शिंदे, धैर्यशील शिंदे,तानाजीराव सुर्यवंशी, अभिजीत वग्याणी प्रमुख उपस्थित होते.

इंजि.नंदकुमार बसुगडे म्हणाले, संस्थेकडे सहा कोटी ७९ लाख ९७ हजार रुपयांच्या ठेवी आहेत तर चार कोटी ६८ लाख २५ हजार ९०० रुपये कर्ज वाटप केले आहे. ७० लाख ६४ हजार रुपयांचा निधी आहे. ३९ लाख ३२ हजार ९०० रुपये इतके भाग भांडवल आहे. तीन कोटी नऊ लाख ८९ हजार रुपये गुंतवणूक आहे.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार झाला.वरदराज शिंदे, ॲड.साईनाथ पाटील, जगन्नाथ बसुगडे, दिनकर बसुगडे, बाबासो सिध्द, कौशिक वग्याणी, संदीप तांबवेकर, विश्वास मोरे, नगरसेविका सौ.स्नेहा माळी, झिन्नत आत्तार, संपदा मोरे, गिता सावंत, संभाजी माळी, राम बसुगडे, अर्जुन तांबवेकर, आनंदराव सिध्द, दिपक पाटील, छोटु वटारे, श्रीकांत सावंत उपस्थित होते. सचिव शहाजी बसुगडे यांनी आभार मानले.

# केंद्राने साखरेसह इथेनॉलचे दर स्थिर ठेवावेत

## मानसिंगराव नाईक; 'विश्वास' कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन संपन्न

शिराळा,ता.८(प्रतिनिधी)-

**केंद्र सरकारने अडचणीतील साखर उद्योग सावरण्यासाठी साखरेबरोबर इथेनॉलच्या किमतीत वाढ करून दर स्थिर ठेवावेत, अशी मागणी 'विश्वास'चे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी केली. चिखली (ता.शिराळा) येथील विश्वासराव नाईक कारखान्यात गळीत हंगाम २०२६-२७ साठीचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ पार पडला. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील प्रमुख उपस्थित होते.**



विश्वास कारखान्यात गळीत हंगाम २०२६-२७ साठी बॉयलर अग्निप्रदीपन समारंभात बोलताना अध्यक्ष मानसिंगराव नाईक, शेजारी सौ.सुनीता नाईक, उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील, सर्व संचालक मंडळ व मान्यवर.

अध्यक्ष नाईक पुढे म्हणाले, साखर कारखानदारी अडचणीतून जात आहे. त्याला केंद्र सरकारचे अनिश्चित धोरण जबाबदार आहे. गेल्या काही दिवसापूर्वी साखरेच्या किमतीत अचानक झालेली वाढ व घसरण यामुळेही साखर उद्योगापुढे अडचणी वाढल्या आहेत. साखर उद्योग अडचणीतून बाहेर आणण्यासाठी साखरेबरोबर इथेनॉलच्या किमतीत वाढ करून दर स्थिर ठेवणे गरजेचे आहे. ते म्हणाले, गेल्या वर्षीच्या गळीत हंगामात कारखान्यास अडचणी आल्या. आर्थिक शिस्त बिघडू न देता अडणीवर मात केली. यावर्षी तोडणी-वाहतूक यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरली आहे.गाळपाचे नेटके नियोजन केले आहे. पुढील वर्षी गाळप क्षमता वाढ करणार आहे. संचालक मंडळ, सभासद, अधिकारी व कर्मचारी कर्मचाऱ्यांच्या पाठबळावर हंगाम यशस्वी करणार आहे.

प्रारंभी कोंडिबा चौगुले व संचालक सौ.अनिता चौगुले यांच्या हस्ते विधिवत होम व पूजा संपन्न झाली. अध्यक्ष मानसिंगराव नाईक व पत्नी सौ.सुनीता नाईक यांच्या हस्ते बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. संचालक शिवाजी पाटील यांनी स्वागत केले. कार्यकारी संचालक अमोल पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमास सौ.वैशाली नाईक, संचालक विराज नाईक, विजयराव नलवडे, यशवंत निकम, विष्णू पाटील, बाळासाहेब पाटील, सुरेश पाटील, संभाजी पाटील, बिरुदेव आंबरे, सुहास पाटील, यशवंत दळवी, संदीप तडाखे, तुकाराम पाटील, आनंदा पाटील, कामगार संचालक दत्तात्रय पाटील, कामगार संघटनेचे अध्यक्ष टी. एम. साळुंखे, उपाध्यक्ष विजय पाटील, सरचिटणीस विजय देशमुख, कारखाना व्यवस्थापक दीपक पाटील यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख, सभासद, कर्मचारी उपस्थित होते. विश्वास पाटील यांनी आभार मानले.

# चंदगड तालुका अवैध धंद्यांच्या विळख्यात

## अंमली पदार्थ, अवैध दारू अन् गुन्हेगारी घटनांनी कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

दौलत हलकर्णी,ता.८(संतोष सुतार)–

निसर्गाने मुक्तहस्ते सौंदर्य बहाल केलेला, डोंगर-दऱ्या, घनदाट जंगल, घाटवाटा आणि हिरवाईने नटलेला अशी चंदगड तालुक्याची ओळख आहे. मात्र, अलीकडच्या काळात विविध अवैध धंदे, अंमली पदार्थांची तस्करी, परराज्यातील अवैध दारू तसेच गंभीर गुन्हेगारी घटनांच्या चर्चेमुळे या निसर्गरम्य चंदगड तालुक्याच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.काही घटनांमध्ये प्रेमप्रकरणे, वैयक्तिक वाद, आर्थिक व्यवहार अथवा अन्य कारणांमधून टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.




एखाद्या प्रकरणात समोरच्याचा बदला घेण्यासाठी थेट खुनापर्यंत मजल जाणे आणि त्यानंतर गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा गंभीर स्वरूपाची आहे. या घटनांमागे नेमकी कारणे काय आहेत, याचा उलगडा तपास यंत्रणांकडून होणे आवश्यक आहे.

विशेषतः तरुण पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यात ओढले जात असल्यास त्याचे सामाजिक परिणाम गंभीर असू शकतात. त्यामुळे पोलिस, उत्पादन शुल्क विभाग आणि संबंधित यंत्रणांनी फक्त किरकोळ कारवायांपुरते मर्यादित न राहता या अवैध धंद्यांच्या मुळापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

चंदगड तालुक्यातील अवैध धंद्यांच्या चर्चेला आता आणखी एक गंभीर अंग असल्याचे बोलले जात आहे. सरकारी पड जमिनींचे खोटे दाखले, बनावट कागदपत्रे अथवा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या कथित बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे जमीन विक्री करणारे मोठे रॅकेट तालुक्यात सक्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

तालुक्यातील संवेदनशील आणि दुर्गम भागांवर अधिक प्रभावी गस्त वाढविणे, अंमली पदार्थांच्या पुरवठ्याच्या साखळीचा शोध घेणे, अवैध दारू वाहतुकीवर कठोर कारवाई करणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि गंभीर गुन्ह्यांमध्ये पुरावे नष्ट होऊ नयेत यासाठी आधुनिक तपास यंत्रणेचा वापर करणे, या उपाययोजना महत्त्वाच्या ठरणार आहेत.

तसेच नागरिकांनीही संशयास्पद हालचाली अथवा अवैध व्यवहारांची माहिती कायदेशीर आणि सुरक्षित मार्गाने संबंधित यंत्रणांना देणे आवश्यक आहे.

चंदगडच्या शांत, सुरक्षित आणि निसर्गरम्य ओळखीला धक्का पोहोचविणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच रोखणे ही काळाची गरज आहे. अवैध धंद्यांची पाळेमुळे किती खोलवर आहेत? त्यामागे कोणाचे पाठबळ आहे? अंमली पदार्थांचा पुरवठा कुठून होतो? परराज्यातील दारू तालुक्यात कशी पोहोचते? आणि गंभीर गुन्ह्यांमध्ये भौगोलिक परिस्थितीचा गैरफायदा घेतला जातो का?या सर्व प्रश्नांची उत्तरे तपास यंत्रणांच्या प्रभावी कारवाईतूनच मिळणार आहेत.

निसर्गाने दिलेला चंदगडचा 'स्वर्ग' अवैध धंद्यांचा अड्डा बनू नये,यासाठी प्रशासन आणि समाज दोघांनीही आता जागे होण्याची गरज आहे. अन्यथा 'नेमका तालुका चाललाय तरी कुठे?' हा प्रश्न भविष्यात आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध साहित्याने बाजारपेठ सजल्या

सरूड,ता.८(प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यात आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सरूड, बांबवडे आणि मलकापूर या प्रमुख बाजारपेठांमध्ये गणेशभक्तांची खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी घरगुती तसेच सार्वजनिक मंडळांच्या मंडपांची सजावट करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्याने बाजारपेठा सजल्या असून, खरेदीचा उत्साह दिवसेंदिवस वाढत आहे.**




**विविध वस्तूंची मागणी वाढली**

यंदाच्या गणेशोत्सवातील सजावटीच्या साहित्यामध्येही चायनीज बनावटीच्या वस्तूंचा मोठा प्रभाव दिसून येत आहे. रंगीबेरंगी एलईडी लाईट्सच्या माळा, आकर्षक लाईटिंग, झगमगणारे पडदे, चमकदार तोरणे, विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू तसेच कृत्रिम फुलांना ग्राहकांकडून मोठी मागणी आहे. आकर्षक स्वरूप आणि तुलनेने कमी किमतीमुळे नागरिकांसह तरुण मंडळांचे कार्यकर्तेही या सजावटीच्या साहित्याला पसंती देत आहेत.

घरगुती सजावटीसाठी प्लास्टिक आणि कापडी फुलांच्या माळा, तोरणे, विविध रंगांच्या विद्युत माळा यांचीही मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. सरूड आणि बांबवडे येथील मुख्य रस्त्यांवरील दुकाने ग्राहकांच्या गर्दीने फुलली असून, मलकापूरच्या बाजारपेठेतही गणेशोत्सवाच्या खरेदीचा उत्साह दिसून येत आहे.

# जि.प.स्वीकृत सदस्यपदासाठी मोर्चेबांधणी

## भुदरगड-राधानगरीतून जीवन पाटील यांच्या नावाची चर्चा

कुर,ता.८(वार्ताहर)–

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग आला असून, इच्छुकांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. महायुती सरकारने बंद केलेली स्वीकृत सदस्यांची योजना पुन्हा सुरू झाल्याने जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांच्या इच्छुक कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.**

जिल्हा परिषदेसाठी सात, तर जिल्ह्यातील १२ पंचायत समित्यांसाठी २८ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती होणार असल्याने या पदांसाठी राजकीय रस्सीखेच सुरू झाली आहे.याच पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या गोटातून भुदरगड तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य आणि बिद्री साखर कारखान्याचे विद्यमान संचालक जीवन पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांचे खंदे, विश्वासू आणि एकनिष्ठ समर्थक म्हणून जीवन पाटील यांची ओळख आहे. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीपासून विविध निवडणुकांमध्ये पक्षाच्या उमेदवारांच्या पाठीशी ताकद उभी करण्यापर्यंत त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे.जीवन पाटील यांच्या समर्थकांनी आम. सतेज पाटील यांच्याकडे जिल्हा परिषदेवर स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्याची जोरदार मागणी केली आहे.



जीवन पाटील यांच्यासोबतच शशिकांत खोत यांनीही स्वीकृत सदस्यपदासाठी मागणी केली आहे. त्यामुळे भुदरगड तालुक्यातून नेमके कोणाच्या नावाला पसंती मिळणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# नियमांचे पालन करत डीजे लावणारच-मंडळांचा निर्धार

## पोलिसांकडून कारवाईचा इशारा;पारंपारिक वाद्यांनाही प्राधान्य

बुबनाळ,ता.८(वार्ताहर)–

**शिरोळ तालुक्यातील गौरवाडसह सात गावात यंदाचा गणेशोत्सव अत्यंत उत्साहात आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरात साजरा होणार असून, तरुणाईचा आवडता डीजेचा दणदणाट देखील पाहायला मिळणार आहे.**

प्रशासनाचे नियम पाळून आणि आवाजाची मर्यादा राखून यंदा गावातील मुख्य मिरवणुकांमध्ये डीजे लावणारच, असा ठाम निर्धार काही प्रमुख गणेश मंडळांनी केला आहे.गणेशोत्सवात पारंपारिक संस्कृती जपली पाहिजे या मताशी गौरवाडसह औरवाड, आलास, बुबनाळ, कवठेगुलंद, शेडशाळ, गणेशवाडी या सात गावातील सर्व मंडळे सहमत आहेत. मात्र, विसर्जन मिरवणुकीत तरुणाईचा उत्साह वाढवण्यासाठी डीजे आवश्यक असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.पोलीस प्रशासनाने ध्वनी प्रदूषणाबाबत कडक भूमिका घेतली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला आहे.



**गौरवाडसह,औरवाड,आलास, बुबनाळ, कवठेगुलंद, शेडशाळ, गणेशवाडी या सात गावात उत्सवाची जय्यत तयारी सुरु आहे. यासाठी मंडप उभारणे,सीसीटीव्ही बसविणे, मंडळाचा गणपती पसंद करुन ठरविणे, विविध सामाजिक उपक्रमासाठीचे नियोजन करणेसाठी गावागावातील प्रत्येक मंडळातील सदस्यांनी कामे वाटुन घेतली आहेत. यानुसार चर्चा,समन्वय ठेवत प्रत्येक गणेशोत्सव मंडळासमोर सदस्य, कार्यकर्त्यांच्या रात्री जागू लागल्या आहेत.**

या पार्श्वभूमीवर काही मंडळाच्या अध्यक्षांनी सांगितले की, पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पूर्ण पालन केले जाईल. आवाजाची मर्यादा राखणार, गावातील लहान मुले आणि वृद्धांना त्रास होणार नाही याची काळजी घेऊन, डेसिबलची मर्यादा पाळली जाईल,या सर्व सुचनांचे पालन करणार मात्र डीजे लावणार यासाठी रितसर पोलीस प्रशासनाकडून परवाना घेतला असल्याचे काही मंडळानी सांगितले.तर काही मंडळांनी पारंपारिक वाद्यांना प्राधान्य देत ढोल-ताशा, लेझीम या पारंपारिक वाद्यांच्या गजरात श्रीं चे स्वागत व विसर्जन करु अशी ग्वाही दिली आहे. या निर्धारामुळे यंदा गौरवाडसह सात गावात पारंपारिक वाद्य, संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा मिलाफ पाहायला मिळणार हे नक्की!



# नियमांचे पालन करत गणेशोत्सव साजरा करा-प्रणिल गिल्डा

मलकापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**गणेशोत्सव शांततेत,उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करावा. पोलीस प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे,ध्वनी प्रदूषण टाळावे तसेच नशामुक्त गणेशोत्सव साजरा करून समाजासमोर आदर्श निर्माण करावा,असे आवाहन शाहूवाडी–पन्हाळा पोलीस उपअधीक्षक प्रणिल गिल्डा यांनी केले.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येळाणे येथे तालुक्यातील गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील व प्रशासकीय अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत गिल्डा बोलत होते. यावेळी पोलिस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी नगराध्यक्षा रश्मी कोठावळे, पंचायत समिती सदस्य अभयसिंह चौगुले, नायब तहसीलदार प्रदीप जाधव, पोलीस उपनिरीक्षक अतुल सोनुले, आश्लेषा घाडगे, महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रवीण कुंभारे, सुलतान शेळके, पंचायत समिती विस्ताराधिकारी कदम, बांधकाम विभागाचे विनायक कुंभार आदी उपस्थित होते.

# कागल तालुक्यात अनेक ठिकाणी हत्ती गवताच्या विळख्यात रस्ते

मुरगूड,ता.८(प्रतिनिधी)–

**कागल तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांच्या दुतर्फा शेतकऱ्यांनी हत्ती गवत व अन्य वैरणीची लागवड केल्याने रस्ते गवताच्या विळख्यात सापडले आहेत. उंच वाढलेल्या गवतामुळे रस्त्याची साईडपट्टी झाकोळली आहे. विशेषतः धोकादायक वळणांवर समोरून येणारी वाहने दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.**

शेंडूर फाटा–व्हनाळी, व्हनाळी–साके, म्हाकवे–गोरंबे, बस्तवडे–सोनगे, म्हाकवे–आणूर यासह तालुक्यातील अनेक मार्गांची हीच अवस्था आहे.

**रस्त्याकडेला शेती की अतिक्रमण? रुंदीकरणासाठी रस्त्याच्या दुतर्फा साईडपट्टी आणि पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारी ठेवल्या आहेत. मात्र, काही ठिकाणी गटारींच्या बाहेरील जागेतही रस्त्यालगत हत्ती गवताची लागवड केली आहे. त्यामुळे रस्त्याची हद्द अरुंद होत असून, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून अडथळे दूर करण्याची गरज आहे.**



रस्त्याच्या कडेला वाढलेल्या गवतामुळे वाहनचालकांना एकमेकांना वाट देणेही अवघड होत आहे. दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी तसेच पादचाऱ्यांना मार्गावरून प्रवास करताना कसरत करावी लागते. पावसाळ्यात गवताची वाढ झपाट्याने होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. रात्री दृश्यमानता कमी असल्याने धोका आणखी वाढतो. रस्त्याच्या कडेला गवतामुळे वाहतुकीसाठी उपलब्ध असलेली जागाही कमी होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने केवळ मुख्य रस्त्यावरील गवत कापण्याऐवजी साईडपट्टी व गटारींचीही स्वच्छता करावी, अशी मागणी होत आहे.

# करकोचा पक्ष्यांचा मुक्त संचार

## पाणथळ जागेतील हिरवाईत खुलले निसर्गसौंदर्य

सांगरूळ,ता.८(प्रतिनिधी)–

**पावसाळ्यामुळे परिसरातील पाणथळ जागा, शेततळी आणि ओलसर शेतीक्षेत्रात विविध पक्ष्यांचा वावर वाढला आहे. सांगरूळ परिसरातील एका पाणथळ ठिकाणी अनेक करकोचा पक्षी खाद्याच्या शोधात फिरताना दिसून आले. त्यामुळे हिरव्यागार शेतीच्या पार्श्वभूमीवर निसर्गाचे मनोहारी चित्र पाहायला मिळत आहे.**

या परिसरात ऊसशेती, झाडे आणि पाण्याचे स्रोत मोठ्या प्रमाणात असल्याने पक्ष्यांना खाद्य व सुरक्षित अधिवास मिळत आहे. पाणथळ भागातील गवताळ पट्ट्यात पक्ष्यांचे थवे फिरताना तसेच पाण्यात खाद्य शोधताना दिसत आहेत. पावसाळ्यात अशा नैसर्गिक पाणवठ्यांमुळे जैवविविधतेला चालना मिळते. मात्र, वाढते प्रदूषण, प्लास्टिक कचरा आणि पाणथळ जागांवरील अतिक्रमणामुळे पक्ष्यांच्या अधिवासाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे गावकऱ्यांनी पाणवठे व नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन करण्याची गरज आहे.



# डी.वाय.पाटील विद्यापीठाची टीबी निदान संशोधनात महत्त्वपूर्ण झेप

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**क्षयरोग आणि त्यामुळे होणाऱ्या मेंदूज्वराचे जलद, अचूक आणि किफायतशीर निदान करण्यासाठी डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने महत्त्वपूर्ण संशोधन हाती घेतले आहे. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजचे प्राध्यापक डॉ. दीपक सावंत यांच्या 'मेक इन इंडिया' अंतर्गत पेपर बेस्ड टीबी निदान संशोधन प्रकल्पाला जैवतंत्रज्ञान उद्योग संशोधन सहाय्यता परिषद कडून ग्रँड चॅलेंजेस इंडिया योजनेतून ५८ लाख रुपयांचे संशोधन अनुदान मंजूर झाले आहे.**



या प्रकल्पाला संशोधनासाठी अनुदान मिळाल्याने नवे निदान तंत्रज्ञान विकसित करण्यास मदत होणार आहे. या संशोधनाबद्दल व त्यासाठी मिळालेल्या अनुदानाबद्दल विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी.पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ.व्ही. व्ही. भोसले,डॉ.राजेश ख्यालप्पा, डॉ. पद्मजा देसाई यांनी डॉ.दीपक सावंत आणि सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# पूर,भूस्खलन सौम्यीकरणाच्या कामांना प्राधान्य द्यावे-डॉ.राठोड

कोल्हापूर,ता.८(प्रतिनिधी)–

**आपत्ती व्यवस्थापनांतर्गत राज्य शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या कामांमध्ये पूर सौम्यीकरण व भूस्खलन सौम्यीकरणा संदर्भातील कामांना प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिल्या. कामे प्रस्तावित करताना संबंधित विभागांनी त्या कामांची आवश्यकता व उपयोगिता विचारात घेऊन प्रस्ताव सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, कार्यकारी अभियंता भाऊसाहेब हजारे,चंद्रकांत आयरेकर, मानसिंग पाटील,डॉ. वंदना थोरात,प्रसाद संकपाळ आदी अधिकारी उपस्थित होते.

# ग्रा.प.संगणक परिचालकांच्या प्रश्नाकडे शासनाचे दुर्लक्ष

## १४ वर्षे सेवा करूनही भविष्य अधांतरी;हक्काच्या मानधनासाठी करावी लागते विनवणी

गारगोटी,ता.८(आनंद चव्हाण)–

**राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये शासनाच्या 'आपले सरकार' प्रकल्पांतर्गत गेल्या १४ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या राज्यातील सुमारे २८ हजार संगणक परिचालकांच्या भवितव्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. ग्रामपंचायतींचे ऑनलाइन कामकाज, विविध शासकीय योजनांची माहिती, दाखले, नागरिकांची कागदपत्रे, प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध ऑनलाइन प्रणालींचे कामकाज रात्रंदिवस सांभाळणाऱ्या या संगणक परिचालकांना मात्र स्वतःच्या हक्काच्या मानधनासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याची वेळ आली आहे.**

ग्रामपंचायतींच्या माध्यमातून शासनाची महत्त्वाची ऑनलाइन कामे करणाऱ्या संगणक परिचालकांनाच वेळेवर मानधन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवते आहे.

### १४ वर्षांपासून केवळ आश्वासनांचीच खैरात

गेल्या १४ वर्षांपासून संगणक परिचालक आपले सरकार प्रकल्पामध्ये काम करत आहेत. एवढा प्रदीर्घ कालावधी उलटूनही त्यांच्या सेवा, मानधन आणि भवितव्याबाबत शासनाकडून ठोस निर्णय झालेला नाही. विविध आंदोलने, निवेदने आणि बैठकींच्या माध्यमातून संघटनेने वेळोवेळी आपल्या मागण्या शासनापुढे मांडल्या.प्रत्येक वेळी शासनाकडून सकारात्मक आश्वासने दिली जातात, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी प्रश्न पुन्हा जैसे थे राहतो,अशी भावना संगणक परिचालकांमध्ये निर्माण झाली आहे.

### 'प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला मानधन' या आश्वासनाचे काय?

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अधिवेशनाच्या काळात संगणक परिचालकांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत देण्यात येईल, असा शब्द दिल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मात्र प्रत्यक्षात मानधन वेळेत मिळत नसल्याने त्या आश्वासनाची अंमलबजावणी कुठे आहे, असा सवाल संगणक परिचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

### '२८ हजार कुटुंबांच्या चुलीत पाणी टाकू नका'

संगणक परिचालकांच्या मानधनाचा प्रश्न हा केवळ एका कर्मचाऱ्याचा प्रश्न नसून २८ हजार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. वेळेवर मानधन न मिळाल्याने या कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### शासनाने आता आश्वासन नव्हे, तर निर्णय घ्यावा

गेल्या १४ वर्षांचा कालावधी पाहता आता संगणक परिचालकांना केवळ आश्वासनांची नव्हे तर ठोस निर्णयाची आणि त्याची तातडीने अंमलबजावणीची आवश्यकता आहे.

सणासुदीच्या काळात आपल्या हक्काच्या मानधनासाठी शासन दरबारी विनवणी करण्याची वेळ येऊ नये. शासनाच्या डिजिटल यंत्रणेचा महत्त्वाचा भाग म्हणून काम करणाऱ्या या २८ हजार संगणक परिचालकांना सन्मानाने आणि वेळेवर मानधन मिळावे, तसेच त्यांच्या भवितव्याचा कायमस्वरूपी प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# कसबा सांगावच्या शेतकऱ्यांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

## वीज कपातीविरोधात संताप : शेतीसाठी पूर्वीप्रमाणे आठ तास वीजपुरवठा सुरू ठेवा

कागल,ता.८ (प्रतिनिधी)–

**शेतीसाठी पूर्वीप्रमाणे आठ तास वीजपुरवठा सुरू ठेवावा, तसेच सिंगल फेज वीजपुरवठा पूर्ववत करावा, या मागणीसाठी कसबा सांगाव येथील शेतकऱ्यांनी मंगळवारी कागल येथील महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढून ठिय्या आंदोलन केले. यावेळी शेतकऱ्यांनी वीज कपातीविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.**

कसबा सांगाव परिसरातील शेतीला पूर्वी दिवसातून आठ तास वीजपुरवठा होत होता. मात्र सध्या केवळ सहा तास वीज दिली जात असल्याने पिकांना पाणी देण्यात अडचणी येत असून, पिके वाळण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता वीजपुरवठ्याच्या वेळेत कपात केल्याचा आरोपही त्यांनी केला.याबाबत शेतकऱ्यांनी महावितरणचे कागल येथील उपकार्यकारी अभियंता अभय आळवेकर व उपअभियंता अभिजीत चव्हाण यांना निवेदन दिले. फोर्स लोडशेडिंगच्या नावाखाली होणारी वीजकपात बंद करावी, सिंगल फेज वीजपुरवठा सुरू ठेवावा आणि कसबा सांगावसाठी मंजूर असलेला वीज कोटा पूर्ण क्षमतेने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी गावातील वीज वितरण व्यवस्थेतील समस्याही अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.



उपकार्यकारी अभियंता अभय आळवेकर यांनी,वीज कपातीचे सध्याचे वेळापत्रक वरिष्ठ स्तरावरून आलेले आहे. त्यानुसार वीजपुरवठा केला जात आहे. शेतकऱ्यांचे निवेदन वरिष्ठांकडे पाठवून त्यावर निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले. मात्र शेतकरी यावर समाधानी न होता वरिष्ठ अधिकाऱ्यांना तत्काळ माहिती देऊन आपल्या हक्काची वीज उपलब्ध करून द्यावी, या मागणीवर ठाम राहिले. काही काळ ठिय्या मारल्यानंतर आठ तासांच्या विजेसाठी दुसऱ्या दिवशी निर्णय घेऊ आणि फोर्स भारनियमनसाठी चार दिवसाचा अवधी अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर त्यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. दिलेल्या निर्णयाप्रमाणे नाही झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी प्रभू भोजे, अविनाश मगदूम,कुबेर मगदूम, विक्रमसिंह माने, अनिल पाटील, कुलदीप चौगुले, सचिन जगताप, प्रदीप बेडक्याळे, भुपाल चौगुले, महादेव घुणके यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# ओम बालाजी सौहार्द संस्थेला ३० लाख ५१ हजाराचा नफा

निपाणी,ता. ८(प्रतिनिधी)

**अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी यांच्या कृपा आशीर्वादाने श्री ओम बालाजी संस्थेची स्थापना झाली. सर्वांच्या सहकार्यामुळे संस्था प्रगतीपथावर असून संस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाख ५१ हजार रूपयांचा नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे संचालक राजेश कदम यांनी दिली.**

संस्थेची वार्षिक सभा मंगळवारी संस्थेच्या कार्यालयात झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,हालसिद्धनाथ साखर कारखान्याचे संचालक जयवंत भाटले होते.कदम पुढे म्हणाले, संस्थेचे ३०९३ सभासद असून, १६ लाख ९० हजाराचे भांडवल आहे.१५ कोटी ४४ लाख ठेवी असून संस्थेने सभासद व इतर गरजू लोकांना वाहन, सोनेतारण व



वार्षिक सभेत बोलताना राजेश कदम शेजारी प.पू.अनिकेत कुलकर्णी महाराज , जयवंत भाटले व संचालक मंडळ.

इतर प्रकारची अशी ७ कोटी ६९ लाख इतके कर्ज वाटप केले आहे. संस्थेकडे ९६ लाख ३६ हजार इतका निधी जमा आहे. संस्थेने विविध सरकारी व सहकारी बँकेमध्ये ८ कोटी ७३ लाख इतकी गुंतवणूक केली आहे.संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायण पूजा सुनील वरुटे व रूपा वरुटे यांच्या हस्ते झाली.यावेळी अनिकेत रमेश कुलकर्णी-महाराज,व्हा.चेअरमन विष्णू कुणकेकर, सुभाष भाटले, बाळासाहेब पालकर, भिकाजी शिंदे, महादेव अण्णासाहेब नागावकर, अनिता भाटले, कल्पना कुराडे, दीपक माने, विश्वनाथ भाटले, सुधाकर कुराडे, रमेश वैद्य, निलेश पठाडे, धनाजी भाटले, उदय नाईक, विजय टवळे, दत्ता जोत्रे, अमित रणदिवे, अभय मानवी, प्रकाश तारळे, दशरथ कदम, बाळासाहेब जोरापुरे, विकास वासुदेव,अरुण काशीदकर, विनायक खोत, सूरज खवरे, नारायण येजरे, विनायक को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन व व्हा.चेअरमन व संचालक यांच्यासह कर्मचारी, सभासद उपस्थित होते.


**कल्लाप्पाण्णा आवाडे को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट ॲण्ड इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क लि.,(मल्टीस्टेट)**

गट नं.२१२ व २१३, ॲमेनिटी स्पेस नं.३+४, हातकणंगले - ४१६१०९
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर Email : katp.ich@gmail.com

**२० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरीता)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ या सालची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरूवार, दिनांक २४ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजतां संस्थेचे नुतन प्रशासकीय कार्यालय गट नं. २१२ व २१३, ॲमेनिटी स्पेस नं. ३+४, हातकणंगले** येथील सभागृहात बोलविणेत आली आहे. सभेची विषय पत्रिका, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण केलेली आर्थिक पत्रके कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावली आहेत, ती कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

दिनांक : ०८/०९/२०२६
स्थळ : हातकणंगले

संचालक मंडळाच्याआदेशानुसार
**क. आ. को-ऑप. इंड. इस्टे. ॲन्ड इंटि टेक्स पार्क लि., करीता**
मॅनेजिंग डायरेक्टर


# गंगा पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

चंदूर,ता.८–

**येथील श्री गंगा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये ३१ मार्च २०२६ अखेर २६८ कोटी रु.उलाढाल झालेली आहे. त्यामध्ये ठेवी ४८ कोटी व कर्जे ४३ कोटी कर्जाचा सामवेश आहे. पतसंस्थेचे भागभांडवल ४९ लाख ५३ हजार झाले असून संस्थेची गुंतवणूक १८ कोटी २६ लाख रुपये तर निधी ११ कोटी १ लाख आहे. निव्वळ नफा १ कोटी ७९ लाख रु. झाला असल्याचे चेअरमन विजय मलकापूरे यांनी सांगितले.**

पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. मार्गदर्शक दशरथ मलकापूरे यांच्या मार्गदर्शना खाली पतसंस्थेची प्रगती सर्वदूर पसरत आहे.

सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचे सहकार्य व सामान्यांचा विश्वासामुळे सामान्य कर्जदार सभासदांनी थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सहकार्य केल्यामुळे पतसंस्थेचा नफा वाढलेला आहे.



गंगा पतसंस्थेच्या कार्याचा आढावा घेताना चेअरमन विजय मलकापूरे, व्यासपीठवर संचालक मंडळ व मान्यवर. (छाया.– सुधीर फोटो)

सर्वसामान्य उद्योजक, व्यापारी, नोकरदार या सर्वांच्या गरजा ओळखून नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलेली आहे. कर्जदार व ठेवीदार यांच्यासाठी संस्थेकडे विविध सेवा उपलब्ध आहेत. याप्रसंगी श्री दत्त कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, जि.प. सदस्य महेश पाटील, कर सल्लागार शेखर ठोंबरे यांनी संस्थेच्या कार्याविषयी व सहकारातील बाहेरील परिस्थीती बद्दलचा उहापोह केला. यावेळी पतसंस्थेचे व्हा.चेअरमन बाबासाहेब आंबी, शाखा चेअरमन संजय खोत, दिलीप पाटील यांचेसह सर्व संचालक मंडळ, सेक्रेटरी महादेव कुंभार व कर्मचारी उपस्थित होते.

# मलकापुरातील देहविक्रीचा अड्डा उद्ध्वस्त

## दोन महिलांची सुटका, तिघांवर गुन्हा

कराड,ता.८ (प्रतिनिधी)–

**मलकापूर येथील कोयना वसाहतीतील पद्मावती पर्ल अपार्टमेंटमध्ये सुरू असलेल्या कथित देहविक्रीच्या व्यवसायावर कराड शहर पोलिस आणि पोलीस उप अधीक्षक कार्यालयाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत छापा टाकला. या कारवाईत तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, फ्लॅटमध्ये आढळलेल्या दोन महिलांची सुटका करण्यात आली.**

स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी फ्लॅटमध्ये कुंटणखाना चालविल्याप्रकरणी तिघांविरोधात कराड शहर पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.शुभम दत्तात्रय काकडे (वय २४, रा. धोंडेवाडी,ता. कराड), गणेश काशिनाथ अहिवळे (वय ३२, रा. कार्वे, ता. कराड) आणि सुरज कांबळे (रा. कराड) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

पोलीस उप अधीक्षक राजश्री पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत पद्मावती पर्ल अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये महिलांना ठेवून देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी पंच आणि बनावट ग्राहकाच्या माध्यमातून कारवाईचे नियोजन केले.

त्यानुसार बनावट ग्राहकाने संबंधित एजंटशी संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी मिळालेल्या माहितीची खात्री केली. त्यानंतर एजंटच्या इशाऱ्यानुसार पोलिसांच्या पथकाने संबंधित फ्लॅटवर छापा टाकला. यावेळी शुभम काकडे तेथे आढळून आला. फ्लॅटची झडती घेतली असता दोन महिला आणि एक ग्राहक आढळून आले. पोलिसांनी दोन्ही महिलांची सुटका केली.


**इचलकरंजी पॉवरलूम कापड मार्केट सहकारी हौसिंग सोसायटी लि.,इचलकरंजी**

**५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरीता)**

इचलकरंजी पॉवरलूम कापड मार्केट सहकारी हौसिंग सोसायटी लि., इचलकरंजी या संस्थेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. २६/०९/२०२६** रोजी **सकाळी ११-०० वाजता महेश सेवा समिती, दाते मळा, इचलकरंजी** येथे बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासदांनी जरूर उपस्थित रहावे, ही विनंती.

**इचलकरंजी पॉवरलूम कापड मार्केट सहकारी हौसिंग सोसायटी लि.,करिता**

स्थळ : इचलकरंजी. **चंद्रप्रकाश छाजेड** व्हा. चेअरमन **सर्वेश्वर भांगडिया** चेअरमन
दिनांक : २९/०८/२०२६
(व्यवस्थापक मंडळाचे अधिकाराने)

**सूचना :–**
- ✻ कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्यानंतर एका तासाने त्याच ठिकाणी सभा घेणेत येईल व त्या सभेस कोरम पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
- ✻ सभेचे विषय व हिशोब पत्रके संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावणेत आलेली आहेत.
- ✻ सभासदांना काही सुचना/प्रश्न विचारावयांचे असतील त्यांनी आपले प्रश्न दिनांक २१/०९/२०२६ पर्यंत संस्थेकडे लेखी देणे बंधनकारक आहे.
- ✻ सर्व सभासदांना स्वतंत्ररित्या अहवाल पाठविणेत आले आहेत.



नोंदणी क्र.केपीआर/एच. एल.ई/एच.एस.जी./(टि.सी)४११/८७-८८
स्थापना: दि. ३०/०९/१९८७

**कै. कदमआण्णा यशवंत प्रोसेसर्स कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, तिळवणी**

**४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा**
**नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

कै.कदमआण्णा यशवंत प्रोसेसर्स कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या; तिळवणी या संस्थेच्या सभासदांना कळविणेत येते की संस्थेची सन २०२५-२०२६ सालाकरिता ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २०/०९/२०२६ इ. रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता कै. कदमआण्णा कॉलनी, तिळवणी येथील संस्थेच्या यशवंत मंगल कार्यालय येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी बोलविणेत आली आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

स्थळ : तिळवणी.
दि. २३/०८/२०२६ संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**श्री. विठ्ठल तातोबा कुंभार** व्हा. चेअरमन
**श्री. ज्ञानदेव गोविंद शेटे** चेअरमन
**श्री. दशरथ बापू पाटील** –ऑननरी सेक्रेटरी

✻ **विशेष सूचना :–** १) सन २०२५-२०२६ सालचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक सभासदांच्या माहीतीसाठी संस्थेच्या नोटीस बोर्डवर जाहीर करणेत आली आहेत. २) गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस, संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे ही सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेतली जाईल व त्यास गणपुर्तीची आवश्यकता भासणार नाही.


# अभियंता दिनानिमित्त सर्वश्रेष्ठ अभियंता पुरस्कार जाहीर



इचलकरंजी,ता.८–

**इचलकरंजी असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स अँन्ड अर्किटेक्ट्स इचलकरंजी व जे.के. सिमेंट यांच्यातर्फे भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिनानिमित्त शनिवारी १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता जवाहरनगर येथील राधे बँक्वेट याठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजिला आहे.**

कार्यक्रमात इंजि. महांतेश कोकळगी, इंजि.शौकत जमादार, आर्की.अभय पिसे आणि इंजि. सागर शालगर यांचा सर्वश्रेष्ठ अभियंता पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात येणार आहे.जे. के. सिमेंटचे स्टेट हेड मार्केटिंग दयानंद कलाल, स्टेट हेड सीटीएसमहेश बेंद्रे आणि एएसएम मार्केटिंग सागर तलवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येतील.यावेळी क्वालिटी कंट्रोल इन कॉंक्रीट या विषयावर जे.के. सिमेंटचे झोनल हेड सीटीएम मुकुंद देशपांडे हे मार्गदर्शन करतील. कार्यक्रमास असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स अर्किटेक्ट्स इचलकरंजीचे अध्यक्ष राजेंद्र खंडेराजुरी, सेक्रेटरी विकास नाईक, जॉइट सेक्रेटरी भरत केटकाळे व ट्रेझरर नितीन शेट्टी तसेच सर्व पदाधिकारी, संचालक व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

# नारायण देशमुख यांचे निधन

भिलवडी,ता.८–

नारायण कृष्णा तातुगडे - देशमुख ( आमणापुर ता.पलुस) यांचे मंगळवारी वयाच्या ९४ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.


**मुरगूड नगरपरिषद, मुरगूड**

**विवरणपत्र क्रमांक १**

**मंडप/पेंडॉल तपासणी पथकांबाबत प्रसिध्दीपत्रक**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे उपस्थित जनहित याचिका क्र.१७३/२०१० संदर्भात सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ याप्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉलच्या तपासणीच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार कोल्हापूर जिल्हातंर्गत मुरगूड नगरपरिषद मुरगूड हद्दीतील मंडप/पेंडॉल तपासणी करण्याबाबत खालीलप्रमाणे तपासणी पथक/पथके गठित करण्यात आलेले आहेत. सदर तपासणी पथकांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपासणी पथक सदस्याचे नांव | पदनाम | कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक | मोबाईल क्रमांक/व्हाटस अप क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अतिश दा वाळूंज | मुख्याधिकारी | ०२३२५२६५३२५ | ७०४०३३०४२३ | mugudnp@gmailcom |
| २ | श्रीमती क्रांती पाटील | सहा. पोलिस निरीक्षक | ०२३२५२६४३३३ | ७९७७३३७९८० | murgudps.kop@ mahapolice.gov.in |
| ३ | श्रीमती स्नेहल नरके | कार्यालय अधीक्षक | ०२३२५२६५३२५ | ८९९९८०८८०६ | mugudnp@gmailcom |

तरी नागरिकांनी सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ याप्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉलच्या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास उपरोक्त विवरणपत्रांमधील नमूद तपासणी पथक सदस्यांशी संपर्क साधावा.

सही/-
**अध्यक्ष, सनियंत्रण समिती तथा मुख्याधिकारी, मुरगूड नगरपरिषद मुरगूड**



**महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर**
**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना क्र. ४० सन २०२६-२७ (फेरनिविदा)**

खालील कामाचे "ब - १" नमुन्यातील ऑनलाईन निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर ई - निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेडयुल-बी मधील परिमाण हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्रं. | कामाचे नांव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत रु.लक्ष | इसारा रक्कम रुपये | निविदा फी जीएसटी सह रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदारांचा वर्ग (सा.बां. खातेकडील) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खुली निविदा | | | | | | | |
| १ | चंदूर इजिमा क्र. ३६ ते प्रजिमा २१ कबनूर ते कोरोची राज्यमार्ग २०० ते शहापूर ते तारदाळ रस्ता प्रजिमा १०१ कि.मी.२/०० ते ३/६०० ची मध्ये आर.सी.सी. गटर्स करणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (भाग - आभार फाटा ते कबनूर) | ब-१ | ११७.३३ | ११८०००/- | १४५० | १२ महिने | सा. बां. विभागाकडील वर्ग चार (IV) व त्यावरील |
| २ | इचलकरंजी चंदूर रुई ते हुपरी रस्ता प्रजिमा १११ कि.मी. ०/०० ते २/०० मध्ये रस्ते सुधारणासह आर.सी.सी.गटर्स करणे ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (भाग - इचलकरंजी ते आभार फाटा) | ब-१ | ११२.७९ | ११३०००/- | १४५० | १२ महिने | सा. बां. विभागाकडील वर्ग चार (IV) व त्यावरील |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | : | दि. ९/९/२०२६ (सकाळी १०.०० नंतर) ते दि.१६/९/२०२६ (१७.३० वाजेपर्यंत) |
| निविदा इसारा रक्कम, निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मूळ दस्ताऐवज सादर करावयाचा दिनांक व वेळ | : | कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, कोल्हापूर<br>कार्यकारी अभियंता,सा.बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर<br>मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, कोल्हापूर<br>**वरील तिन्ही कार्यालयाचा पत्ता –** ताराबाई पार्क, मुख्य पोस्ट कार्यालयाजवळ, रमण मळा, कोल्हापूर - ४१६००३ वरील कार्यालयात दि. १८/९/२०२६ रोजी (११.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण व दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | : | मा. अधिक्षक अभियंता सा. बां. विभाग, कोल्हापूर येथे दि. १८/९/२०२६ रोजी (११.०१ वाजता) |

**टीप :-** १) सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal - https://mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे. २) निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी ई-मेल support-eproc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२ वर संपर्क साधावा. ३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑनलाईन पावती, ऑन लाईन कोरा निविदा संच, डाऊनलोड केलेली पावती, स्वत: च्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑन लाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. ४) निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई-निविदा पोर्टलवर https://mahatenders.gov.in पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत. ५) वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या इंटरनेट वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
**(क्रांतीकुमार प्र. मिरजकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर**

**आर ओ सी - २०२६-२७/क्र - ५/C2704**



नोंदणी क्रमांक-केजेआर/एचएलई/पीआरडी(आय)/१/२०१२-१३
सन २०१२ दि.१८-१२-२०१२

**जनता को-ऑप. टेक्स्टाईल संस्था मर्या., इचलकरंजी**

२३/१४३, शहापूर-इचलकरंजी-४१६ १२१ (मो.नं.९९२३१११२४६)

**✻ वार्षिक सर्वसाधारण सभा ✻**
**नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता संस्थेची **वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २९-०९-२०२६ इ. रोजी सकाळी १०-३० वाजता रोटरी क्लब, ५/३४३, दाते मळा, महेश भवन जवळ, इचलकरंजी** येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**✻ सभेपुढील विषय ✻**

१. मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२०२६ या सालामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी/जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व दि. ३१ मार्च २०२६ इ.रोजीच्या नफा-तोटा व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे.
३. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता कायदे सल्लागारांची नेमणूक करणे.
५. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता शासकीय नामतालिकेमधील लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
६. सन २०२५-२०२६ या वर्षाचे शासकीय लेखापरिक्षण अहवाल स्विकारणे.
७. संस्थेच्या शासकीय भागभांडवलाची व सिकॉमच्या कर्जाच्या रक्कमा भागविणेबाबत निर्णय घेणे.
८. मा.अध्यक्षसो यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : इचलकरंजी
दिनांक : ०७-०९-२०२६ संचालक मंडळाच्या आदेशावरून

सही/-
**चेअरमन**
**जनता को-ऑप. टेक्स्टाईल संस्था मर्या., इचलकरंजी**

**सुचना :-** **१**. सन २०२५-२६ सालाचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या नोटीस बोर्डावरप्रसिध्द करणेत आली आहेत. **२**. गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेस त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेणेत येईल, त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही. **३**. ऐनवेळच्या विषयावर चर्चेसाठी मांडावयाचे विषय दि. २१-०९-२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात पोहचतील अशा रितीने पाठवावेत. **४**. सभासदांच्या पत्त्यामध्ये बदल असल्यास नवीन पत्ता संस्थेस कळवावा. **५**. मयत सभासदांच्या वारसांनी शेअर्स ट्रान्स्फरसाठी ऑफिसशी संपर्क साधावा. (मो.नं.९९२३१११२४६)



**श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री**

(मौनीनगर), तालुका - कागल, जिल्हा - कोल्हापूर.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**
**नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री ( मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर या संस्थेची सन २०२५-२६ या वर्षाची **६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २३-०९-२०२६ इ. रोजी दुपारी १.३० वाजता कारखाना कार्यस्थळावर** खालील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी बोलविणेत आली आहे. तरी सदर सभेसाठी सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनी सहभागी होऊन सभेचे कामकाज पार पाडणेस सहकार्य करावे ही नम्र विनंती आहे.

**✻ सभेपुढील विषय ✻**

१. मागील दिनांक २७-०९-२०२५ इ. रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२६ या वर्षाच्या कारखाना कामकाजासंबंधी संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्वीकारणे व त्याची नोंद घेणे.
३. सन २०२५ - २६ या वर्षाचे हिशोबाचे एकत्रित नफा-तोटा पत्रक व ताळेबंद दाखल करून घेणे व तो स्वीकारणे आणि नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेल्या सन २०२५-२६ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे, तसेच मागील वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल स्वीकारणे.
५. सन २०२६-२७ सालाकरिता शासनमान्य लेखापरिक्षकाच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व लेखापरीक्षण शुल्क ठरविणे.
६. सन २०२६-२७ चे अंदाजपत्रकाचा आढावा घेऊन निधी उभारणीसाठी सुचविलेल्या उपायांवर चर्चा करून मंजुरी देणे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
७. कारखान्याचे ई-ऑक्शनद्वारे विक्री केलेल्या स्क्रॅप विक्रीस मजूरी देणे.
८. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयावर विचार करणे.

स्थळ : बिद्री (मौनीनगर)
दिनांक : ०५-०८-२०२६ संचालक मंडळाचे हुकूमावरून

**एस. एन. घोरपडे** -कार्यकारी संचालक

**विशेष सूचना** :-१. अहवालासोबत जोडलेली प्रवेश पत्रिका प्रवेशद्वाराजवळ दाखवावी.२. सहकारी संस्था सभासदांतर्फे सदर सभेस हजर राहणेबाबत पंच कमिटीच्या ठरावाच्या नकला दि. २१-०९-२०२६ रोजी अगर तत्पूर्वी कारखान्याच्या कार्यालयात ऑफीस वेळेत मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात व प्रतिनिधींनीही त्यांच्या नकला बरोबर आणाव्यात. ३. सभासदांना अहवाल व ताळेबंद या संबंधी अधिक माहिती हवी असेल तर सुट्टीचा दिवस सोडून ऑफीसमध्ये ऑफीस वेळेत पहावयास मिळेल. ४. सभासदांना सभेमध्ये प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी दि. २१-०९-२०२६ रोजी अगर तत्पूर्वी कारखान्याच्या कार्यालयात लेखी प्रश्न पाठवावेत म्हणजे माहिती देणे सोईचे होईल.

# आयसीसी महिला टी २० क्रमवारीत श्री चरणी अव्वल स्थानी कायम

## दीप्ती शर्मा सहाव्या क्रमांकावर

दुबई,ता.८ –

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या टी २० गोलंदाजांच्या यादीत भारतीय महिला फिरकी गोलंदाज श्री चरणी अव्वल स्थानी कायम आहे. दीप्ती शर्माने क्रमवारीत सुधारणा झाली आहे. श्री चरणी पहिल्या क्रमांकावर असून, त्यानंतर इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन दुसऱ्या, इंग्लंडची चार्ली डीन तिसऱ्या, दक्षिण आफ्रिकेची ॲन म्बाला चौथ्या आणि इंग्लंडची लॉरेन बेल पाचव्या स्थानावर आहे.**

दीप्ती शर्माने दोन स्थानांची झेप घेतली असून ती आता सहाव्या स्थानावर आहे. इंग्लंडची लिन्सी स्मिथ एका स्थानाने घसरून सातव्या स्थानावर आली आहे, तर पाकिस्तानची नश्रा संधू एका स्थानाने घसरून आठव्या स्थानावर आली आहे. दक्षिण आफ्रिकेची मरिझान कॅप एका स्थानाने पुढे जात नवव्या स्थानावर पोहोचली आहे. पाकिस्तानची सादिया इक्बाल एका स्थानाने घसरून दहाव्या स्थानावर आली आहे.बांगलादेशची मरुफा अख्तर १९ स्थानांनी पुढे जात १८ व्या स्थानावर पोहोचली आहे. श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू पाच स्थानांनी पुढे जात २८ व्या स्थानावर पोहोचली आहे, आणि सुलताना खातून नऊ स्थानांनी पुढे जात ३७ व्या स्थानावर पोहोचली आहे. थायलंडची थिपाचा पुथावोंग चार स्थानांनी पुढे जात ४७ व्या स्थानावर पोहोचली आहे, आणि तिची सहकारी सुलीपोर्न लाओमी १० स्थानांनी पुढे जात ५३ व्या स्थानावर पोहोचली आहे.



महिला टी २० फलंदाजांची क्रमवारी पाहिली तर, ऑस्ट्रेलियाची बेथ मूनी पहिल्या, ऑस्ट्रेलियाची जॉर्जिया वॉल दुसऱ्या, दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्वार्ड तिसऱ्या, वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूज चौथ्या, भारताची स्मृती मानधना पाचव्या, श्रीलंकेची चमारी अथापट्टू सहाव्या, भारताची शफाली वर्मा सातव्या, न्यूझीलंडची अमेलिया केर आठव्या, ऑस्ट्रेलियाची टाहलिया मॅकग्रा नवव्या आणि भारताची हरमनप्रीत कौर दहाव्या स्थानावर आहे.

# पूर्व विभागाचे वर्चस्व कायम

## दक्षिण विभाग ६ बाद २४२ धावा



नवी दिल्ली, ता.८–


**दुलीप ट्रॉफी २०२६ च्या अंतिम सामन्यात पूर्व विभागाचे वर्चस्व कायम आहे. तिसऱ्या दिवशी दक्षिण विभागाच्या सहा विकेट्स घेतल्या आणि धावसंख्या केवळ २४२ वर आणली. मोहम्मद शमी आणि मुकेश कुमार या वेगवान गोलंदाजांच्या जोडीने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. मोहम्मद कुनैन कुरेशी आणि शिखर मोहन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. मात्र, दक्षिण विभागाचा कर्णधार तिलक वर्मा अजूनही कडवी झुंज देत आहे. त्याने अर्धशतक झळकावले आहे. तरीही, खेळाचे दोन दिवस शिल्लक असताना, पहिल्या डावात ७०८ धावा करून पूर्व विभाग अजूनही ४६६ धावांनी आघाडीवर आहे.**

तिसऱ्या दिवशी दक्षिण विभागाने फलंदाजीला सुरुवात केली, पण सलामीवीर रिकी भुई (१) लवकर बाद झाला. त्याला मुकेश कुमारने बाद केले. वैभव सूर्यवंशीच्या आग्रहावरून, इशान किशनने डीआरएस घेतला आणि विकेट मिळवली. नारायण जगदीसन (३२) आणि देवदत्त पडिक्कल (६२) यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६० धावांची भागीदारी केली. शिखर मोहनच्या गोलंदाजीवर खराब फटका खेळल्याने जगदीसन बाद झाला. मोहम्मद शमीने बाद करण्यापूर्वी शेख रशीदने २७ धावा केल्या, ज्यामुळे दक्षिण विभागाला तिसरी विकेट मिळाली.

पडिक्कलने आपला चांगला फॉर्म कायम ठेवत अर्धशतक पूर्ण केले. भारताच्या श्रीलंका दौऱ्यातील दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये त्याने दोन शतके झळकावली होती. मात्र, दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात त्याला शतक पूर्ण करता आले नाही. मुकेशने त्याचा डाव संपवला. पडिक्कलने १०४ चेंडू खेळून चार चौकारांसह ६२ धावा केल्या.२३ धावा करून आर. स्मरन शमीचा दुसरा बळी ठरला. यामुळे दक्षिण विभागाचा निम्मा संघ १७४ धावांवर तंबूत परतला. टिळकने एक बाजू सांभाळली आणि श्रेयस गोपालने त्याला दुसऱ्या बाजूने साथ दिली. या



दोघांनी मिळून दक्षिण विभागाला उपांत्य फेरीत मजबूत स्थितीत आणले होते. मात्र, अंतिम सामन्यात त्याच नशिबाची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. कुरेशीने स्वतःच्या गोलंदाजीवर झेल पकडून गोपालला (२६) बाद केले. दरम्यान, टिळकने १३३ चेंडूंचा सामना करत ५६ धावांवर फलंदाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. दक्षिण विभागावर सध्या फॉलो–ऑनचे संकट आहे. तिसऱ्या दिवशी शमीने उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्याने ११ षटके गोलंदाजी करत चार निर्धाव षटकांसह १७ धावांत दोन बळी घेतले.



# झ्वेरेव्ह-बोटिक,गॉफ-रायबाकिना उपांत्यपूर्व फेरीत

न्यूयॉर्क, ता.८ –

**जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि नेदरलँड्सचा बोटिक व्हॅन डी झँडशल्प यांनी अमेरिकन ओपन २०२६ च्या पुरुष एकेरी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. झ्वेरेव्हने इटलीच्या लुसियानो डार्डेरीचा सरळ सेट्समध्ये पराभव केला, तर बोटिकने दोन सेट्सने पिछाडीवर असताना उल्लेखनीय पुनरागमन करत आर्थर गियाला पराभूत केले.**

झ्वेरेव्हने २१ व्या मानांकित डार्डेरीचा ६-२, ६-२, ७-६(३) असा पराभव केला.या विजयामुळे, झ्वेरेव्ह २०२६ मध्ये चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारा एकमेव खेळाडू ठरला. बोटिक व्हॅन डी झँडशल्पने आर्थर गियाविरुद्धच्या पाच-सेटच्या सामन्यात एक उल्लेखनीय पुनरागमन केले. जागतिक क्रमवारीत ८७ व्या क्रमांकावर असलेल्या गियाने पहिले दोन सेट ६-३, ७-६(०) असे जिंकून सामन्यावर नियंत्रण मिळवले होते. त्यानंतर बोटिकने सलग तीन सेट जिंकून सामन्याचे चित्र पालटले. बोटिकने तिसरा सेट ७-६(७) असा जिंकला. बोटिकने २०२१ नंतर पुन्हा एकदा न्यूयॉर्कमध्ये अंतिम आठ संघांमध्ये स्थान मिळवले आहे.

महिला एकेरीमध्ये, २०२३ ची चॅम्पियन कोको गॉफने १८ वर्षीय इवा जोविकला ६-१, ६-४ ने हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. जोविकने पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला होता, पण गॉफविरुद्ध तिचा प्रवास संपला. जोविकने सामन्यात केवळ नऊ विनर्स मारले, तर ३० अनफोर्स्ड एरर्स केल्या. उपांत्यपूर्व फेरीत गॉफचा सामना मीरा आंद्रीवाशी होईल. एलेना रायबाकिनाने माजी चॅम्पियन नाओमी ओसाकाला ६-१, ६-४ ने पराभूत करून अंतिम आठमध्ये प्रवेश केला. या पराभवामुळे, २०१८ आणि २०२० च्या यूएस ओपन चॅम्पियन ओसाकाचे तिसऱ्यांदा विजेतेपद जिंकण्याचे स्वप्न भंगले. आता उपांत्यपूर्व फेरीत रायबाकिनाचा सामना ऑलिम्पिक चॅम्पियन झेंग किनवेनशी होईल.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय हॉकी संघ निळ्या जर्सीमध्ये खेळणार



नवी दिल्ली,ता.८ –

**जपानमध्ये होणाऱ्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय हॉकी संघ पुन्हा निळ्या जर्सीचा वापर करणार आहे. भारतीय पुरुष आणि महिला संघांनी नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये खेळल्या गेलेल्या प्रो लीग सामन्यांमध्ये भगव्या रंगाची जर्सी मुख्य किट म्हणून परिधान केली होती. याच जर्सीला आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीही मंजुरी देण्यात आली आहे.**

जर्सीच्या रंगातील बदलामुळे यापूर्वीही वाद निर्माण झाला होता. त्यावेळी, हॉकी इंडियाने स्पष्ट केले होते की, हा निर्णय राजकीय किंवा इतर कोणत्याही कारणास्तव नव्हे, तर तांत्रिक आधारावर, खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसोबत सविस्तर चर्चा केल्यानंतर घेण्यात आला होता. निळ्या रंगाच्या सिंथेटिक खेळपट्ट्या आता आंतरराष्ट्रीय स्तरावर मानक बनल्या आहेत आणि निळ्या जर्सी अनेकदा टर्फमध्ये मिसळून जात असल्याने खेळाडूंच्या दृश्यमानतेवर परिणाम होत होता. प्रशिक्षण कर्मचारी आणि हॉकीपटूंनी पिवळा आणि केशरी यांसारखे पर्यायी रंग सुचवले होते. सर्व बाबींचा विचार करून केशरी रंगावर एकमत झाले.

तांत्रिक आवश्यकता पूर्ण करण्याव्यतिरिक्त, केशरी रंगाला विशेष महत्त्व आहे, कारण तो भारतीय तिरंग्याचा एक भाग असून शौर्य, त्याग आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक मानला जातो.

# भारताविरुध्दच्या एकमेव टी–२० साठी जपानचा संघ जाहीर

नवी दिल्ली,ता.८ –

**भारताविरुध्दच्या एकमेव टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी जपानचा संघ जाहीर झाला आहे. केंडल काडोवाकी–फ्लेमिंगच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय संघाची निवड करण्यात आली आहे. भारत आणि जपान यांच्यातील टी–२० सामना २२ सप्टेंबर रोजी सानो येथे होणार आहे. आयची–नागोया येथे होणाऱ्या २०२६ च्या आशियाई खेळांच्या अगदी आधी, दोन्ही संघांमधील हा पहिला आंतरराष्ट्रीय सामना असेल.**



भाराताविरुद्धच्या १५ सदस्यीय संघात त्या १२ क्रिकेटपटूंचा समावेश आहे, ज्यांची घोषणा जूनमध्ये २०२६ च्या हंगामासाठी करण्यात आली होती. तीन क्रिकेटपटू अ संघातील आहेत. त्सुयोशी ताकाडा, जेक कुसुदा–नेर्न आणि ॲलास्टेयर काडोवाकी–फ्लेमिंग. भारत आणि जपान यांच्यातील या टी–२० सामन्याला सुझुकी कप असे नाव देण्यात आले आहे. सानो आंतरराष्ट्रीय मैदानावर २०२६ च्या सुरुवातीला टी–२० विश्वचषकासाठी पूर्व आशिया–पॅसिफिक पात्रता सामने आयोजित करण्यात आले होते. या मैदानाची क्षमता ५०० वरून २००० पर्यंत वाढवली जात आहे.

जपान संघ: केंडल काडोवाकी–फ्लेमिंग, चार्ली हारा–हिन्झ, बेंजामिन गो–इतो डेव्हिस, कोहेई कुबोटा, वातारू मियाउची, रिओ साकुरानो–थॉमस, डेक्लन सुझुकी–मॅककॉम्ब, शोमा सुगाया–स्लेटर, अलेक्झांडर शिराई–पॅटमोर, लॅकलन यामामोटो–लेक, माकोटो तानियामा, इब्राहिम ताकाहाशी, त्सुयोशी ताकाडा, जेक कुसुदा–नेर्न, ॲलास्टेयर काडोवाकी–फ्लेमिंग.

# न्यूझीलंडचा मार्क चॅपमन केंद्रीय करारातून बाहेर

ऑकलंड,ता.८–

**न्यूझीलंडचा फलंदाज मार्क चॅपमनने २०२६–२७ हंगामासाठीच्या केंद्रीय करारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने न्यूझीलंड क्रिकेटसोबत एक पर्यायी करार स्वीकारला आहे, ज्यामुळे तो बिग बॅश लीगमध्ये खेळण्यासाठी उपलब्ध राहील.**



चॅपमन न्यूझीलंडच्या भारताविरुद्धच्या आगामी मायदेशातील मालिकेत खेळण्यासाठी उपलब्ध असेल. फिन ॲलन, लॉकी फर्ग्युसन, ॲडम मिल्ने आणि टिम सेफर्ट हे देखील अशाच पर्यायी करारांवर आहेत. आगामी बिग बॅश लीग हंगाम १२ डिसेंबर ते २६ जानेवारी दरम्यान खेळवला जाणार आहे, जो न्यूझीलंडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याशी आणि श्रीलंकेविरुद्धच्या या मायदेशातील मर्यादित षटकांच्या मालिकेशी जुळतो.

चॅपमनला केंद्रीय करारातून वगळल्यामुळे रिक्त झालेली जागा नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्सचा वेगवान गोलंदाज मॅथ्यू फिशरने घेतली आहे. फिशरला पहिल्यांदाच न्यूझीलंड क्रिकेटचा केंद्रीय करार मिळत आहे. न्यूझीलंडच्या घरच्या मैदानावरील हंगामाची सुरुवात २२ ऑक्टोबर रोजी भारताविरुद्ध होईल. भारताविरुद्धच्या १२ सामन्यांच्या मालिकेत पाच एकदिवसीय, पाच टी–२० आंतरराष्ट्रीय आणि दोन कसोटी सामन्यांचा समावेश असून, ही मालिका १ डिसेंबरपर्यंत चालेल.त्यानंतर न्यूझीलंड जानेवारीच्या मध्यात श्रीलंकेचे यजमानपद भूषवेल, ज्यात तीन एकदिवसीय, तीन टी–२० आंतरराष्ट्रीय आणि दोन कसोटी सामने खेळले जातील. या दोन घरच्या मालिकांच्या दरम्यान, न्यूझीलंड चार कसोटी सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा करेल.

# भारतीय अंडर १९ संघात बदल; आर्यन सावसानी, तन्मयला स्थान

नवी दिल्ली,ता.८ –

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) ज्युनियर क्रिकेट समितीने ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या आगामी सामन्यांसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघात दोन बदल केले आहेत. सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आर्यन सावसानीचा रोहित यादवच्या जागी एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला आहे, तर हरियाणा क्रिकेट असोसिएशनच्या तन्मय बलोदाची बहुदिवसीय सामन्यांसाठी रोहितच्या जागी निवड करण्यात आली आहे.**

राजकोट आणि अहमदाबाद येथे ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघाविरुद्ध होणाऱ्या आगामी सामन्यांसाठी रोहित यादवची भारतीय १९ वर्षांखालील एकदिवसीय आणि बहुदिवसीय संघात निवड झाली होती. पण, वयाशी संबंधित विसंगतीमुळे त्याला संघातून वगळण्यात आले आहे. अंडर-१९ वनडे संघातलक्ष्य रायचंदानी (कर्णधार), यशवर्धन चौहान (उपकर्णधार), रजत बघेल (यष्टीरक्षक), आर्यवीर सेहवाग, व्ही.के. विनीत, कुशाग्र ओझा, अर्जुन राजपूत, मनाल चौहान, अन्वय द्रविड (यष्टीरक्षक), व्ही. यशवीर, शविन विनोद, मोहित उलवा, चिगुरुपती व्यंकट, काव्या पटेल, आर्यन सवसानी यांचा तर अंडर-१९ चा सुधारित बहु-दिवसीय संघातयशवर्धन चौहान (कर्णधार), लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), सागर विर्क, कुशाग्र ओझा, मनाल चौहान, कुश पटेल, मानव कृष्णा (यष्टीरक्षक), अभिप्रय बिस्वास (यष्टीरक्षक), इशान ओम, अयान अक्रम, प्रणव राघवेंद्र, प्रियांशू सिंग, मोहित उलवा, आर्यन यादव, तन्मय बालोदा यांचा समावेश आहे.

# धार ग्रुपचा भक्तिमय आगमन सोहळा उत्साहात



इचलकरंजी,ता.८–

**इचलकरंजी शहरात यंदाच्या गणेशोत्सवाची लगबग उत्साहात सुरू झाली असून, शहरातील विविध गणेश मंडळांकडून भव्य गणेशमूर्ती साकारण्यात आल्या आहेत. यामध्ये धार ग्रुप मंडळाने यंदा विठ्ठल रूपातील आकर्षक गणेशमूर्ती साकारली आहे.**

या गणेशमूर्तीचा मंगळवारी भव्य आगमन सोहळा उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. आगमन सोहळ्यादरम्यान 'रामकृष्ण हरी'च्या गजराने अवघी इचलकरंजी नगरी भक्तिमय झाली.

या आगमन सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, ढोल पथक, बिट्स, आकर्षक लाईट शो आणि नेत्रदीपक फायर शो. या विविध सादरीकरणांनी गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेतले आणि संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

भक्ती, परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधत धार ग्रुप मंडळाने साकारलेल्या या आगमन सोहळ्याने गणेशभक्तांना विठ्ठल रूपातील श्री गणरायाचे विलक्षण आणि विलोभनीय दर्शन घडवून आणले.

# तासगावच्या 'शिवनेरी'ने फोडली हुपरीतील शिवसेनेची भव्य दहीहंडी

## २ लाख २६ हजारांचे बक्षीस व चषकावर कब्जा



हुपरी येथील दहीहंडी फोडताना तासगावच्या शिवनेरी गोविंदा पथकाने रचलेला भव्य आणि थरारक आठ थरांचा मानवी मनोरा.

हुपरी, ता. ८(वार्ताहर)–

**येथील शिवसेना, युवासेना कोल्हापूर जिल्हा, हुपरी शहर व वंदे मातरम् बहुउद्देशीय चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २ लाख २६ हजार रुपयांच्या बक्षीसाची भव्य दहीहंडी तासगावच्या शिवनेरी गोविंदा पथकाने अत्यंत शिस्तबद्ध व चित्तथरारक आठ मानवी मनोरे रचून फोडली. हुतात्मा स्मारक मैदानावर हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत थरार रंगला.**

अंदाजे ३८ फूट उंचीवर बांधण्यात आलेली ही मानाची दहीहंडी फोडण्यासाठी नामांकित ६ गोविंदा पथकांनी सहभाग नोंदवला होता. भगवे ध्वज आणि युवकांच्या प्रचंड उत्साहात प्रत्येक पथकाने जोरदार सलामी दिली. अखेर शिवनेरी पथकाने अचूक ताळमेळ आणि अंगावर काटा आणणारे आठ थर लावत ३६ फुटांवरील हंडी यशस्वीरीत्या फोडली. विजेत्या पथकाला आम.अशोकराव माने आणि पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांच्या हस्ते रोख २ लाख २६ हजार रुपये व मानाचा चषक देऊन गौरवण्यात आले.

जि. प. सदस्य शिवाजी जाधव यांनी आजची युवापिढी व्यसन आणि नशेच्या आहारी जात असल्याचे चित्र चिंताजनक असून, युवकांनी क्रीडा संस्कृती जोपासून निरोगी जीवनशैली अंगीकारावी,असे आवाहन केले. यावेळी नगराध्यक्ष मंगलराव माळगे, गोकुळ दूध संघाचे माजी अध्यक्ष विश्वास पाटील,अरुण डोंगळे, संचालक मुरलीधर जाधव, अजित नरके, सारिका नांदेकर, अतिष शिंगे, राहुल आवळे, अर्जुन जाधव, राजेंद्र पाटील, अरुण गायकवाड, नगरसेवक रोहित शेटे, यांच्यासह शिवसेना–युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.